उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासन

# शिक्षणवेध : २०४७

वेध विकसित शिक्षणाचा

मे २०२६ | वर्ष २ | अंक चौथा



# आवाहन

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या या नव्या त्रैमासिकासाठी तुमच्या सारख्या प्रेरणादायी शिक्षक, अभ्यासू विद्यार्थ्यांनी आणि नवकल्पनांनी समृद्ध महाविद्यालयांनी आपापल्या कहाण्या आमच्यापर्यंत पोहोचवाव्यात, अशी आमची मनापासून विनंती आहे.

तुमच्या संस्थेत एखादा वेगळा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असेल, एखाद्या विद्यार्थ्याने नावीन्यपूर्ण प्रकल्प साकारला असेल, पेटंट मिळवले असेल, संशोधनात काही वेगळे घडवले असेल, एखादा कार्यक्रम खूप लोकाभिमुख आणि परिणामकारक ठरला असेल - तर तो अनुभव आम्हाला आणि सर्वांना वाचायला नक्की आवडेल.

हे त्रैमासिक म्हणजे आपल्या कामाची ओळख करून देण्यासाठी निर्मिलेले एक व्यासपीठ आहे. संस्था, विभाग किंवा वैयक्तिक पातळीवरील आपल्या यशोगाथा, कल्पक उपक्रम, सर्जनशील प्रकल्प, आणि समजूतदार मार्गक्रमण - हे सगळं आम्ही ऐकायला आणि छापायला उत्सुक आहोत. या प्रवासात आमचे सहप्रवासी होण्यासाठी आपल्याला हे आग्रहाचे आमंत्रण!

तुमचे लेख (मराठीत किंवा इंग्रजीत), ६०० ते १००० शब्दांत shikshanwedh@gmail.com या ईमेलवर पाठवा. चांगली रंगीत छायाचित्रे देखील पाठवा; मात्र छायाचित्रांचे resolution चांगले असले पाहिजे. निवडक लेख त्रैमासिकात प्रसिद्ध केले जातील.

चला, एकत्र येऊ या — शिक्षणातले आशावाद, प्रयोगशीलता आणि प्रेरणा सगळ्यांपर्यंत पोहोचवू या!

**लेख या ईमेल वर पाठवा : shikshanwedh@gmail.com**

शिक्षणवेध : २०४७

**संपादक :** डॉ. मृदुला बेळे

**त्रैमासिक संयोजक :** तुषार दामगुडे

**संपादन सहाय्य :** वंदना अत्रे

**प्रकाशक :** संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन मुंबई इमारत, ४९ खेरवाडी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०००५१

**कलासंपादन :** सारद मजकूर

महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

# मा. चंद्रकांतदादा पाटील यांना

## जन्मदिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा ! (१० जून)







शुभेच्छुक

शिक्षणवेध : २०४७ संपादक मंडळ

# अनुक्रमणिका


- संपादकीय : **डॉ. मृदुला बेळे** ............ ६
- 'विकास एक्सप्रेस' व्हाया आधुनिक शिक्षण / **मा. चंद्रकांत(दादा) पाटील** ............ ८
- शिक्षणातून विकसित भारताची पायाभरणी / **प्रा. शैलेंद्र देवळाणकर** ............ ११
- गुणवत्ता मापनाची प्रभावी यंत्रणा / **प्रा. डॉ. सुनील भिरूड** ............ १४
- उद्योजकता विकासाच्या दिशेने एक पाऊल / **प्रा. प्रमोद नाईक** ............ १९
- ज्ञानाची दारे आता एका क्लिकवर / **श्री. अशोक गाडेकर** ............ २२
- सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालये यांच्यातील परस्पर संबंध / **सुनील हुसे** ............ २५
- दृश्यकलेच्या नव्या पर्वाची नांदी / **प्रा. शार्दुल कदम** ............ २८
- ज्ञानसंपन्न महाराष्ट्रासाठी नवे पर्व /
  **डॉ. प्रशांत पी. मगर, प्रा. डॉ. सुभाष चव्हाण, प्रा. डॉ. मीनल ओक, प्रा. डॉ. शांतश्री सेनगुप्ता** ............ ३१
- भारतातील एकसंध शिक्षण नियामक सुधारणांचे बिगुल :
  एक चिकित्सक अभ्यास / **डॉ संजय ढोले** ............ ३५
- अप्रेंटशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) :
  उच्च शिक्षणातील नव्या युगाची नांदी / **डॉ. पराग काळकर** ............ ४३
- अध्यापकांच्या विकासासाठी झटणारी संस्था :
  एमएसएफडीए / महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था ............ ४७


## शिक्षणातून महिला सक्षमीकरण:


स्कॉलरशिप लाभार्थी विद्यार्थिनींशी हितगुज ............ ५०


## ज्ञानवृक्षाच्या मुळाशी


- भारतीय भाषाविज्ञानाचे प्रवर्तक : यास्काचार्य / **डॉ. सुनीला गोंधळेकर** ............ ५३

# अनुक्रमणिका

## चित्तपोषण

- डायरेक्टर स्पीक्स / **डॉ. किशोर इंगळे** यांची मुलाखत ....................५५
- दीपस्तंभ / **डॉ. अभय जेरे मुलाखत** / डॉ. मृदुला बेळे....................५९

## कलादालन

- कला शिक्षणातील नव्या पर्वाची नांदी / **प्रा. स्मिता किंकळे**....................६५
- शिवछत्रपतींचा सर्वाधिक सहवास लाभलेली दुर्गवास्तू : राजगड / **प्रसाद पवार** ....................६७

## नव्या वाटा - नवे उद्यम

- डिपेक्स : तंत्राविष्कार ते समाज परिवर्तन. / **डॉ. भरत अमलकर** ....................७२

## बुक्स अँड रील्स

- वाचाल तर वाचाल : 'शाळाभेट' :
  शिक्षणविश्वाचा जिवंत अनुभव देणारे पुस्तक / **नीता कुलकर्णी** ....................७४
- रुपे रुपेरी : झुंड-भिंत ओलांडताना / **श्रीपाद ब्रह्मे**....................७६

## मनाचिये गुंती

- आयुष्याला हो म्हणा / **महेंद्र कानेटकर** ....................७८

## वाचक लिहितात

- वाचन संस्कृती जपूया, विकसित राष्ट्र घडवूया / **डॉ. उदय जाधव**....................८१

संपादकीय



# बार्बियानाच्या शाळेपासून विकसित भारतापर्यंत...

आज या नियतकालिकाचा चौथा अंक वाचकांच्या हाती देताना मला विद्यार्थीदशेत वाचलेले एक पुस्तक पुन्हा आठवते - लेटर टू ए टीचर - बार्बियानाची शाळा.

विद्यार्थी असताना अनेक पुस्तके वाचली. काही पुस्तकांमधील विचार त्या त्या काळापुरतेच सोबत राहिले, काही मात्र आयुष्यभरासाठी मनात रुजले. बार्बियानाची शाळा हे असेच एक पुस्तक. इटलीतील बार्बियाना या छोट्याशा गावात फादर लोरेन्झो मिलानी यांनी सुरू केलेल्या शाळेची ही कथा. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या, शिक्षण व्यवस्थेने दुर्लक्षित केलेल्या मुलांना त्यांनी केवळ शिक्षण दिले नाही, तर त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. प्रत्येक मुलामध्ये काहीतरी विशेष असते आणि योग्य संधी मिळाल्यास तो समाजात अर्थपूर्ण योगदान देऊ शकतो, हा विश्वास त्या शाळेने दिला.

त्या वयात हे पुस्तक वाचताना मला त्यातील सामाजिक आशय समजला असेलच असे नाही. पण एक गोष्ट मात्र मनात खोलवर रुजली- शिक्षण म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान नव्हे, शिक्षण म्हणजे माणसामधील सुप्त क्षमता जागवण्याची प्रक्रिया. आज अनेक वर्षांनंतर प्राध्यापक, संशोधक आणि बौद्धिक संपदा क्षेत्रात कार्यरत असताना त्या पुस्तकातील विचार अधिक स्पष्टपणे समजू लागतात.

मागील तीन अंकांमधून महाराष्ट्रातील उच्च व तंत्र शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रम, संशोधन, यशोगाथा आणि नवकल्पनांची ओळख वाचकांना करून देण्याचा प्रयत्न आपण केला. प्रत्येक अंकाच्या निमित्ताने राज्यातील विविध शैक्षणिक संस्था, शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचे कार्य जवळून पाहण्याची संधी मिळाली. या प्रवासात एक गोष्ट सातत्याने जाणवली - आपल्या राज्यात प्रतिभेची कमतरता नाही. कल्पनांची कमतरता नाही. जिद्दीची कमतरता नाही. गरज आहे ती योग्य व्यासपीठाची, योग्य मार्गदर्शनाची आणि एकमेकांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याची.

आज भारत विकसित भारत २०४७ या ध्येयाकडे वाटचाल करीत आहे. विकसित भारत ही केवळ आर्थिक संकल्पना नाही. ती ज्ञानाधिष्ठित, आत्मनिर्भर,

संशोधनप्रधान आणि नवोपक्रमक्षम भारताची संकल्पना आहे. विकसित राष्ट्रे केवळ पायाभूत सुविधांमुळे घडत नाहीत, ती घडतात प्रयोगशाळांमध्ये जन्म घेणाऱ्या कल्पनांमधून, वर्गखोल्यांमध्ये रुजणाऱ्या विचारांमधून आणि समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी झटणाऱ्या संशोधकांमधून.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नेही शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांनी केवळ माहिती आत्मसात करावी एवढी अपेक्षा नाही, तर त्यांनी चिकित्सक विचार करावा, प्रश्न विचारावेत, संशोधन करावे आणि नवीन उपाय शोधावेत, अशी अपेक्षा आहे. कारण आजच्या जगात माहिती सर्वत्र उपलब्ध आहे; परंतु नवीन ज्ञान निर्माण करण्याची क्षमता हीच खरी स्पर्धात्मक ताकद आहे.

माझ्या कार्यक्षेत्रामुळे संशोधन, नवोपक्रम आणि बौद्धिक संपदा यांच्याशी जवळून काम करण्याची संधी मला मिळाली. या अनुभवातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते - आपल्या विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये अफाट क्षमता आहे. अनेक नाविन्यपूर्ण कल्पना संशोधन प्रकल्पांमधून जन्म घेतात. अनेक समस्या सोडविण्याची क्षमता आपल्या प्रयोगशाळांमध्ये आहे. मात्र या कल्पनांचे नवोपक्रमात, पेटंटमध्ये, स्टार्टअपमध्ये आणि समाजोपयोगी तंत्रज्ञानामध्ये रूपांतर होण्यासाठी सक्षम परिसंस्था उभारणे आवश्यक आहे.

आजच्या काळात नवोपक्रम हीच नवी साक्षरता आहे, असे मला वाटते. एकेकाळी वाचन-लेखन शिकणे समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक होते, आज नवीन विचार करणे, समस्या ओळखणे, त्यावर उपाय शोधणे आणि त्या उपायांचे मूल्यनिर्मितीत रूपांतर करणे तितकेच आवश्यक बनले आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनी ज्ञाननिर्मितीची आणि नवोपक्रमांची केंद्र बनले पाहिजे.

याच ठिकाणी मला पुन्हा एकदा बार्बियानाची शाळा आठवते. त्या शाळेचा मूळ संदेश असा होता की, कोणताही विद्यार्थी दुर्लक्षित राहू नये आणि कोणतीही क्षमता वाया जाऊ नये. आज आपल्या शिक्षण व्यवस्थेसमोरही हाच प्रश्न आहे. आपण प्रत्येक विद्यार्थ्यामधील क्षमता ओळखत आहोत का? आपण त्याला स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची संधी देत आहोत का? आपण संशोधनाला समाजाशी जोडत आहोत का?

या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न म्हणजेच विकसित भारताच्या दिशेने टाकलेले पाऊल होय.

या नियतकालिकाच्या प्रत्येक अंकातून आम्ही केवळ माहिती देण्याचा प्रयत्न करत नाही, तर प्रेरणा देण्याचा प्रयत्न करतो. एखाद्या विद्यार्थ्याला संशोधनाची दिशा मिळावी, एखाद्या शिक्षकाला नवा उपक्रम सुरू करण्याची प्रेरणा मिळावी, एखाद्या संशोधकाला आपल्या कल्पनेचे नवोपक्रमात रूपांतर करण्याची उमेद मिळावी आणि एखाद्या संस्थेला उत्कृष्टतेचा नवा ध्यास मिळावा, हीच या प्रयत्नामागील प्रेरणा आहे.

बार्बियानाच्या शाळेने मला शिकवले की, शिक्षणाची खरी ताकद माणसामधील शक्यता जागृत करण्यात असते. आज विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना ही शिकवण पूर्वीपेक्षा अधिक महत्त्वाची वाटते. कारण राष्ट्राची प्रगती ही केवळ धोरणांमधून होत नाही, ती घडते विचार करणाऱ्या, निर्माण करणाऱ्या आणि परिवर्तन घडविणाऱ्या माणसांमधून.

चला, शिक्षणातून विचार घडवूया, विचारांतून नवोपक्रम निर्माण करूया आणि नवोपक्रमांतून विकसित भारताचे स्वप्न साकार करूया.

**- डॉ. मृदुला बेळे**
संपादक, शिक्षणवेध - २०४७



# ‘विकास एक्सप्रेस’ व्हाया आधुनिक शिक्षण

शिक्षणाकडे राष्ट्रउभारणीचा पाया म्हणून पाहण्याचा एक व्यापक दृष्टिकोन केंद्रीय अर्थसंकल्पातून मांडला गेला आहे. शिक्षण, रोजगार आणि उद्योग यांच्यातील दुवा अधिक घट्ट करण्यासाठी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. विशेषतः देशाच्या जीडीपीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सेवा क्षेत्राला चालना देण्यासाठी एका उच्चस्तरीय ‘शिक्षण ते रोजगार आणि उद्योग’ स्थायी समितीची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली आहे. शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्यवान पिढी घडवण्यासाठी आणि देशासह जगाला कुशल, निष्णात मनुष्यबळ पुरवण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतुदी दूरगामी परिणाम करणाऱ्या आहेत.



**चंद्रकांतदादा पाटील**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेले २०२६-२७ या वर्षासाठीचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक हा ‘विकसित भारत २०४७’ या पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या महत्त्वाकांक्षी मोहिमेला बळकटी देणारी आधारस्तंभ आहे. वित्तीय शिस्तीचे काटेकोर पालन करतानाच आर्थिक सुधारणांना गती देत, सर्वसामान्यांच्या आशाआकांक्षांची सुयोग्य दखल घेत मांडलेला एक आखीवरेखीव आर्थिक आकृतीबंध म्हणून याकडे पाहावे लागेल. यानिमित्ताने स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच सलग नवव्यांदा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केला आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे निर्मला सीतारामन

या देशाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला अर्थमंत्री आहेत. २०१९ मध्ये पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली त्यांनी पदभार स्वीकारला आणि मोदी ३.० सरकारमध्येही त्यांची या पदावर झालेली निवड ही त्यांच्या योगदानाची मोठी पोचपावती आहे. बदलत्या जागतिक आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा सर्वंकष विचार करून हा अर्थसंकल्प मांडण्यात आला.

विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी जागतिक दर्जाची, गुणवत्तापूर्ण शिक्षणप्रणाली असणे ही पूर्वअट आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून पाच वर्षांपूर्वीच याद्दष्टीने भरीव प्रयत्नांना प्रारंभ झाला आहे. आता त्यातील पुढचा टप्पा या अर्थसंकल्पातून मांडण्यात आला आहे. खास करून शिक्षणाच्या माध्यमातून कौशल्यवान पिढी घडवण्यासाठी आणि देशासह जगाला कुशल, निष्णात मनुष्यबळ पुरवण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेल्या तरतुदी दूरगामी परिणाम करणाऱ्या आहेत.

शिक्षणाकडे राष्ट्रउभारणीचा पाया म्हणून पाहण्याचा एक व्यापक द्दष्टिकोन या अर्थसंकल्पातून मांडला गेला आहे. शिक्षण, रोजगार आणि उद्योग यांच्यातील दुवा अधिक घट्ट करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या आहेत. विशेषतः देशाच्या जीडीपीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या सेवा क्षेत्राला चालना देण्यासाठी एका उच्चस्तरीय 'शिक्षण ते रोजगार आणि उद्योग' स्थायी समितीची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या माध्यमातून २०४७ पर्यंत जागतिक सेवा क्षेत्रात भारताचा वाटा १० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ही समिती रोजगार आणि निर्यातीसाठी विकासाच्या संधी शोधेल. तसेच, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा नोकऱ्यांवर होणारा परिणाम तपासून आवश्यक उपाययोजना सुचवेल.

याशिवाय उच्च शिक्षणातील, विशेषतः विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांसमोर येणारी आव्हाने लक्षात घेता, देशातील प्रत्येक जिल्ह्यात एक मुलींचे वसतिगृह स्थापन केले जाणार आहे. यामुळे ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थिनींना सुरक्षित निवास मिळणार असून यामुळे त्यांचे उच्च शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. तंत्रज्ञान-आधारित शैक्षणिक सुधारणांवर भर देत, शालेय स्तरापासूनच अभ्यासक्रमात 'एआय' चा समावेश करण्याची शिफारस या अर्थसंकल्पात करण्यात आली असून काळाची पावले ओळखणारे हे पाऊल आहे.

आरोग्य क्षेत्रातील शिक्षण आणि रोजगाराला बळ देण्यासाठी पाच प्रादेशिक वैद्यकीय हब स्थापन करण्याचे केंद्र सरकारने निर्धारित केले आहे. हे हब खासगी क्षेत्राच्या भागीदारीतून उभारले जाणार असून त्यात वैद्यकीय शिक्षण, संशोधन, उपचार केंद्र आणि आयुष केंद्रांचा समावेश असेल. या माध्यमातून पुढील पाच वर्षांत १ लाख निमवैद्यकीय व्यावसायिक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत भारतीय तरुणांचे विदेशात शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले आहे. या पालकांना परदेशात पैसे पाठवण्यासाठी 'लिबरलाईज्ड रेमिटन्स स्कीम' हा मुख्य मार्ग आहे. या अंतर्गत शिक्षणासाठी पाठवल्या जाणाऱ्या रकमेवर ५ टक्के टीसीएस आकारला जात होता. या अर्थसंकल्पातून तो थेट दोन टक्क्यांवर आणण्यात आला आहे. म्हणजेच एखाद्या पालकाला आपल्या पाल्याच्या परदेशातील शिक्षणासाठी वर्षाला २० लाख रुपये पाठवायचे असतील तर पूर्वी त्यांना ५ टक्के दराने सुमारे १ लाख रुपये टीसीएस भरावा लागत असे. आता हा खर्च केवळ ४० हजार रुपयांवर येऊ शकेल.

पंतप्रधान मोदी यांनी गेल्या दशकभरामध्ये भारतीय परंपरेतील वैशिष्ट्यांचे महत्त्व जागतिक पातळीवर नेण्याचे मौलिक कार्य केले आहे. दरवर्षी पाळला जाणारा 'योगदिन' हे याचे प्रमुख उदाहरण. योगसाधनेबरोबरच भारतात आयुर्वेदोपचारांची प्राचीन परंपरा असून कोरोना महामारी काळात तिची उपयुक्तता जगाने जाणली आहे. ही 'सॉफ्ट पॉवर' जगभरामध्ये विस्तारण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून त्याद्दष्टीने यंदाच्या

पर्यटन आणि शिक्षण या क्षेत्रांच्या एकात्मिक विकासावर या अर्थसंकल्पात अभूतपूर्व भर देण्यात आला आहे. केवळ पर्यटनाला चालना देण्यापेक्षा, पर्यटनाला रोजगार निर्मितीचे इंजिन बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक आणि कौशल्यविषयक पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यासाठी सध्याच्या 'नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' चे श्रेणीवर्धन करून 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉस्पिटॅलिटी' स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला आहे.




अर्थसंकल्पामध्ये तीन केंद्रीय आयुर्वेद इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात येणार आहे.

पर्यटन आणि शिक्षण या क्षेत्रांच्या एकात्मिक विकासावर या अर्थसंकल्पात अभूतपूर्व भर देण्यात आला आहे. केवळ पर्यटनाला चालना देण्यापेक्षा, पर्यटनाला रोजगार निर्मितीचे इंजिन बनवण्यासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक आणि कौशल्यविषयक पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. यासाठी सध्याच्या 'नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' चे श्रेणीवर्धन करून 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉस्पिटॅलिटी' स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. ही संस्था शिक्षण क्षेत्र, उद्योग आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून काम करेल. यामुळे हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील शिक्षणाचा दर्जा जागतिक मानकांनुसार उंचावेल आणि विद्यार्थ्यांना थेट उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण मिळेल. याखेरीज पर्यटकांचा अनुभव सुधारण्यासाठी आणि स्थानिकांना रोजगार देण्यासाठी सरकारने एक पायलट योजना जाहीर केली आहे. त्यानुसार २० प्रमुख पर्यटन स्थळांवरील १०,००० गाईड्सना उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जाईल. हे प्रशिक्षण भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या सहकार्याने १२ आठवड्यांच्या 'हायब्रीड मोड' मध्ये दिले जाईल. यात स्थानिक इतिहास, संस्कृती, सुरक्षितता आणि एआय' तंत्रज्ञानाचा वापर शिकवला जाईल. त्याचबरोबर भारताला ग्लोबल मेडिकल टुरिझम हब बनवण्यासाठी शिक्षण आणि आरोग्याची सांगड घालण्यात आली आहे.

याखेरीज या अर्थसंकल्पामध्ये एव्हीजीसी म्हणजेच ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स क्षेत्राला ऑरेंज इकॉनॉमीचा भाग म्हणून मोठी चालना देण्यात आली आहे. भारताची सर्जनशील अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी सरकारने या क्षेत्राला राष्ट्रीय महत्त्वाचे क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या उद्योगाला २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिकांची गरज भासणार आहे, हे लक्षात घेऊन शालेय स्तरापासूनच कौशल्य विकासावर भर दिला जाणार आहे. यासाठी सरकारने देशातील १५००० माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्स उभारण्याची घोषणा केली आहे. मुंबईतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी या लॅब्स उभारण्यासाठी तांत्रिक मदत करणार आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना ॲनिमेशन गेम डिझाइन आणि डिजिटल स्टोरीटेलिंगचे प्रशिक्षण देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. सरकारचा प्रयत्न भारताला केवळ आउटसोर्सिंग हब न ठेवता कंटेंट क्रिएटर बनवण्याचा आहे. यामध्ये भारतीय संस्कृतीवर आधारित गेमिंग आणि ॲनिमेशन कंटेंट तयार करणाऱ्या स्टार्टअप्सना विशेष प्रोत्साहन दिले जाईल. या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना एआय आणि व्हर्च्युअल रिॲलिटी यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले जाईल. ऑरेंज इकॉनॉमी म्हणजे अशा उद्योगांचा समूह जो मानवी कल्पकता कला आणि बुद्धिमत्तेवर आधारित असतो. यात ॲनिमेशनसोबतच डिझाइन संगीत आणि परफॉर्मिंग आर्टसचाही समावेश होतो. या क्षेत्राला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारने पूर्व भारतात एक नवीन नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन स्थापन करण्याचीही घोषणा केली आहे.

एकूणच, उद्याच्या भारताचे भविष्य घडवणारी भक्कम पायाभरणी करणारा हा अर्थसंकल्प आहे. भारताची गेल्या दहा वर्षांपासून सुरू असलेली विकास यात्रा आधुनिक शिक्षणाच्या माध्यमातून गतिमान करण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला असून तो सामर्थ्यशाली राष्ट्रनिर्मितीला नवे आयाम देणारा ठरेल.




# शिक्षणातून विकसित भारताची पायाभरणी

भारतातील ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स या क्षेत्राचा विस्तार वेगाने होत आहे. २०३० पर्यंत या क्षेत्रात तब्बल २० लाख कुशल व्यावसायिकांची गरज भासणार असल्याचा अंदाज अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी आणि तरुणांमध्ये सर्जनशील कौशल्ये विकसित करण्यासाठी देशभरातील १५,००० माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये 'एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्स' स्थापन करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. मेक इन इंडियाच्या दृष्टिकोनातून शिक्षण व्यवस्था तयार करणे, कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि गारमेंट, जेम्स अँड ज्वेलरी, लेदर, फार्मास्युटिकल्स यांसारख्या निर्यातीच्या वाढत्या संधी असणाऱ्या क्षेत्रांमध्ये मोठी झेप घेण्यासाठीची पूर्वतयारी म्हणून डिझायनिंगचा एका वेगळ्या दृष्टिकोनातून पहिल्यांदाच विचार करण्यात आला आहे.



**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे

भारताच्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात शिक्षणाच्या माध्यमातून 'विकसित भारत २०४७'च्या दिशेने आखलेला मानवी संसाधन विकासाचा आराखडा आहे. शिक्षण, कौशल्य विकास, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, संशोधन, आरोग्यसेवा, डिझाइन आणि सर्जनशील उद्योग यांना परस्परांशी जोडत रोजगारक्षम आणि जागतिक स्पर्धेला समर्थ असे मनुष्यबळ घडविण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून दिसून येतो. पारंपरिक शिक्षणाच्या चौकटीपलीकडे जाऊन 'शिक्षण ते रोजगार आणि उद्योजकता' अशी साखळी निर्माण करण्याचा हा प्रयत्न भविष्यातील भारताच्या आर्थिक सामर्थ्याची पायाभरणी करणारा ठरू शकतो.



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी सादर केलेला २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प हा 'विकसित भारत २०४७' या केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाचा पाया भक्कम करणारा आहे. यातील तरतुदी पाहता विकसित भारताचा आधार म्हणून शिक्षण आणि कौशल्य विकासावर सर्वाधिक भर दिला जात असल्याचे दिसून येते. शिक्षणातून कौशल्य विकसन आणि त्यातून रोजगारक्षम मनुष्यबळाची निर्मिती या दिशेने टाकण्यात आलेली पावले दूरदर्शी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने आपल्या निर्यातवृद्धीकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. यासाठी विविध देशांबरोबर मुक्त व्यापार करार केले जात आहेत. अलीकडेच भारत आणि युरोपियन महासंघ यांच्यामध्ये 'मदर ऑफ ऑल डील्स' या कराराला अंतिम रुप देण्यात आले. या करारांमध्ये वस्तू आणि सेवांमधील ज्या क्षेत्रांमध्ये सर्वाधिक निर्यात करावयाची आहे, त्याची पूर्वतयारी म्हणून शिक्षणाकडे पाहिले जात आहे.

भारतामध्ये जगातील तिसऱ्या क्रमांकाची फार्मास्युटिकल इंडस्ट्री आहे. त्याचप्रमाणे जेनेरीक मेडीसीनचे सर्वाधिक उत्पादन करणारा देश म्हणून भारताचा जगात वरचष्मा आहे. आरोग्यसेवा क्षेत्रांमध्येही भारताने आपला प्रभाव जागतिक स्तरावर उमटवलेला आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पातून या तिन्ही क्षेत्रांवर अधिक भर दिला असल्याचे दिसते.

दुसरे म्हणजे आयुर्वेदोपचारांसारख्या क्षेत्रामध्ये भारताचे ऐतिहासिक काळापासून प्राविण्य आहे. ही 'सॉफ्ट पॉवर' जगभरामध्ये विस्तारण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असून त्यादृष्टीने यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये तीन केंद्रीय आयुर्वेद इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. औषधनिर्मितीच्या क्षेत्राला बळकट करण्यासाठी तीन नव्या NIPER म्हणजे राष्ट्रीय औषधनिर्माण शास्त्र शिक्षण आणि संशोधन संस्था

निर्माण करण्यात येणार आहेत. शिवाय बंगळुरुमध्ये असणाऱ्या 'नीमहांस' या मानसिक आरोग्यावर संशोधन करणाऱ्या संस्थेप्रमाणेच उत्तर भारतातही तशा प्रकारची संस्था उभी करण्यात येणार आहे.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गेल्या काही वर्षांपासून सातत्याने शिक्षण क्षेत्रामध्ये एक विसंगती निर्माण झाली होती. ती म्हणजे, पारंपरिक शिक्षण आणि उद्योगजगताची गरज यामधील अंतर. याचा परिणाम म्हणजे आज पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेऊनही अनेकांना रोजगार मिळत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने ती भरून काढण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. आता उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील संलग्नता वाढवण्यासाठी उद्योग आणि विद्यापीठे एकत्र असणारे हब बनवण्याचा निर्णय अर्थसंकल्पातून जाहीर करण्यात आला आहे. यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठित केली जाणार आहे. या माध्यमातून 'एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट आणि एंटरप्रायजेस' अशी एक शृंखला तयार करण्यात येणार आहे.

आणखी एक मुद्दा म्हणजे केंद्र सरकारने या अर्थसंकपलात ' डिझाईन' या विषयाच्या शिक्षणावर वर विशेष भर दिला आहे. यासंदर्भातील एक अद्ययावत संस्था मुंबईमध्ये उभी केली जाणार आहे. तसेच पूर्व भारतात नवीन नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन स्थापन करण्याची घोषणा केली आहे. यामुळे डिझाईन शिक्षणाचे विकेंद्रीकरण होईल. सेमीकंडक्टर, एआय, मिशन या क्षेत्रांमध्ये संशोधन आणि विकासाबरोबरच आता डिझायनिंगचा विचारही प्राधान्याने पुढे आला आहे, ही बाब देशातील सर्जनशील तरुणांसाठी महत्त्वाची ठरणार आहे. ऑरेंज इकॉनॉमीच्या दृष्टीने हा निर्णय दूरगामी परिणाम करणारा ठरणार आहे. तसेच या माध्यमातून शिक्षणाला व्यावसायिक रुप देण्याचा प्रयत्न अर्थमंत्र्यांनी केला आहे.

भारतातील ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेट्स, गेमिंग आणि कॉमिक्स या क्षेत्राचा विस्तार वेगाने होत आहे. २०३० पर्यंत या क्षेत्रात तब्बल २० लाख कुशल



व्यावसायिकांची गरज भासणार असल्याचा अंदाज अर्थमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी आणि तरुणांमध्ये सर्जनशील कौशल्ये विकसित करण्यासाठी देशभरातील १५,००० माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये 'एव्हीजीसी कंटेंट क्रिएटर लॅब्स' स्थापन करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. मेक इन इंडियाच्या दृष्टिकोनातून शिक्षण व्यवस्था तयार करणे, कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि गारमेंट, जेम्स अँड ज्वेलरी, लेदर, फार्मास्युटिकल्स यांसारख्या निर्यातीच्या वाढत्या संधी असणाऱ्या क्षेत्रांमध्ये मोठी झेप घेण्यासाठीची पूर्वतयारी म्हणून डिझायनिंगचा एका वेगळ्या दृष्टिकोनातून पहिल्यांदाच विचार करण्यात आला आहे.

याखेरीज सरकारने सध्याच्या 'नॅशनल कौन्सिल फॉर हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेनॉलॉजी'चे श्रेणीवर्धन करून त्याचे रूपांतर 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉस्पिटॅलिटी' मध्ये करण्याचा प्रस्ताव या अर्थसंकल्पातून मांडला आहे. ही संस्था शैक्षणिक क्षेत्र, उद्योग आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून काम करणार असून त्या माध्यमातून जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध होणार आहे. तसेच पर्यटनाचा दर्जा उंचावण्यासाठी २० नामांकित पर्यटन स्थळांवर १०,००० मार्गदर्शकांना प्रशिक्षित करण्यासाठी एक पथदर्शी योजना सुरू केली जाणार आहे. यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सहकार्याने हायब्रीड मोडमध्ये १२ आठवड्यांचा मानक कोर्स राबवण्यात येणार आहे. पर्यटन हे देशाच्या आर्थिक विकासामध्ये योगदान देणारे एक महत्त्वाचे क्षेत्र असून त्यामध्ये अमाप संधी दडलेल्या आहेत. विशेष म्हणजे या क्षेत्रामध्ये रोजगारनिर्मितीची क्षमता मोठी आहे. कोरोनोत्तर काळात वाढलेला पर्यटनाचा वेग येणाऱ्या काळातही कायम राहणार आहे. त्यादृष्टीने या निर्णयाकडे पाहावे लागेल.

एकूणच, शिक्षणाला व्यावसायिक रूप देणे ही काळाची गरज आहे आणि त्या दृष्टिकोनातून या अर्थसंकल्पाने एक दूरगामी पायाभरणी केली आहे. तथापि, चीन, जपान आदी देशांच्या तुलनेत आपल्याकडे जीडीपीच्या तुलनेत शिक्षणासाठी केली जाणारी तरतूद कमी राहिली आहे. मात्र गेल्या अर्थसंकल्पापासून विकसित भारताच्या दृष्टीकोनातून शिक्षणाकडे पाहिले जात असून यासाठी विविध माध्यमातून केल्या जाणाऱ्या तरतुदी वाढत आहेत.




# गुणवत्ता मापनाची प्रभावी यंत्रणा

NIRF रँकिंग फ्रेमवर्क हे भारतीय उच्च शिक्षणातील गुणवत्ता तपासण्याचे एक अत्यंत प्रभावी आणि विश्वासार्ह माध्यम आहे. हे केवळ क्रमवारी देत नाही, तर संस्था सुधारण्यासाठी दिशा देते, विद्यार्थ्यांना योग्य निवड करण्यात मदत करते आणि शिक्षण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता निर्माण करते. आजच्या स्पर्धात्मक युगात संस्थेच्या नावापेक्षा तिची शैक्षणिक कामगिरी आणि विद्यार्थ्यांच्या मनात त्यामुळे निर्माण झालेला विश्वास फार महत्त्वाचा आहे.



**प्रा. डॉ. सुनील भिरूड**
कुलगुरू, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

शाश्वत... 

सातत्यपूर्ण विकास हे मानवी प्रगतीचे एक महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे. कोणत्याही देशाच्या उन्नतीचा आलेख मोजण्यासाठी विविध निकषांचा वापर केला जातो. त्या दृष्टीने, उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. जागतिक पातळीवर देशाचे स्थान भक्कम करण्यासाठी अशा संस्थांचे योगदान निर्णायक असते.

आजच्या स्पर्धात्मक शैक्षणिक युगात संस्थेचे नाव, जुनी ओळख यापेक्षा प्रत्यक्ष शैक्षणिक कामगिरी, संशोधनातील योगदान आणि विद्यार्थ्यांवरील परिणाम यांना अधिक महत्त्व दिले जाते.

या पार्श्वभूमीवर, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने भारतातील उच्च शिक्षण संस्थांचा दर्जा उंचावण्यासाठी आणि त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी 'राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखडा' (NIRF) ही मूल्यांकन पद्धती अवलंबली आहे. २०१६ पासून कार्यरत असलेली ही प्रणाली केवळ संस्थांच्या कार्याचा संख्यात्मक आणि गुणात्मक आढावा घेणारी एक प्रभावी मानांकन यंत्रणा म्हणूनही ओळखली जाते.

या उपक्रमांतर्गत विद्यापीठ, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, कायदा, महाविद्यालय, दंतवैद्यकीय, संशोधन, मुक्त विद्यापीठ, कौशल्य विकास, कृषी, शाश्वत विकास उद्दिष्टे आणि वास्तुकला अशा विविध क्षेत्रांतील संस्थांचे स्वतंत्रपणे मूल्यांकन केले जाते. प्रत्येक गटासाठी दरवर्षी स्वतंत्र क्रमवारी जाहीर केली जाते.

या रँकिंग प्रणालीचे वैशिष्ट्य असे की, ती संस्थांचे मूल्यांकन पाच व्यापक निकषांच्या आधारे करते. त्यात संस्थेच्या केवळ बाह्य प्रतिमेसह तिच्या अंतर्गत शैक्षणिक रचनेचा आणि परिणामांचा विचार केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना योग्य संस्था निवडण्यास मदत होते, संस्थांना स्वतःच्या उणिवा ओळखता येतात आणि संपूर्ण उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये गुणवत्तावृद्धीची स्पर्धा निर्माण होते.

## NIRF चे उद्दिष्ट आणि महत्त्व

NIRF रँकिंगचा उद्देश केवळ क्रमांक देणे एवढाच मर्यादित नाही. या प्रणालीमागे शैक्षणिक पारदर्शकता निर्माण करणे, संस्थांमध्ये गुणवत्ता सुधारण्याची प्रेरणा देणे, संशोधनाला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांना माहितीपूर्ण निवड करण्यास मदत करणे हा व्यापक हेतू आहे. जेव्हा संस्थेला हे समजते की, आपली कामगिरी राष्ट्रीय पातळीवर मोजली जाणार आहे, तेव्हा त्या त्या अध्यापन, पायाभूत सुविधा, संशोधन, रोजगारसंधी आणि समावेशकता यांवर अधिक भर देतात. त्यामुळे ही प्रणाली स्पर्धात्मक असूनही सुधारकाची भूमिका बजावते.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सुद्धा NIRF क्रमवारी उपयुक्त आहे, कारण उच्च शिक्षणासाठी संस्था निवडताना अनेक घटकांचा विचार करावा लागतो. केवळ प्रवेश मिळण्यापेक्षा संभाव्य संस्था भविष्यातील करिअरसाठी किती सक्षम आहे, हे देखील महत्त्वाचे ठरते. त्या अर्थाने NIRF क्रमवारी ही केवळ प्रशासनासाठी नव्हे, तर विद्यार्थी, पालक, संशोधक, शिक्षक आणि उद्योगक्षेत्र यांच्यासाठीही महत्त्वाची माहिती देते.

२०२५ साली या सर्व गटांतील अव्वल १०० संस्थांची क्रमवारी ४ सप्टेंबर २०२५ रोजी जाहीर करण्यात आली. यात आयआयटी मद्रासने सलग सातव्या वर्षी अव्वल स्थान पटकावले, तर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूरू हे सर्वोत्तम विद्यापीठ ठरले. या निष्कर्षांच्या आधारे, विशेषतः अभियांत्रिकी क्षेत्रातील मानांकनाचा विचार केला असता काही महत्त्वाचे मुद्दे पुढे येतात. या मुद्द्यांचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे, कारण ते केवळ संस्थांच्या क्रमवारीवर परिणाम करत नाहीत, तर एकूणच अभियांत्रिकी शिक्षणाच्या गुणवत्तेचे दिशादर्शक ठरतात.

अभियांत्रिकी गटातील या मानांकनात सुमारे ५० टक्के संस्था या राष्ट्रीय प्राधान्याच्या असून त्यांना केंद्र सरकारकडून आर्थिक पाठबळ मिळते. सुमारे ३० टक्के संस्था या अनुदानित विद्यापीठे किंवा संलग्न महाविद्यालयांच्या स्वरूपातील आहेत. तर उर्वरित जवळपास २० टक्के खासगी विद्यापीठे व संस्था असून त्यांनीही या स्पर्धेत आपले ठोस स्थान निर्माण केले आहे. सर्व प्रकारच्या संस्थांच्या क्रमवारीत होणारे बदल हे सूक्ष्म आणि परस्परांशी निगडित घटकांवर अवलंबून असतात. विविध पैलूंचा समतोल विचार करूनच अंतिम क्रमवारी निश्चित केली जाते.

NIRF अंतर्गत अभियांत्रिकी संस्थांचे मानांकनाचे पाच प्रमुख निकष असून याद्वारे शैक्षणिक आणि कार्यक्षमतेचा सर्वंकष आढावा घेण्यात येतो. हे निकष संस्थेची एकूण गुणवत्ता आणि कामगिरी दर्शवतात. यात ३० टक्के गुणभार असलेला अध्यापन व संसाधने (Teaching, Learning and Resources - TLR) हा भाग विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, शिक्षकांची पात्रता आणि उपलब्ध सुविधा यांचा विचार करतो. तसेच ३० गुणभार असलेला संशोधन (Research and Professional Practice - RP) हा भाग संशोधन लेख, त्यांची गुणवत्ता, पेटंट्स, संशोधनासाठी मिळणारा निधी आणि उद्योगांसोबतचे काम यावर आधारित असतो. २० गुणभार असलेला पदवी परिणाम (Graduation Outcomes - GO) विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, त्यांचे वेतन, तसेच पुढील शिक्षणासाठी जाण्याचे प्रमाण यावर आधारित असतो. उर्वरित १०% + १०% गुणभार असलेले सर्वसमावेशकता (Outreach and Inclusivity - OI) आणि संस्थेची प्रतिमा (Perception - PR) हे निकष विविधता, सुविधा आणि संस्थेची बाहेरची ओळख व प्रतिष्ठा यांचा विचार केला जातो.

या सर्व निकषांद्वारे विद्यार्थ्यांची संख्या, अध्यापनाचा दर्जा, संशोधनाची व्याप्ती, रोजगार व उच्च शिक्षणाच्या संधी, तसेच सामाजिक समावेशकता आणि संस्थेची प्रतिमा अशा विविध पैलूंचा समतोल विचार केला जातो. विशेष म्हणजे, अध्यापन-अध्ययन व संशोधन (TLR + RP) या दोन निकषांना मिळून सुमारे ६० टक्के गुणभार दिला जातो, तर उर्वरित ४० टक्के गुण पदवी परिणाम, सर्वसमावेशकता आणि प्रतिमा या निकषांना दिले जातात. त्यामुळे गुणवत्तावाढीसाठी पहिल्या दोन घटकांवर विशेष भर देणे आवश्यक ठरते.

## निकष १ : अध्यापन, शिक्षणपद्धती आणि संसाधने

हा निकष संस्थेच्या शिक्षणाच्या गुणवत्तेचा पाया आहे. यात शिक्षकांची पात्रता व अनुभव, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, अध्यापन पद्धती, प्रयोगशाळा, ग्रंथालये, डिजिटल सुविधा आणि इतर उपलब्ध संसाधने यांचा विचार केला जातो. साध्या भाषेत सांगायचे तर, चांगले शिक्षक आणि योग्य सुविधा नसतील तर दर्जेदार शिक्षण शक्यच नाही. त्यामुळे हा सर्वात महत्त्वाचा घटक मानला जातो.

यात फक्त शिक्षकांची संख्या महत्त्वाची नाही तर त्यांची गुणवत्ता, संशोधनाची आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची क्षमता देखील तितकीच महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी चांगले वातावरण मिळते का, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो का, यालाही महत्त्व दिले जाते.

अव्वल संस्थांमध्ये साधारणपणे १०,००० पेक्षा जास्त विद्यार्थीसंख्या असते, त्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या संतुलित पद्धतीने




वाढवणे आवश्यक ठरते, मात्र केवळ UG/PG विद्यार्थ्यांपेक्षा पीएचडी विद्यार्थ्यांची संख्या वाढवणे अधिक महत्त्वाचे असते, कारण त्यातून संशोधनाला चालना मिळते. यासोबतच शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर साधारण १:१५ राखणे गरजेचे आहे, अन्यथा शिक्षणाचा दर्जा व वैयक्तिक मार्गदर्शनावर परिणाम होतो. उत्तम गुणवत्तेसाठी बहुसंख्य शिक्षक पीएचडीधारक (साधारण ९०-९५ टक्के) असणे आणि त्यांच्या अनुभवामध्ये संतुलन राखणेही तितकेच आवश्यक आहे. अनुभवी शिक्षक निवृत्त होत असताना योग्य वेळी नवीन गुणवत्तापूर्ण शिक्षकांची भरती करणे महत्त्वाचे ठरते. याबरोबरच संस्थेकडे उपलब्ध असलेल्या आर्थिक संसाधनांचा योग्य व प्रभावी वापर करणे आवश्यक असून, प्रयोगशाळा, उपकरणे व इतर सुविधा यासाठीचा खर्च तसेच दैनंदिन खर्च यांचा योग्य समतोल राखणे महत्त्वाचे आहे. NIRF मध्ये 'प्रति विद्यार्थी खर्च' हा महत्त्वाचा निकष असल्यामुळे खर्चाची रक्कम नव्हे तर त्याचा परिणामकारक वापर अधिक महत्त्वाचा ठरतो.

### निकष २: संशोधन आणि व्यावसायिक पद्धती

संशोधन आणि व्यावसायिक कार्यपद्धती हा NIRF मधील अत्यंत महत्त्वाचा निकष असून, तो संस्थेची ज्ञाननिर्मितीची क्षमता दर्शवतो. यात संशोधन प्रकाशनांची संख्या व गुणवत्ता, त्यांना मिळणारे citations (संदर्भनोंदी), पेटंट्स, संशोधनासाठी मिळणारा निधी आणि उद्योगांसोबतचे काम यांचा विचार केला जातो. केवळ जास्त प्रमाणात संशोधन निबंध प्रसिद्ध करणे पुरेसे नसून ते दर्जेदार आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त जर्नल्समध्ये प्रकाशित होणे आवश्यक असते. संशोधनाचा प्रभाव citations वरून ठरतो, त्यामुळे गुणवत्तेला अधिक महत्त्व दिले जाते. पेटंट्स दाखल करणे व मंजूर करून घेणे हे संस्थेच्या नवोन्मेष क्षमतेचे द्योतक आहे. तसेच संशोधन प्रकल्पांमधून मिळणारा निधी आणि सल्लागार सेवांमधून होणारे उत्पन्न हेही महत्त्वाचे घटक आहेत. उद्योग - शैक्षणिक सहकार्य वाढवून अधिक प्रकल्प आणि कन्सल्टन्सी मिळवणे आवश्यक ठरते. एकंदरीत, सातत्यपूर्ण आणि दर्जेदार संशोधन, पेटंट्सची वाढ आणि उद्योगाशी मजबूत संबंध यांमुळे संस्थेची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा उंचावते.

### निकष ३ : पदवीदेय परिणाम - विद्यार्थ्यांची प्रगती व परिणाम

पदवी परिणाम हा NIRF मधील तिसरा महत्त्वाचा निकष असून, तो विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष यशावर आधारित असतो. म्हणजेच संस्थेतून बाहेर पडलेले विद्यार्थी नोकरी मिळवतात का, पुढील शिक्षण घेतात का किंवा उद्योजक बनतात का, हे यात पाहिले जाते. यामध्ये प्लेसमेंटची टक्केवारी, उच्च शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी, त्यांना मिळणारे सरासरी वेतन, तसेच वेळेत पदवी पूर्ण करणाऱ्यांची संख्या यांना महत्त्व दिले जाते. विशेषतः प्लेसमेंट आणि उच्च शिक्षणासाठी ४० गुण, वेळेत पदवी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १५ गुण, सरासरी वेतनासाठी २५ गुण आणि पीएचडी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २० गुण दिले जातात. चांगल्या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार नोकऱ्या, अधिक वेतन आणि उच्च शिक्षणाच्या चांगल्या संधी मिळतात, हे त्यांच्या गुणवत्तेचे द्योतक असते. तसेच विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण वेळेत पूर्ण करणे

आणि पीएचडी करणाऱ्यांची संख्या वाढणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. थोडक्यात, विद्यार्थ्यांचे करिअर किती यशस्वी होते यावर संस्थेची खरी गुणवत्ता ठरते आणि त्यामुळे या निकषाला NIRF मध्ये विशेष महत्त्व दिले जाते.

### निकष ४: शिक्षणसंस्थेचे बाह्यजगताशी नाते आणि सर्व-समावेशकता

सर्वसमावेशकता हा NIRF मधील चौथा महत्त्वाचा निकष असून, शिक्षण सर्व घटकांसाठी खुले आणि समान संधी देणारे आहे का हे यात पाहिले जाते. यामध्ये विविध राज्यांतील आणि देशांतील विद्यार्थ्यांचा सहभाग, महिला विद्यार्थी व प्राध्यापकांचे प्रमाण, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना दिले जाणारे साहाय्य, तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा यांचा विचार केला जातो. भौगोलिक वैविध्यामुळे संस्थेचे वातावरण अधिक समृद्ध होते आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यापक दृष्टिकोन विकसित होतो. त्याचप्रमाणे महिला सहभाग वाढवणे, त्यांना नेतृत्वाच्या संधी देणे आणि किमान संतुलित प्रतिनिधित्व राखणे हेही महत्त्वाचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शुल्कमाफीसारख्या योजनांद्वारे शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही संस्थेची सामाजिक जबाबदारी आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प, लिफ्ट, सुलभ सुविधा यांसारखी अडथळामुक्त व्यवस्था असणे आवश्यक आहे. एकंदरीत, संस्था जितकी सर्वसमावेशक असेल, तितकी तिची सामाजिक आणि शैक्षणिक गुणवत्ता अधिक सशक्त मानली जाते.

### निकष ५: शिक्षणसंस्थेची प्रतिमा

पाचवा निकष म्हणजे संस्थेची सार्वजनिक आणि व्यावसायिक प्रतिष्ठा. विद्यार्थी, पालक, शिक्षक, नियोक्ते, संशोधक आणि शैक्षणिक वर्तुळ यांच्यात संस्थेबद्दल किती विश्वास आहे, हे या निकषात मोजले जाते. अनेकदा दोन संस्थांचे शैक्षणिक गुण जवळपास सारखे असतात, अशा वेळी प्रतिष्ठा किंवा सामाजिक ओळख हा फरक निर्माण करणारा घटक ठरतो.

प्रतिष्ठा सहज तयार होत नाही. ती वर्षानुवर्षांच्या दर्जेदार कामगिरीतून, उत्तम निकालांतून, संशोधनातील यशातून आणि उद्योगजगताशी असलेल्या दृढ संबंधांतून तयार होते. अव्वल स्थान मिळवलेल्या संस्थांची प्रतिमा केवळ राष्ट्रीय

## निष्कर्ष

*राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या संस्थांच्या यशामागे विविध कारणे असतात. केंद्र सरकारकडून मिळणारा व्यापक आणि सातत्यपूर्ण निधी, त्याचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक सुविधा, कुशल अध्यापक-कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा ठोस उपयोग हे त्यातील मुख्य घटक आहेत. नव्याने उदयास येणारी खाजगी विद्यापीठे आणि इतर संस्था या घटकांवर लक्ष केंद्रित करून व्यावसायिक यंत्रणा वापरतात आणि यशस्वी होतात. संशोधनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, प्रत्येक अध्यापकाला निश्चित जबाबदारी देणे आणि ध्येय स्पष्ट करणे या उपाययोजना संस्थेला अधिक सक्षम बनवतात. अनुदानित संस्था काही बाबतीत मागे राहिल्या असल्या, तरी योग्य प्रशासकीय व आर्थिक मदत मिळाल्यास त्याही यशस्वी होऊ शकतात.*

*एकूणच पाहिले असता, NIRF रँकिंग फ्रेमवर्क हे भारतीय उच्च शिक्षणातील गुणवत्ता तपासण्याचे एक अत्यंत प्रभावी आणि विश्वासार्ह माध्यम आहे. हे केवळ क्रमवारी देत नाही, तर संस्थांना सुधारण्यासाठी दिशा देते, विद्यार्थ्यांना योग्य निवड करण्यात मदत करते आणि शिक्षण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता निर्माण करते. शिक्षण, संशोधन, पदवी निष्पत्ती, समावेशकता आणि प्रतिष्ठा या पाच स्तंभांवर उभे असलेले हे फ्रेमवर्क संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे आहे. भविष्यातही भारतातील उच्च शिक्षण अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि जागतिक दर्जाचे व्हावे यासाठी NIRF सारख्या प्रणालींची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहील.*

स्तरावरच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही मजबूत असते.

शिक्षणसंस्थेची एकंदर प्रतिमा ही समाजात आणि उद्योगजगतात तिच्या मान्यतेवर आधारित असते आणि ही प्रतिमा संस्थेच्या गुणवत्तेच्या द्योतक म्हणून रँकिंगमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. ही प्रतिमा संस्थेच्या खालील घटकांवर अवलंबून असते :-

- **शैक्षणिक गुणवत्ता आणि अध्यापकांची कार्यक्षमता -** संस्थेच्या शिक्षणाचा दर्जा आणि शिक्षकांचे कौशल्य विद्यार्थ्यांच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.
- **विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास-** शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्त्व विकास, क्रीडा-कला, सांस्कृतिक आणि उद्यमशीलता क्षेत्रातील सहभाग.
- **उद्योगजगत आणि समाजाशी संवाद-** उद्योगविश्वातील संलग्नता, प्रकल्प, संशोधन, इंटर्नशिप, शिष्यवृत्ती आणि विविध सामाजिक उपक्रम.

संस्थेच्या बाह्य प्रतिमेचा विचार करताना यापैकी सर्व घटकांचा समावेश केला जातो. उद्योगजगत आणि समकक्ष शैक्षणिक संस्थांशी असलेला संवाद, विचारविनिमय, साहित्य आणि तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण या माध्यमातून संस्थेची प्रतिष्ठा उंचावते. विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण, उद्योगातील अडचणी सोडवण्यासाठी संस्थेचे योगदान, शिक्षक आणि तांत्रिक साहाय्य यांचा समावेश या प्रतिमेत होतो.

संस्थेच्या रँकिंगसाठी लागणारी सर्व आकडेवारी मुख्यतः मागील तीन वर्षांच्या सरासरीवर आधारित असते. याचा अर्थ असा की, आज सुधारणा करण्यासाठी प्रयत्न सुरू केल्यास, त्याचे प्रत्यक्ष परिणाम रँकिंगमध्ये दिसून येण्यासाठी किमान २ ते ३ वर्षांचा कालावधी लागतो.

मागील वर्षाच्या NIRF निकालांमध्ये काही स्पष्ट प्रवृत्ती दिसून आल्या. आयआयटी मद्रासने एकूण क्रमवारीत आपले पहिले स्थान कायम राखले, तर IISc बंगळुरूने विद्यापीठे आणि संशोधन संस्था या श्रेणींमध्ये आघाडी कायम ठेवली.




व्यवस्थापन, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि महाविद्यालयीन श्रेणींमध्येही दीर्घकाळ सातत्याने उत्कृष्टता दाखवणाऱ्या संस्था वरच्या स्थानांवर राहिल्या. यावरून हे स्पष्ट होते की, NIRF केवळ एका वर्षातील यश मोजत नाही, तर सातत्यपूर्ण दर्जा, स्थिरता आणि संस्थात्मक परिपक्वता यांनाही महत्त्व देते.

अव्वल ५० मध्ये स्थान मिळवलेल्या संस्था बहुतेक वेळा सर्व निकषांमध्ये संतुलित कामगिरी करतात. त्यांच्याकडे चांगले शिक्षक, सक्रिय संशोधन वातावरण, सक्षम विद्यार्थ्यांची निवड, उत्तम रोजगार संधी आणि व्यापक सामाजिक ओळख असते. त्यामुळे NIRF मधील वरचे स्थान हे केवळ गुणवत्तेचे नव्हे, तर व्यवस्थापन, धोरण आणि दूरदृष्टीचेही प्रतीक असते.

रँकिंगमध्ये विविध क्षेत्रांसाठी खालील कालखंडांचा विचार केला जातो:

- **आर्थिक संसाधने (Financial Resources):** संस्थेच्या रँकिंगमध्ये आर्थिक क्षमता आणि तिचा योग्य वापर अत्यंत महत्त्वाचा आहे. यामध्ये प्रामुख्याने प्रयोगशाळा संसाधने (Lab Resources), संशोधन कार्य (Research) आणि सल्लागार सेवा (Consultancy) यांवरील खर्च आणि त्यातून मिळणारे उत्पन्न विचारात घेतले जाते. प्रयोगशाळांमध्ये अद्ययावत उपकरणे असणे, संशोधनासाठी निधी उपलब्ध करणे आणि उद्योगांना तांत्रिक सल्ला देऊन महसूल मिळवणे ही संस्थेच्या आर्थिक सक्षमतेची लक्षणे आहेत. यासाठी मागील तीन आर्थिक वर्षांच्या (Financial Year) खर्चाची सरासरी आधार म्हणून घेतली जाते.

- **शैक्षणिक बाबी (Academic Related Matters):** प्रवेश, निकाल आणि इतर शैक्षणिक कामगिरीसाठी मागील तीन शैक्षणिक वर्षांचा (Academic Year) डेटा वापरला जातो.

- **संशोधन आणि पेटंट्स (Patents, Publications & Citations):** संशोधनाच्या गुणवत्तेचे मापन करण्यासाठी मागील तीन 'कॅलेंडर वर्षांतील' (Calendar Years) डेटा आधार म्हणून घेतला जातो.

शैक्षणिक संस्थांचे रँकिंग एक सातत्यपूर्ण आणि दूरदृष्टीने केलेली प्रक्रिया आहे. आज सुरू केलेल्या सुधारणा २ ते ३ वर्षांनंतरच परिणामकारक ठरतात. योग्य नियोजन, आधुनिक संसाधने, उच्च दर्जाचे शिक्षण, संशोधन आणि सर्वसमावेशकता यावर लक्ष केंद्रित करून संस्था आपल्या रँकिंगमध्ये सतत सुधारणा करू शकते. म्हणजेच अव्वल १०० मध्ये स्थान मिळवणे हे केवळ प्रयत्नांचे नव्हे, तर शिस्तबद्ध शैक्षणिक संस्कृतीचे फलित असते.




# उद्योजकता विकासाच्या दिशेने एक पाऊल

आज देशात स्टार्टअप परिसंस्था (Startup Ecosystem) झपाट्याने विस्तारत आहे. तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता, सर्जनशीलता आणि तांत्रिक प्रावीण्य असले तरी त्याला उद्योगरूप देण्यासाठी आवश्यक असलेली संरचित मार्गदर्शन प्रणाली उपलब्ध झाल्यास या परिसंस्थेमधून काही ठोस आकाराला येऊ शकते. त्या दिशेने टाकलेले पाऊल म्हणून भाऊ इन्स्टिट्यूट सोबत झालेल्या सामंजस्य कराराकडे बघायला हवे.



**प्रा. प्रमोद नाईक**
संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

महाराष्ट्र राज्यातील पदविका स्तरावरील तंत्रशिक्षण हा राज्याच्या औद्योगिक, तांत्रिक आणि आर्थिक विकासाचा पाया आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, उत्पादन, सेवा आणि डिजिटल क्षेत्रात आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर पदविका शिक्षणातून तयार होते. या पदविका तंत्रशिक्षण व्यवस्थेचे नियमन करणारे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (Maharashtra State Board of Technical Education - MSBTE), मुंबई हे राज्य शासनाचे स्वायत्त मंडळ असून अभ्यासक्रम रचना, परीक्षा प्रणाली, गुणवत्ता नियंत्रण आणि शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी या माध्यमातून तंत्र शिक्षणाचा दर्जा सातत्याने उंचावण्याचे कार्य करते.

जागतिकीकरण, डिजिटलायझेशन आणि इंडस्ट्री ४.० च्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षणासमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. केवळ कौशल्याधारित प्रशिक्षण पुरेसे न राहता विद्यार्थ्यांमध्ये नावीन्यपूर्ण विचारसरणी (Innovation Mind-set), उद्योजकीय विचारप्रणाली(Entrepreneurial Thinking) आणि समस्या-निराकरण दृष्टिकोन (Problem-Solving Approach) विकसित करणे अत्यावश्यक झाले आहे. 'नोकरी शोधणारा' (Job Seeker) पासून 'नोकरी निर्माण करणारा' (Job Creator) कडे होणारी मानसिकतेतील परिवर्तनप्रक्रिया शिक्षण व्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय शक्य नाही. या व्यापक दृष्टिकोनातून, श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मंडळाच्या प्रशासन मंडळ (Governing Board) व प्रशासकीय परिषदेच्या (Governing Council) सदस्यांच्या सक्रिय सहभागामुळे, MSBTE ने Bhau Institute of Innovation, Entrepreneurship and Leadership, COEP Technological University, पुणे यांच्या सोबत दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी सामंजस्य करार (MoU) केला आहे. तांत्रिक शिक्षणात उद्योजकतेचा समावेश करण्याची आवश्यकता दादांनी अधोरेखित करून या उपक्रमास नवीन दिशा दिली, तर मंडळाच्या प्रशासन मंडळ व प्रशासकीय परिषदेच्या सन्माननीय सदस्यांनी या संकल्पनेला सकारात्मक प्रतिसाद देत सामंजस्य करारास प्रोत्साहन व मान्यता दिल्याने हा उपक्रम संस्थात्मक स्वरूपात साकार होऊ शकला आहे.

आज देशात स्टार्टअप इको सिस्टीम झपाट्याने विस्तारत आहे. तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कल्पकता, सर्जनशीलता आणि तांत्रिक प्रावीण्य असले तरी, त्याला उद्योगरूप देण्यासाठी आवश्यक असलेली संरचित मार्गदर्शन प्रणाली सर्वत्र उपलब्ध नसते. विशेषतः ग्रामीण भागातील तंत्रनिकेतन संस्थांमध्ये उद्यमपोषण (Incubation), मार्गदर्शन (Mentorship) आणि उद्योग संपर्क (Industry Linkage) या बाबींची उणीव जाणवते.

पदविका स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव, उत्पादन प्रक्रियेचे ज्ञान आणि तांत्रिक कौशल्ये असतात. योग्य दिशा आणि पाठबळ मिळाल्यास हे विद्यार्थी स्थानिक तसेच राज्यस्तरीय उद्योगनिर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यामुळे संस्थात्मक स्तरावर उद्योजकीय परिसंस्था (Entrepreneurial Ecosystem) निर्माण करणे ही काळाची गरज होती.




## भाऊ इन्स्टिट्यूट : इनोव्हेशन ते कमर्शियलायझेशनपर्यंतचा प्रवास

भाऊ इन्स्टिट्यूट ही इनोव्हेशन, आंत्रप्रेन्युअरशिप आणि लीडरशिप विकासासाठी कार्यरत असलेली संस्था आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना संकल्पनेपासून उद्योगरूप देण्यापर्यंतचा संपूर्ण प्रवास सुलभ करण्यासाठी संस्थेने संरचित प्रणाली (Structured System) विकसित केली आहे.

या प्रणालीमध्ये पुढील टप्प्यांचा समावेश आहे.

- कल्पना ओळख आणि समस्या मांडणी (Idea Identification and Problem Mapping)
- व्यवहार्यता विश्लेषण आणि बाजारपेठ चाचणी (Feasibility Analysis and Market Validation)
- प्रारूप विकास साहाय्य (Prototype Development Support)
- व्यवसाय आराखडा रचना आणि आर्थिक नियोजन (Business Model Design and Financial Planning)
- बौद्धिक संपदा हक्क मार्गदर्शन (IPR - Intellectual Property Rights)
- कंपनी नोंदणी आणि कायदेशीर अनुपालन साहाय्य (Company Registration and Legal Compliance Support)
- निधी जोडणी आणि गुंतवणूकदार संपर्क (Funding Linkages and Investor Connect)

ही प्रक्रिया विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता त्यांना संकल्पना ते व्यापारीकरण (Concept to Commercialization) या प्रवासात सक्षम बनवते. अनुभवी मार्गदर्शक, कॉर्पोरेट नेते आणि उद्योग तज्ज्ञ (Mentors, Corporate Leaders and Industry Experts) यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांच्या कल्पनांना व्यवहार्य दिशा मिळते.

या सामंजस्य कराराअंतर्गत राज्यातील

२६ केंद्रीय संस्था (Hub Institutes) निवडण्यात आले असून त्यामध्ये १३ शासकीय, १२ खाजगी आणि १ शासकीय अनुदानित तंत्रनिकेतन संस्थेचा समावेश आहे. निवडलेल्या संस्थांमध्ये स्थानिक पातळीवर उद्यमपोषण उपक्रम (Incubation Activity) सुरू करण्यात आले आहेत. या केंद्रांद्वारे विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि स्टार्टअप पाठबळ (Startup Support) उपलब्ध होणार आहे. हा उपक्रम संस्थात्मक पातळीवर दीर्घकालीन नवोपक्रम संस्कृती (Innovation Culture) निर्माण करण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

## प्रमुख शैक्षणिक उपक्रम :-

या सामंजस्य कराराअंतर्गत विविध संरचित कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

1. जागृती आणि दिशादर्शन सत्रे (Awareness and Orientation Sessions) – उद्योजकता, स्टार्टअप परिसंस्था, व्यावसायिक संधी (Entrepreneurship, Startup Ecosystem, Business Opportunities) यांबाबत मूलभूत मार्गदर्शन.

2. सघन प्रशिक्षण शिबिरे आणि कार्यशाळा (Bootcamps and Workshops) – व्यवसाय आराखडा आराखणी, बाजारपेठ संशोधन, आर्थिक नियोजन, सादरीकरण कौशल्ये (Business Model Canvas, Market Research, Financial Planning, Pitching Skills) यावर प्रत्यक्ष प्रशिक्षण.

3. कल्पना स्पर्धा आणि तांत्रिक स्पर्धा (Idea Competitions and Hackathons) – विद्यार्थ्यांमधील नवकल्पना शोधणे आणि त्यांचे मूल्यमापन.

4. पूर्व-उद्यमपोषण आणि उद्यमपोषण साहाय्य (Pre-Incubation and Incubation Support) – निवडलेल्या कल्पनांना मार्गदर्शन, प्रारूप विकास (Mentoring, Prototype Development) आणि निधी मार्गदर्शन (Funding Guidance).

5. बौद्धिक संपदा हक्क साहाय्य (IPR Support) – पेटंट अर्ज (Patent Filing) व बौद्धिक संपदा संरक्षणाविषयी मार्गदर्शन.

6. अध्यापक सक्षमीकरण कार्यक्रम (Faculty Empowerment Programs) – अध्यापकांना उद्योजकीय मार्गदर्शक (Entrepreneurial Mentors) म्हणून सक्षम करणे.

7. इंटर्नशिप आणि उद्योग अनुभव (Internship and Industry Exposure) – विद्यार्थ्यांना स्टार्टअप व उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव.

या सर्व उपक्रमांमुळे अनुभवाधारित शिक्षणाचा (Experiential Learning) प्रभावी अवलंब होत आहे.

## पदविका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीवरील परिणाम :-

या उपक्रमामुळे पदविका तंत्रशिक्षणात पुढील सकारात्मक बदल अपेक्षित आहेत. अभ्यासक्रमातील ज्ञानाचा प्रत्यक्ष उपयोग वाढणे.

- समस्याधारित शिक्षण आणि प्रकल्पाभिमुख दृष्टिकोन (Problem-Based Learning and Project-Oriented Approach) दृढ होणे.
- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि निर्णयक्षमता विकसित होणे.
- उद्योगाशी सुसंगत कौशल्ये विकसित होणे.
- संस्थांमध्ये नवोन्मेषप्रेरित वातावरण (Innovation-Driven Environment) निर्माण होणे.

अध्यापक सक्षमीकरणामुळे कॅम्पस स्तरावर सातत्यपूर्ण मार्गदर्शन व्यवस्था निर्माण होत आहे. परिणामी, शिक्षण प्रक्रिया अधिक परिणामकारक आणि उद्योगाभिमुख होत आहे.

## सामाजिक आणि आर्थिक परिणाम :-

पदविका स्तरावरील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून येतात. स्थानिक समस्यांवर आधारित स्टार्टअप संकल्पना विकसित झाल्यास स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते. शेती, ऊर्जा, पाणी व्यवस्थापन, उत्पादन तंत्रज्ञान, डिजिटल सेवा इत्यादी क्षेत्रांत स्थानिक गरजांवर आधारित उद्योग उभे राहू शकतात.

यामुळे –

- स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्था मजबूत होईल.
- कौशल्याधारित उद्योगविकासाला चालना मिळेल.
- युवकांचे स्थलांतर कमी होईल.
- राज्याच्या औद्योगिक वृद्धीत भर पडेल.

हा उपक्रम राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया आणि आत्मनिर्भर भारत या ध्येयांशी सुसंगत आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MSBTE) आणि भाऊ इन्स्टिट्यूट यांचे सहकार्य हे उद्योजकता विकासासाठी संस्थात्मक सहयोग (Institutional Collaboration for Entrepreneurial Development) चे प्रभावी उदाहरण ठरू शकते.

ना. चंद्रकांत दादांचे धोरणात्मक नेतृत्व, मंडळाचे प्रशासन मंडळ व प्रशासकीय परिषद यांचे प्रोत्साहन आणि राज्यातील तंत्रनिकेतन संस्थांचा सक्रिय सहभाग यांच्या एकत्रित प्रयत्नांतून पदविका तंत्र शिक्षणात गुणवत्तावृद्धी आणि उद्योजकता विकासाची नवी उंची गाठली जाईल, असा ठाम विश्वास आहे. भविष्यात प्रत्येक तंत्रनिकेतन संस्था ही नवोन्मेष आणि उद्यमपोषण (Innovation and Incubation) चे केंद्र म्हणून विकसित व्हावी, प्रत्येक विद्यार्थी हा नवोन्मेषक आणि उद्योजक (Innovator and Entrepreneur) म्हणून घडावा आणि पदविका तंत्र शिक्षण राज्याच्या आर्थिक प्रगतीचे गतिमान अधिष्ठान ठरावे, हीच या उपक्रमामागील प्रेरणा आहे.




# ज्ञानाची दारे आता एका क्लिकवर!

एकेकाळी ज्ञानाच्या शोधासाठी ग्रंथालयांच्या कपाटांमध्ये तासन्तास भटकावे लागायचे. हवे ते पुस्तक मिळेलच याची खात्री नसायची. मात्र आज डिजिटल तंत्रज्ञानाने ज्ञानप्राप्तीची संकल्पनाच बदलून टाकली आहे. माहितीचा महासागर आता आपल्या बोटांच्या टोकावर आला आहे आणि या परिवर्तनात ग्रंथालयांची भूमिकाही नव्याने आकार घेत आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनालयाने 'ई-ग्रंथालय' प्रणालीचा स्वीकार करून राज्यातील शासकीय ग्रंथालयांना डिजिटल युगाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केवळ ग्रंथालय व्यवस्थापन सुलभ करण्यापुरते हे परिवर्तन मर्यादित नसून, ज्ञानापर्यंतचा प्रवेश अधिक वेगवान, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्याचा हा व्यापक प्रयत्न आहे. राज्यातील लाखो पुस्तकांचे डिजिटायझेशन, हजारो वाचकांना मिळालेली ऑनलाइन सेवा आणि भविष्यात हजारो सार्वजनिक ग्रंथालयांना एकाच ज्ञानजाळ्यात जोडण्याचे उद्दिष्ट यामुळे 'ई-ग्रंथालय' ही केवळ तांत्रिक प्रणाली न राहता ज्ञानसमृद्ध महाराष्ट्राच्या उभारणीची एक महत्त्वाकांक्षी चळवळ ठरत आहे.



**अशोक मा.गाडेकर**
ग्रंथालय संचालक,
ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला डिजिटल क्रांतीचा स्पर्श झाला असून, ज्ञानाची मंदिरे मानली जाणारी 'ग्रंथालये' तरी यापासून दूर कशी राहतील? पारंपरिक ग्रंथालयांचे स्वरूप आता झपाट्याने बदलत आहे. ही काळाची पावले ओळखून ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी आपल्या अधिपत्याखालील शासकीय ग्रंथालयांमध्ये 'ई-ग्रंथालय' (e-Granthalaya) या अद्ययावत सॉफ्टवेअर प्रणालीचा स्वीकार केला आहे. नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर (NIC) ने विकसित केलेली ही प्रणाली केवळ प्रशासकीय कामकाज सोपे करीत नाही, तर वाचकांसाठी ज्ञानाचे भांडार एका क्लिकवर खुले करून देते.

## काय आहे 'ई-ग्रंथालय' प्रणाली?

ई-ग्रंथालय ही एक 'एकात्मिक ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली' (Integrated Library Management System) आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, ग्रंथालयातील पुस्तक खरेदीपासून ते वाचकांच्या हाती पुस्तक पडण्यापर्यंतचा सर्व प्रवास आता कागदविरहित (Paperless) आणि गतिमान झाला आहे. ही प्रणाली 'क्लाउड बेस्ड' (Cloud Based - आवृत्ती ४.०) असल्यामुळे यासाठी प्रत्येक कार्यालयात वेगळ्या सर्व्हरची गरज उरलेली नाही. सर्व डेटा NIC च्या क्लाउडवर सुरक्षित राहत असल्याने स्थानिक स्तरावर माहिती गहाळ होण्याची भीती आता उरलेली नाही.

## वाचकांसाठी : एक स्मार्ट अनुभव

या प्रणालीचा केंद्रबिंदू 'वाचक' हाच आहे. पूर्वी वाचकांना हव्या असलेल्या पुस्तकासाठी रॅकमध्ये शोधाशोध करावी लागे किंवा ग्रंथालयात येऊन तालिका बघावी लागत होती व त्यानुसार ग्रंथनिवड केली जात होती. मात्र, आता 'ऑनलाइन कॅटलॉग' (OPAC) सुविधेमुळे वाचक घरबसल्या किंवा ग्रंथालयातील संगणकावरून पुस्तकाचे नाव, लेखक किंवा विषयावरून पुस्तक शोधू शकतात. आपले आवडते पुस्तक ग्रंथालयात 'उपलब्ध' आहे की दुसऱ्या कोणाकडे 'इश्यू' झाले आहे, याची माहिती क्षणात मिळते.

ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'ग्रंथशोध' हा पर्याय उपलब्ध करून दिला गेला आहे. या पर्यायावर क्लिक केल्यानंतर वाचकांनी आपल्याला हवे ते पुस्तकाचे नाव किंवा लेखक/ प्रकाशन/विषय यापैकी कोणतीही एक माहिती यात भरायची त्यावर क्लिक केल्यानंतर सदर ग्रंथ राज्यातील कोणत्या शासकीय ग्रंथालयात उपलब्ध आहे आणि त्याचा दाखल क्रमांक काय आहे, ही माहिती क्षणार्धात उपलब्ध होते. त्यायोगे वाचकांना हवा तो ग्रंथ त्वरित मिळतो, यामुळे वाचक आणि ग्रंथालय सेवकांचा वेळ वाचतो. प्रत्यक्ष ग्रंथालयात न जातादेखील ग्रंथ शोधता येतो ही महत्त्वाची बाब आहे.

ग्रंथशोध या पर्यायावर जाऊन ग्रंथ शोधण्याकरिता वरील QR कोड स्कॅन करावा



( राष्ट्रीय e –पुस्तकालयाकरिता वरील QR कोड स्कॅन करावा )

## प्रशासकीय पारदर्शकता आणि गती

प्रशासकीय दृष्टिकोनातून विचार केल्यास, या प्रणालीमुळे कामाचा चेहरामोहरा बदलला आहे. पुस्तक खरेदी (Acquisition), सूचीकरण (Cataloging), आणि नियतकालिके (Serials) यांसारख्या क्लिष्ट प्रक्रिया आता सुलभ झाल्या आहेत. बारकोड तंत्रज्ञानामुळे पुस्तकांची देवघेव (Circulation) अवघ्या काही सेकंदात होते. तसेच, ग्रंथालयातील स्टॉक व्हेरिफिकेशन आणि सांख्यिकीय अहवाल एका क्लिकवर उपलब्ध होत असल्याने मानवी चुका टळून कामात अचूकता व पारदर्शकता आली आहे.

## महाराष्ट्राची यशस्वी घोडदौड

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य (मुंबई) यांच्या अंतर्गत राज्यात मुख्य संचालनालय, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, ६ शासकीय विभागीय ग्रंथालये, ३६ जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये आणि इतर मिळून एकूण ५१ कार्यालये कार्यरत आहेत.

आजच्या घडीला यापैकी ४४ कार्यालयांमध्ये ई-ग्रंथालय प्रणाली यशस्वीपणे कार्यान्वित झाली आहे. या यशाची सांख्यिकी थक्क करणारी आहे. राज्यातील या कार्यालयांनी तब्बल ४१,८८,५३७ (सुमारे ४१ लाख) पुस्तकांचे डेटा एन्ट्री चे काम पूर्ण केले आहे. आजमितीस ३०,४६० नोंदणीकृत सभासद या ऑनलाइन ग्रंथ देवघेव सेवांचा लाभ घेत आहेत.






### दृष्टिक्षेपात ई-ग्रंथालय यशोगाथा

- एकूण कार्यान्वित कार्यालये: ४४
- डेटाबेस ग्रंथसंपदा: ४१,८८,५३७ (४१ लाखांहून अधिक पुस्तके)
- एकूण ई-सभासद: ३०,४६०
- पुढील लक्ष्य: ११,१५५ सार्वजनिक ग्रंथालये (अ,ब,क,ड अशा एका एका टप्प्याने)

### भविष्यातील वाटचाल : सार्वजनिक ग्रंथालयांचे सक्षमीकरण

आपण ४४ कार्यालये आणि ४२ लाख पुस्तकांचा टप्पा गाठला असला, तरी हे केवळ पहिले पाऊल आहे. 'डिजिटल इंडिया' अंतर्गत शासनाच्या पुढील नियोजनानुसार, राज्यातील ११,१५५ सार्वजनिक ग्रंथालयांना (Public Libraries) टप्प्याटप्प्याने या ई-ग्रंथालय प्रणालीच्या छत्राखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे.

जेव्हा महाराष्ट्रातील गावागावांत वसलेली ही ११,००० हून अधिक सार्वजनिक ग्रंथालये एकाच धाग्याने जोडली जातील, तेव्हा ती ज्ञानाची खऱ्या अर्थाने लोकचळवळ ठरेल. ग्रामीण असो वा शहरी, प्रत्येक वाचकाला उत्तम दर्जाची, वेगवान आणि पारदर्शक सेवा सभासद वाचक यांना देण्यासाठी ग्रंथालय संचालनालय सदैव कटिबद्ध आहे. 'ई-ग्रंथालय' हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून, ती एका प्रगत आणि वाचनसमृद्ध महाराष्ट्राची नांदी आहे.




# ...तर समृद्ध होईल ग्रंथसेवा

**ज्ञान संवर्धन करण्यासाठी ग्रंथालये हे महत्त्वाचे क्षेत्र असल्यामुळे समाजात माहिती, विचार आणि ज्ञान याची देवघेव व्हावी यासाठी नवीनवीन मार्ग ग्रंथालयाने अनुसरले पाहिजेत. सार्वजनिक आणि शैक्षणिक ग्रंथालये यामध्ये कौशल्य, ग्रंथ संपदा आणि तंत्रज्ञान याची परस्पर देवाणघेवाण केल्यास ही दोन्ही प्रकारच्या ग्रंथालयांना केवळ फायदा होणार नाही तर वाचकांनाही त्याचा अनेक पातळ्यांवर लाभ होऊ शकतो.**

**सुनील हुसे,**
साहायक ग्रंथालय संचालक,
छत्रपती संभाजीनगर

ग्रंथालय क्षेत्र म्हणजे अमर्यादित ज्ञानक्षेत्र. या क्षेत्रात सेवा व नोकरींच्या नवनवीन संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. ग्रंथालयांचे तसे बरेच प्रकार असले तरी सार्वजनिक ग्रंथालय व शैक्षणिक ग्रंथालय या दोन प्रकारांचा वापर व उपयोगिता ही इतर ग्रंथालयांच्या तुलनेत जास्त आहे. आजमितीला भारतामध्ये जवळपास ५५००० सार्वजनिक ग्रंथालये असून त्यातील एक तृतीयांश म्हणजे जवळपास १२००० सार्वजनिक ग्रंथालये महाराष्ट्रात आहेत.

सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व प्रत्येक काळामध्ये असतेच. हे विश्व सर्वव्यापी असून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वांगीण विकासासाठी सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान हे सर्वकालीन उपयोगाचे आहे. लोकांनी लोकांसाठी लोकांमार्फत चालविले जाणारे ग्रंथालय अशी ज्यांची ख्याती आहे ते सार्वजनिक ग्रंथालय समाजाच्या व एकूणच राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये आपले शीर्षक स्थान टिकवून ठेवून आहे. शैक्षणिक ग्रंथालयामध्ये प्रामुख्याने शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालय यांचा समावेश आहे. ही ग्रंथालये त्या त्या टप्प्यावर विद्यार्थी आणि शिक्षकांच्या शैक्षणिक

विकासामध्ये आपले महत्त्व टिकवून ठेवून आहे. औपचारिक शिक्षण घेत असताना शैक्षणिक ग्रंथालयांचा खूप मोठा आधार विद्यार्थ्यांना असतो, तर अनौपचारिक शिक्षण घेत असताना सार्वजनिक ग्रंथालय त्या शिक्षणकर्त्यांसाठी मोठा आधारस्तंभ ठरत असतात.

सार्वजनिक ग्रंथालय व शैक्षणिक ग्रंथालय यांचा परस्पर संबंध खूपच उपयुक्त आहे. वाचक मग तो विद्यार्थी असो किंवा संशोधक, त्यांच्या शैक्षणिक सांस्कृतिक व सामाजिक विकासामध्ये ग्रंथालय महत्त्वपूर्ण योगदान देत असतात. वाचन संस्कृती टिकवून ती वृद्धिंगत होण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान मोलाचे असते. सार्वजनिक ग्रंथालय व शैक्षणिक ग्रंथालय यांच्यातील पुस्तकसंग्रह आणि वाचक वर्ग, उपलब्ध सेवा यामध्ये फरक असला तरी या दोन्ही ग्रंथालयांचा उद्देश एकच असतो, तो म्हणजे वाचकांना साहाय्यभूत वाचन सेवा पुरविणे.

आपण सार्वजनिक ग्रंथालय आणि शैक्षणिक ग्रंथालय यांच्यातील संबंध एकमेकांना सहकार्य करून आणखी कसे दृढ करता येतील?

### १. साहित्याची देवाणघेवाण -

सार्वजनिक ग्रंथालय व शैक्षणिक ग्रंथालय यांच्यातील पुस्तक संग्रह व वाचन सेवा यामध्ये काही प्रमाणात फरक असल्यामुळे शैक्षणिक ग्रंथालयाचा वापर कर्त्यांना त्याच्या अभ्यासासाठी पूरक साहित्य म्हणून आवश्यक असणारे ग्रंथ, ललित साहित्य, संदर्भ ग्रंथ, शैक्षणिक ग्रंथालयामध्ये खूपच कमी प्रमाणात उपलब्ध असतात. त्यांची गरज सार्वजनिक ग्रंथालय निश्चितच पूर्ण करू शकतात. यासाठी या दोन्ही ग्रंथालयांनी परस्पर सामंजस्यातून अशा ग्रंथांची रीतसर पद्धतीने देवाण-घेवाण केल्यास डॉक्टर एस. आर. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीनुसार ग्रंथाला वाचक व वाचकाला ग्रंथ निश्चितच मिळू शकतो.

**२. आधुनिक सेवा/ज्ञान यांची देवाणघेवाण :** सार्वजनिक, प्रामुख्याने

।। ग्रंथ एव जीवनम् ।।

ग्रंथालय संचालनालय

महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालय यामध्ये आधुनिक साधने व सेवाही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असतात. महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालयाचे आधुनिकीकरण झालेले असल्यास सार्वजनिक ग्रंथालयातील सेवा व कर्मचारी यांच्यापेक्षा तेथील सेवा निश्चितच आधुनिक असते. सार्वजनिक ग्रंथालयातील वाचकांच्या गरजेनुसार शैक्षणिक ग्रंथालयाने या आधुनिक सेवा व आधुनिक ज्ञान यांचे शेअरिंग केल्यास वाचक वर्गांसाठी ही एक पर्वणी ठरू शकते. त्यांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होऊ शकतो.

**३. कार्यक्रमांद्वारे संबंध वृद्धिंगत करणे** : सार्वजनिक व शासकीय ग्रंथालयांतर्फे वर्षभर विभिन्न कार्यक्रमांचे आयोजन केले जात असते. शैक्षणिक ग्रंथालयामध्ये सुद्धा अशा प्रकारच्या विभिन्न कार्यक्रमाचे आयोजन केले जात असले तरी ते सार्वजनिक ग्रंथालयांच्या तुलनेने कमी असते. दोन्ही बाजूंचा विचार केल्यास काही सार्वजनिक ग्रंथालयांना कार्यक्रमांसाठी जागेची, व्याख्यानासाठी अभ्यासू व्यक्तींची कमतरता भासते, तर शैक्षणिक ग्रंथालयांना कार्यक्रम आयोजनासाठी कार्यक्रमांची व इतर बाबींची. अशावेळी परस्पर सहकार्यातून सार्वजनिक व शासकीय ग्रंथालया मार्फत शैक्षणिक कार्यक्रम संस्थांमध्ये आयोजित केल्यास ते यशस्वी होऊ शकतात. ग्रंथ यात्रा, ग्रंथोत्सव यासारखे मोठे कार्यक्रम एकत्र घेतल्यास त्यांची यशस्वीता आपण सर्वांनी अनुभवली आहेच.

**४. ग्रंथालय चळवळीच्या विकासात सहकार्य :** सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या विकासात ग्रंथालय संघाचे, जिल्हा विभाग व राज्य ग्रंथालय या संघाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. शैक्षणिक ग्रंथालयामध्ये काम करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींच्या अनुभवाचा फायदा सार्वजनिक ग्रंथालयाच्या विकासासाठी निश्चितच होऊ शकतो. यासाठी या तज्ज्ञ व्यक्तींनी सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला गतिमानता देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शैक्षणिक ग्रंथालयातील अनेक तज्ज्ञ व्यक्तींनी सार्वजनिक ग्रंथालय संघावर काम करताना आपले अनुभव व ज्ञान यांचा कौशल्यपूर्ण उपयोग करून सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला एका चांगल्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. तर शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींनी जिल्हा, विभाग व राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष स्थान भूषवून या चळवळीसाठी आपले योगदान दिले आहे.

### ५. विविध समित्यांमध्ये सहभाग :

शासनाच्या विविध विषयाच्या समित्या स्थापन करण्यात आलेल्या असतात जसे की, ग्रंथ निवड समिती, जिल्हा विभाग व राज्य ग्रंथालय समिती, नियम व अधिनियम सुधारणा समिती वगैरे. शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तीच्या समावेशामुळे या समित्यांचे कामकाज आणखी प्रभावी व यशस्वी होऊ शकते.

**६. पुरस्कार प्रदान :** ग्रंथालय चळवळ आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यात ज्या लोकांचा सहभाग, योगदान मोठे असते, त्यांना आणखी प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या कामांपासून इतरांना प्रेरणा मिळावी यासाठी शासन भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या नावे उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करीत असते. शैक्षणिक ग्रंथालयामध्ये काम करणारे अनेक ग्रंथपाल प्राध्यापक



असे आहेत की, त्यांची स्वतःची सार्वजनिक ग्रंथालय आहेत. ती ग्रंथालय चळवळीमध्ये भरीव काम करीत असतात. ती चालवणाऱ्या व्यक्तींनाही शासनाचे पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालय यांच्यामधील दृढ असलेल्या परस्पर संबंधाची ही एक मोठी पावती आहे. शैक्षणिक ग्रंथालयाच्या क्षेत्रामध्ये सुद्धा अशा प्रकारच्या काही पुरस्कारासाठी सार्वजनिक ग्रंथात काम करणाऱ्या व्यक्तींचा विचार व्हावा अशी अपेक्षा.

**७. विविध प्रशिक्षणामध्ये सहभाग** : शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर, सार्वजनिक ग्रंथालयाच्या तुलनेत लवकर करण्यात येत असतो. या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणारे जे कार्यक्रम आयोजित केले जात असतात, त्यात सार्वजनिक ग्रंथालयातील पात्र व इच्छुक कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेतल्यास त्या ग्रंथालयांना सुद्धा प्रशिक्षित मनुष्यबळ प्राप्त होऊन ही चळवळ आणखी गतिमान होऊ शकेल.

**८. ग्रंथालय शाळेच्या दारी कार्यक्रम :**

बऱ्याच शैक्षणिक संस्थांना ग्रंथालय नसतात किंवा असल्यास तिथे आवश्यक त्या प्रमाणात ग्रंथ संग्रह नसतो. सार्वजनिक ग्रंथालयांकडे ग्रंथ मोठ्या प्रमाणावर असतात, तर वाचक वर्ग नसतो. सार्वजनिक व शैक्षणिक ग्रंथालयांची ही समस्या परस्पर सहकार्यातून सहज सोडवली जाऊ शकते. यासाठी ग्रंथालय आपल्या दारी या संकल्पनेतून सार्वजनिक ग्रंथालयातील काही ग्रंथ ठराविक दिवशी शाळा महाविद्यालय यामध्ये प्रत्यक्ष आणून विद्यार्थ्यांना शिक्षकांना व आवश्यक ते ग्रंथ देऊन देण्याची योजना राबवल्यास सार्वजनिक ग्रंथालयांना वाचक मिळेल व शैक्षणिक ग्रंथालयातील विद्यार्थी शिक्षक व प्राध्यापकांना हवे ते ग्रंथ मिळतील. ही योजना मोठ्या प्रमाणावर कार्यरत असून तिला यश मिळत असल्याचे दिसून येत आहे.

**९. बहि:शाल व्याख्यानमाला :** बऱ्याच विद्यापीठामार्फत सार्वजनिक ग्रंथालयांच्या सहकार्याने खेडोपाडी विभिन्न विषयावरील बही:शाल व्याख्यान मालांचे आयोजन करण्यात येत असते. या व्याख्यानमालांद्वारे विद्यापीठातील त्या त्या विषयातील तज्ज्ञ प्राध्यापक ग्रामीण भागातील सार्वजनिक ग्रंथालयाद्वारे आयोजित व्याख्यानमाला कार्यक्रमांमध्ये विविध विषयांवर व्याख्यान देऊन प्रबोधन करीत असतात. अशा व्याख्यानमालांना प्रचंड प्रतिसाद मिळत असून शैक्षणिक ग्रंथालय व सार्वजनिक ग्रंथालय यांचा परस्पर यशस्वी संबंध अधोरेखित करणारे असे हे कार्यक्रम आहेत.

**१०. ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम:**

ग्रंथालयांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी ग्रंथालय संचालनालयाच्या वतीने दरवर्षी ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रत्येक जिल्ह्यामध्ये तेथील जिल्हा ग्रंथालय संघामार्फत राबविला जातो. या अभ्यासक्रमातील विविध विषयांचे अध्यापन करण्यासाठी महाविद्यालयीन/ विद्यापीठ ग्रंथालयातील ग्रंथपाल/ ग्रंथालयशास्त्र विभागप्रमुख यांची नियुक्ती केली जाते. हे अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी या क्षेत्रातील ज्ञानाने परिपूर्ण होऊन सार्वजनिक, शैक्षणिक व इतर ग्रंथालयांमध्ये आपली सेवा देण्यास तयार होतात.

एकूणच वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी ती वाढीस लागण्यासाठी एक सुशिक्षित व सुसंस्कृत समाज घडविण्यास हातभार लागावा यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. सार्वजनिक, शासकीय व शैक्षणिक ग्रंथालयात काम करणाऱ्या सर्वांनी या ग्रंथालयांचे परस्पर संबंध सकारात्म ठेवून ग्रंथालय चळवळीला अधिक यश प्राप्त करून देण्यासाठी कटिबद्ध राहणे ही काळाची गरज आहे.



# ६५वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन : दृश्यकलेच्या नव्या पर्वाची नांदी

महाराष्ट्राच्या दृश्यकला क्षेत्रासाठी २०२६ हे वर्ष एका महत्त्वपूर्ण टप्प्याचे साक्षीदार ठरले. सहा दशकांहून अधिक गौरवशाली परंपरा लाभलेल्या 'महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाच्या' ६५व्या पर्वाने केवळ उत्कृष्ट कलाकृतींचे दर्शन घडविले नाही, तर राज्य शासनाच्या कला क्षेत्रावरील नव्या बांधिलकीचीही प्रचिती दिली. पुरस्कारांच्या संख्येत आणि रकमेत झालेली अभूतपूर्व वाढ, ज्येष्ठ कलाकारांचा गौरव, नवोदित कलावंतांना मिळालेली व्यासपीठे आणि कलाकृतींच्या वाढत्या बाजारपेठेला मिळालेले प्रोत्साहन यामुळे हे प्रदर्शन एका वार्षिक सांस्कृतिक उपक्रमाच्या चौकटीपलीकडे जाऊन महाराष्ट्राच्या दृश्यकला विश्वातील नव्या युगाची नांदी ठरले आहे.



प्रा. शार्दुल कदम

आधुनिक भारतीय दृश्यकलेच्या जडणघडणीमध्ये महाराष्ट्राचे मोठे योगदान आहे. साधारणपणे २०व्या शतकाच्या सुरुवातीपासून मुंबईतील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधून अनेक कलाविद्यार्थी शिकून बाहेर पडले आणि कोल्हापूर, नाशिक, विदर्भ तसेच उर्वरित महाराष्ट्र येथे पांगले. इतकेच काय तर भारतभर अनेक शहरांमध्ये त्यांनी कलेचा प्रसार आणि प्रचार करत कला संस्था स्थापन केल्या. महाराष्ट्रातील अनेक संस्थानिकांनी देखील चित्रकार व शिल्पकारांना यथोचित प्रोत्साहन दिले. स्वातंत्र्यानंतर देखील महाराष्ट्र हा दृश्यकलेच्या विकासात अग्रेसर राहिला आहे. मुंबईमध्ये उदयास आलेल्या प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुप, बॉम्बे ग्रुप यासारख्या कला चळवळीतून भारतीय कलेला नवीन परिमाण लाभत गेले. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक यांसारख्या

ठिकाणी आधुनिक कलापंथांतील नवी पिढी घडत होती. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर पाच वर्षांनी चित्रकार दादा आडारकर यांच्या प्रयत्नाने महाराष्ट्रातील कला शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि कला क्षेत्राच्या विकासासाठी कला संचालनालयाची (Directorate of Art) स्थापना १९६५ मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांच्या काळात झाली. 'कला संचालनालय' हा स्वतंत्र विभाग असणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. कला अभ्यासक्रमांची आखणी करणे, परीक्षा घेणे, पदविका (Diploma) प्रदान करणे आणि राज्यस्तरीय कला स्पर्धा व प्रदर्शनांचे आयोजन करणे ही कला संचालनालयाची प्रमुख उद्दिष्टे ठरवली गेली. त्याकाळी राष्ट्रीय स्तरावर ललित कला अकादमी, बॉम्बे आर्ट सोसायटी, आर्ट सोसायटी ऑफ इंडिया आणि यासारखी इतर काही स्पर्धा प्रदर्शने महत्त्वाची मानली जात असत. महाराष्ट्र राज्य कला संचालनालयातर्फेदेखील 'महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन' व्यावसायिक विभाग आणि विद्यार्थी विभाग अशा दोन स्तरांवर प्रदर्शनांचा उपक्रम सुरू करण्यात आला. गेल्या सहा दशकांपासून 'महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन' हे कलाक्षेत्रामध्ये अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाते. अनेक प्रतिथयश कलावंत या प्रदर्शनामध्ये आवर्जून आपल्या कलाकृती स्पर्धेकरीता पाठवत असतात. या प्रदर्शनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील उदयोन्मुख कलाकारांच्या प्रतिभेला चालना मिळते. त्यांच्या कलेला मुंबईतील जहांगीर आर्ट गैलरीसारख्या प्रतिष्ठित ठिकाणी प्रदर्शित करण्याची आणि त्यानिमित्ताने कला क्षेत्रात आपली व्यावसायिक कारकीर्द अधिक बळकट करण्याची सुसंधी मिळणे शक्य होते.

२१व्या शतकात समकालीन कला प्रवाहात अनेक बदल घडत गेले आहेत. नव्या काळात अनेक कलासंस्था, कला दालने व स्पर्धा प्रदर्शने उद्यास आली; परंतु कला संचालनालयाच्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनाचे दृश्यकला जगतामधील स्थान अबाधित राहिले आहे. या प्रदर्शनामध्ये निवड झालेल्या कलाकृतींपैकी १५ उत्कृष्ट




कलाकृतींना राज्य पुरस्कार देण्यात येतो. या शतकाच्या सुरवातीस या पुरस्काराची रक्कम दहा हजार इतकी होती. २०१९ मध्ये कला जगतामधून होणाऱ्या अनेक वर्षांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यामध्ये वाढ करण्यात येऊन ती पन्नास हजार इतकी करण्यात आली. राज्यातील ज्येष्ठ व सातत्यपूर्ण कार्य करणाऱ्या कलाकारांना सन्मानित करण्याच्या हेतूने 'वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार' आणि कलावंताचा विशेष सन्मान असे दोन पुरस्कारदेखील या प्रसंगी शासनातर्फे प्रदान केले जातात.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यरत कला संचालनालयामार्फत महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक दृश्यकलाकारांसाठी आयोजित ६५वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन १० ते १६ मार्च २०२६ या कालावधीत मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये भरविले गेले. या प्रदर्शनाचे उद्घाटन आणि पारितोषिक वितरण महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या शुभहस्ते दिमाखदार सोहळ्यात पार पडले. या प्रसंगी सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट आर्किटेक्चर अँड डिझाइन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. हिम चटर्जी आणि राज्याचे कला संचालक डॉ. किशोर इंगळे, अनेक ज्येष्ठ कलावंत, कला विद्यार्थी आणि राज्यभरातून आलेले कला रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'कलावंत घडण्यासाठी मनुष्यामध्ये असामान्य आंतरिक शक्ती आणि प्रतिभा असावी लागते व या अंगभूत प्रतिभेची हेतुपुरस्सर संस्कारित अभिव्यक्ती कलावंत विशेष परिश्रम घेऊन करीत असतो. महाराष्ट्राची कला संस्कृती जागतिक स्तरावर नेण्याचे सामर्थ्य आपल्या महाराष्ट्रातील कलाकारांमध्ये आहे, याची प्रचिती आज येथील कलाकृती पाहून आली. या प्रदर्शनाच्या माध्यमातून राज्यातील कला क्षेत्राला नवी उर्जा, नवे आयाम आणि व्यापक दिशा नक्कीच लाभेल' असे प्रतिपादन श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांनी याप्रसंगी बोलताना केले. यावर्षीपासून राज्य शासनाने विद्यार्थी विभागातील पुरस्कारांची संख्या ३१ वरुन ६८ एवढी केली आहे. माननीय मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी कोणत्याही प्रकारच्या मागणीची वाट न बघता स्वत: पुढाकार घेऊन विद्यार्थी विभागाच्या एकूण पुरस्काराच्या रकमेत रु.१,७०,००० /- वरून रु.५,०८,०००/- इतकी भरघोस वाढ केलेली आहे. त्याचप्रमाणे व्यावसायिक कलाकार विभागातील पारितोषिकांची संख्या १५ असून एकूण पारितोषिक रकमेत रु.७,५०,००० – वरून रु.११,२५,००० /- इतकी भरीव वाढ केलेली आहे. याच बरोबर सत्कारमूर्तींच्या गौरव मानधनाच्या रकमेत देखील भरीव वाढ केलेली आहे. महाराष्ट्राला चंद्रकांत दादा पाटील यांच्या सारखे कलाप्रेमी व दृश्यकला जगताची गरज ओळखून स्वत:हून कलाकारांच्या हिताच्या सुधारणा राबविणारे राजकीय नेतृत्व लाभले ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. दृश्यकलेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एका थोर कलाकाराचा राज्य शासनाच्या वतीने रु.१,५०,०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून सन्मान करण्यात येतो. यावर्षी ज्येष्ठ व नामवंत कलाकार श्री. विलास शिंदे यांना शासनाच्या वतीने सन्मानित करण्यात आले. तसेच दृश्यकला क्षेत्रात अलौकिक कामगिरी करणाऱ्या कलावंताचा 'वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार' देऊन गौरव करण्यात येतो. रु.५,००,०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असते. या कार्यक्रमात सन २०२३-२४ आणि सन २०२४-२५ वर्षाकरिता अनुक्रमे ज्येष्ठ शिल्पकार किशोर ठाकूर आणि ज्येष्ठतम सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार शि. द. फडणीस

म्हणजेच शिवराम दत्तात्रेय फडणीस यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. २०२५-२६ करिता पद्मश्री सन्मानप्राप्त ज्येष्ठ व पद्मश्री सन्मानप्राप्त ख्यातनाम चित्रकार श्री. वासुदेव कामत यांना "वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार" माननीय मंत्री महोदयांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. या चारही दिग्गज कलाकाराच्या निवडक कलाकृती या प्रदर्शनात कलारसिक व कला अभ्यासकांसाठी आवर्जून प्रदर्शित आल्या होत्या. दिग्गज चित्रकार कामत यांची विलोभनीय भावपूर्ण व्यक्तिरेखामय चित्रे, श्री. फडणीस यांची आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यंगचित्रे, विलास शिंदे यांची निसर्गातून उमललेली अमूर्त चित्रे आणि शिल्पकार किशोर ठाकूर यांची दमदार सौष्ठवपूर्ण शिल्पे या निमित्ताने पाहणे, ही कला रसिकांसाठी पर्वणीच ठरली.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात गेली पाच वर्षे, कलावंतांच्या सोयीसाठी राज्य कला प्रदर्शनासाठी प्राथमिक निवडीसाठी कलाकृती ऑनला

न पद्धतीने मागविण्यात येत आहेत. या आधुनिक प्रक्रियेला राज्यभरातील कलावंत उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत. या प्रदर्शनासाठी महाराष्ट्राच्या सर्व भागांतून एकूण ९२३ कलाकारांच्या १२६६ कलाकृती प्राप्त झाल्या. त्यापैकी कसून परीक्षणानंतर २३८ कलाकृतींची निवड प्रदर्शनासाठी करण्यात आली. या कलाकृतींपैकी १५ उत्कृष्ट कलाकृतींची निवड तज्ज्ञ परीक्षकांच्या समितीद्वारे पारितोषिकांसाठी करण्यात आली. रेखा व रंगकला विभागामध्ये योगेश मनोहर आडकीने, प्रशांत शांताराम धाडवे, नागनाथ माणकेश्वर, भावेश विलास जाधव, सीमा प्रदीप कांबळे, कैलास हरी बांगर यांना पारितोषिके प्राप्त झाली. उपयोजित कला विभागातून रमेश मोतीराम पवार, मयूर चंद्रकांत चवरकर, अभिषेक भास्कर तिखे, स्वाती हेमंत देशपांडे, शिवानी दत्तात्रय कोठावळे आणि शिल्पकला विभागामध्ये रेखा रमाकांत सूर्यवंशी, महेश श्रावण जगताप, मुद्राचित्रण करीता सुरज देवानंद तेलंग आणि दिव्यांग विभागातून भावना अंकुश गुजरे यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. या प्रदर्शनामध्ये नवोदित युवा कलावंतांसोबत आपल्या प्रयोगशील कलासाधनेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या प्रतिथयश कलावंतांची उपस्थिती ही या प्रदर्शनाची अत्यंत आश्वासक आणि जमेची बाजू! चित्रकला व शिल्पकला विभागामध्ये अकादमिक शैलीमधील व्यक्तिचित्रण, निसर्गचित्रण त्याचबरोबर संकल्पनाधीष्ठित व विचारक्षम कलाकृती, अमूर्त कलाकृती अशा अनेक कलाविचारांतून साकारलेल्या उत्तमोत्तम कलाकृती समाविष्ट होत्या. धातू, पाषाण आणि नव्या युगातील मिश्र माध्यमातील शिल्पाकृती पाहताना कलावंतांनी कलानिर्मितीसाठी धरलेली नव्या तंत्रज्ञानाची कास प्रकर्षाने जाणवते. उपयोजित कलाकृतींचे निरीक्षण करताना सामान्यातील सामान्य जनतेला एखादा विषय किंवा संदेश अत्यंत उत्कट व थेटपणे पोचवण्यासाठी उपयोजित कलाकारांनी वापरलेल्या संकल्पना, प्रतिमा व रूपकांतून आंतरराष्ट्रीय जाहिरात कलेच्या दर्जाच्या कलाकृती निर्माण झालेल्या दिसून येतात. आजच्या समकालीन कलेचे समग्र प्रातिनिधिक प्रतिबिंब या प्रदर्शनातून प्रकर्षाने दिसून येते. कोणत्याही कलेला शासनाच्या प्रोत्साहनाबरोबरच कलाकृतींसाठी बाजारपेठ देखील उपलब्ध होणे गरजेचे असते. आज निवडक भारतीय कलावंतांच्या कलाकृती अत्युच्च किमतीमध्ये विकल्या जात आहेत. स्वत: प्रतिथयश चित्रकार असलेले राज्याचे कला संचालक डॉ. किशोर इंगळे यांच्या नियोजनातून कला संग्राहक, रसिक यांना या प्रदर्शनासाठी निमंत्रित केले गेले आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अनिश्चितता असूनही राज्य कला प्रदर्शनामध्ये मोठ्या प्रमाणात कलाकृतींची विक्री झाली. गेल्या पंधरा वर्षातील सरासरी विक्रीच्या प्रमाणापेक्षा यावर्षीचे विक्रीचे प्रमाण जवळपास दुप्पट होते. याचे श्रेय कला संचालक आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाच्या आठवड्यात दिवसभर अखंडपणे कला रसिक व संग्राहक यांचा उत्तमरीत्या संवाद साधून विक्रीसाठी पाठपुरावा करणाऱ्या प्रदर्शन अधिकारी व कर्मचारीवर्गास देणे गरजेचे वाटते. या प्रदर्शनाच्या निमित्ताने छापली जाणारी इतर व्यावसायिक प्रदर्शनांच्या तोडीस तोड असलेली अतिशय उत्कृष्ट स्मरणिका हे या प्रदर्शनाचे आणखी एक वैशिष्ट्य. प्रदर्शनामध्ये प्रदर्शित झालेल्या सर्व कलाकृतींची छायाचित्रे, सत्कारमूर्ती कलावंतांच्या कार्याबद्दल परिचय करून देणारे अभ्यासपूर्ण लेख यामुळे ही स्मरणिका पुढील काळातील पिढीसाठी संदर्भाचा महत्त्वपूर्ण दस्तावेज म्हणून संग्राह्य ठरते.

आजच्या आधुनिक, तंत्रज्ञानस्नेही व जागतिक स्पर्धेच्या युगात महाराष्ट्रातील दृश्यकलावंत कुठेही मागे पडू नये याकरिता प्रयत्नशील असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या अनेक उपक्रमांपैकी एक असलेले हे महत्त्वाचे कला प्रदर्शन उच्च व तंत्र शिक्षण खात्याचे मंत्री माननीय ना. श्री चंद्रकांत पाटील यांच्या भक्कम पाठींब्याने अधिकाधिक यशस्वी होत जाईल. महाराष्ट्राच्या दृश्यकला जगतामध्ये सुबत्तेचा एक नवा अध्याय सुरू झाल्याचा विश्वास सर्व कलावर्तुळामध्ये दृढ होत आहे.

*(लेखक सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये साहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत असून गेली अनेक वर्ष ते चित्रकार म्हणून तसेच कलाविषयक लिखाणासाठी कलाक्षेत्रात परिचित आहेत.)*



# ज्ञानसंपन्न महाराष्ट्रासाठी नवे पर्व

‘इनफ्लिबनेट’ (Information and Library Network Centre) हे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेले एक स्वायत्त आंतर-विद्यापीठ केंद्र आहे. या संस्थेचा मुख्य उद्देश भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील ग्रंथालयांना एकमेकांशी जोडणे आणि माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे हा आहे. भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि संशोधनाला गती देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य झाला आहे. याच अनुषंगाने, इन्फ्लिबनेट, गांधीनगर, गुजरात आणि महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यात नुकताच एक सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. तो राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांसाठी डिजिटल परिवर्तनाचा मजबूत पाया घालणारा ठरणार आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता हमी, देत पारदर्शक प्रशासन आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया सक्षम करण्यासाठी त्याची मदत होईल.




**डॉ. प्रशांत पी. मगर**
शैक्षणिक समन्वयक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे



**प्रा. डॉ. सुभाष चव्हाण**
संचालक,
भारतरत्न महर्षी कर्वे ज्ञान स्रोत केंद्र,
एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई



**प्रा. डॉ. मीनल ओक**
म. ए. सो. आय. एम. सी. सी.
महाविद्यालय (स्वायत्त), पुणे



**प्रा. डॉ. शांतश्री सेनगुप्ता**
ग्रंथपाल
प्रो.एज्यु.सो.चे मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), पुणे

विकसित भारत @२०४७ आणि त्याअनुषंगाने विकसित महाराष्ट्रचे स्वप्न साकार करण्यासाठी डेटा- आधारित प्रशासन (Data-driven Governance) आणि पारदर्शकता अत्यंत महत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन, दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे येथे एका राज्यस्तरीय कार्यशाळेत एक ऐतिहासिक सामंजस्य करार करण्यात आला. हा करार महाराष्ट्रातील शैक्षणिक क्षेत्राचा डिजिटल कणा ठरणार असून, विकसित महाराष्ट्र या संकल्पनेला तो बळ देणारा आहे. तंत्रज्ञानाचे एकात्मीकरण आणि उच्च शिक्षणातील उत्तरदायित्व यावर त्यात भर देण्यात आला असल्याने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या शिफारशींशी तो तंतोतंत जुळणारा आहे.

भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि संशोधनाला गती देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अपरिहार्य झाला आहे. याच अनुषंगाने, इन्फ्लिबनेट, गांधीनगर, गुजरात आणि महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्यात हा सामंजस्य करार (MoU) करण्यात आला. तो राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांसाठी डिजिटल परिवर्तनाचा मजबूत पाया घालणारा ठरणार असून, उच्च शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता हमी, पारदर्शक प्रशासन आणि डेटा-आधारित निर्णयप्रक्रिया सक्षम करणार आहे. या कराराचा मुख्य उद्देश महाराष्ट्रात दोन प्रमुख वेब-आधारित प्रणाली विकसित करणे हा आहे. त्या म्हणजे,

**१. राज्य संस्थात्मक मानांकन आराखडा (State Institutional Ranking Framework - SIRF):** महाराष्ट्रातील महाविद्यालये आणि विद्यापीठांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्याची स्वतःची मानांकन पद्धती. SIRF अंतर्गत राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, पायाभूत सुविधा, विद्यार्थी प्रगती, नवोन्मेष व सामाजिक योगदान यांसारख्या विविध निकषांवर आधारित वस्तुनिष्ठ क्रमवारी (Ranking) निश्चित केली जाईल. यामुळे संस्थांमध्ये गुणवत्तेची आरोग्यदायी स्पर्धा निर्माण होऊन शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होणार आहे.

**२. राज्य उच्च शिक्षण डेटा व्यवस्थापन प्रणाली (State Higher Education Data Management System - SHEDMS):** 'एक राज्य, एक डेटा' (One State, One Data) या तत्त्वावर आधारित केंद्रीकृत डेटा प्लॅटफॉर्म. SHEDMS ही राज्यस्तरीय एकात्मिक डेटा व्यवस्थापन प्रणाली असून, संस्थांची मास्टर माहिती, प्राध्यापक व कर्मचारी तपशील, विद्यार्थी प्रवेश व प्रगती, संशोधन व निधी, आर्थिक माहिती तसेच AISHE, NAAC व NIRF संबंधित डेटा एकत्रित स्वरूपात उपलब्ध करून देईल. या प्रणालीमुळे शासनाला धोरणनिर्मितीसाठी विश्वासार्ह आणि अद्ययावत डेटा सहज उपलब्ध होणार आहे. हा करार महाराष्ट्र राज्यामधील सर्व सार्वजनिक विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांसाठी (HEIs) अत्यंत लाभदायक ठरणार आहे.

## संस्थांतर्गत प्रशासन

- ➢ ह्या करारांतर्गत केंद्रीकृत डेटा व्यवस्थापन प्रणाली मुळे (SHEDMS) प्रत्येक वेळी विविध संस्थांना (उदा. AISHE, NAAC, NIRF) वेगळ्याने माहिती भरण्याची गरज भासणार नाही.
- ➢ एकदा भरलेली माहिती अनेक ठिकाणी वापरता येईल, ज्यामुळे प्रशासकीय कामाचा ताण कमी होईल.
- ➢ 'SIRF' मुळे महाविद्यालयांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होईल.
- ➢ मानांकन सुधारण्यासाठी विद्यापीठे शैक्षणिक गुणवत्ता आणि सुविधांवर अधिक भर देतील.
- ➢ इनफ्लिबनेटच्या मदतीने प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या संशोधनाची, पेटंट्सची आणि प्रकाशनांची माहिती एकाच डॅशबोर्डवर उपलब्ध होईल, ज्यामुळे जागतिक स्तरावर त्यांची दखल घेतली जाईल.
- ➢ या प्रक्रियेत 'महा-सार्क' (महाराष्ट्र स्टेट ॲसेसमेंट अँड ॲक्रेडिटेशन कौन्सिल) ची भूमिका समन्वयाची असेल. गुणवत्ता हमी आणि मानांकनाचे निकष ठरवण्यात त्यांचा सहभाग महत्त्वाचा असेल.
- ➢ अचूक आणि वेळेवर डेटा सादर करणे, नोडल ऑफिसर नेमणे आणि संस्थेतील संशोधन व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती 'SHEDMS' पोर्टलवर अद्ययावत ठेवणे, ही विद्यापीठे व महाविद्यालयांची प्रमुख जबाबदारी असेल.

- या करारामुळे विद्यार्थ्यांच्या संशोधनाला नवी दिशा मिळणार आहे.
- विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची निवड करताना त्या संस्थेचे अधिकृत राज्यस्तरीय मानांकन (Ranking) पाहता येईल.
- इनफ्लिबनेटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ई-रिसोर्सेस आणि डिजिटल लायब्ररीचा अधिक प्रभावी वापर करता येईल.
- डेटा आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची कौशल्ये विकसित होतील, जे 'विकसित महाराष्ट्र'च्या उद्दिष्टासाठी पूरक आहे.

## प्रकल्प अभ्यास : तांत्रिक व आर्थिक आराखडा

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि तांत्रिक व आर्थिक आराखडा तयार करण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने प्रा. डॉ. सुभाष

चव्हाण (संचालक, ज्ञान स्रोत केंद्र, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय सहा सदस्यीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. ह्या समितीने या प्रकल्पासाठी आवश्यक सर्व्हर, आयटी इन्फ्रास्ट्रक्चर, पहिल्या वर्षाचा अंदाजित खर्च आणि मनुष्यबळ (Project Monitoring Unit - PMU) याचे सविस्तर नियोजन याचा आराखडा शासनास सादर केला आहे.

या उपक्रमाचे श्रेय राज्याचे माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या दूरदर्शी नेतृत्वाला जाते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली उच्च शिक्षण विभागाने तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक आणि गतिमान प्रशासन देण्याचा ध्यास घेतला आहे. हा प्रकल्प राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० च्या शिफारशींशी तंतोतंत जुळणारा आहे, ज्यामध्ये तंत्रज्ञानाचे एकात्मीकरण (Technology Integration) आणि उच्च शिक्षणातील उत्तरदायित्व (Accountability) यावर भर देण्यात आला आहे.

या प्रकल्पात इन्फ्लिबनेट सेंटर तांत्रिक भागीदार म्हणून वेब प्लॅटफॉर्मची रचना व विकास, तांत्रिक साहाय्य, प्रशिक्षण, संशोधन व प्रकाशन डेटाचे व्यवस्थापन तसेच हेल्पडेस्क सुविधा उपलब्ध करून देणार आहे. तर महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग सर्व्हर, IT पायाभूत सुविधा, डेटा संकलन फ्रेमवर्क, सुरक्षा तपासणी, प्रकल्प पर्यवेक्षण आणि प्रशासकीय देखरेख यांची जबाबदारी पार पाडणार आहे.

या प्रकल्पाचा प्रारंभीचा कालावधी ३६ महिने इतका असून, पहिल्या वर्षासाठी अंदाजे ₹ ८६.२५ लाख इतका कार्यकारी खर्च निश्चित करण्यात आला आहे. आवश्यक IT पायाभूत सुविधा, होस्टिंग, प्रशिक्षण व दस्तऐवजीकरणाचा खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे. या करारामुळे महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक स्पर्धात्मक, सक्षम आणि गुणवत्तापूर्ण बनण्याची नवी संधी मिळणार आहे.

## इन्फॉर्मेशन अँड लायब्ररी नेटवर्क, गांधीनगर (इन्फ्लिबनेट)

गांधीनगर (गुजरात) येथे स्थित असलेल्या 'इनफ्लिबनेट' (Information and Library Network Centre) हे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेले एक स्वायत्त आंतर-विद्यापीठ केंद्र आहे. या संस्थेचा मुख्य उद्देश भारतातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील ग्रंथालयांना एकमेकांशी जोडणे आणि माहितीची देवाणघेवाण सुलभ करणे हा आहे. संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी इनफ्लिबनेट हे वरदानापेक्षा कमी नाही. संशोधनासाठी आवश्यक असणारे संदर्भ साहित्य, शोधनिबंध आणि माहिती मिळवण्यासाठी इनफ्लिबनेट विविध प्रकारे मदत करते. १९९१ मध्ये राष्ट्रीय कार्यक्रम म्हणून सुरू झालेल्या या केंद्राने १९९६ पासून स्वतंत्र आंतर-विद्यापीठ केंद्र म्हणून काम सुरू केले.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भारतातील विद्यापीठ ग्रंथालयांचे आधुनिकीकरण करणे तसेच शिक्षणतज्ज्ञ व संशोधकांमधील शैक्षणिक संवादाला चालना देणे हे इन्फ्लिबनेटचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ह्या उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी इन्फ्लिबनेटकडून देशातील सर्व शैक्षणिक संस्थांमधील समुदायाला दर्जेदार, समीक्षित आणि विश्वासार्ह ई-संसाधनांचा अखंड व सर्वत्र प्रवेश उपलब्ध करून दिला जातो, त्याशिवाय या संस्थेत जे उपक्रम चालवले जातात, त्यात आयसीटी (ICT) पायाभूत सुविधा भक्कम करून मूल्यवर्धित सेवा पुरवणे, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने इलेक्ट्रॉनिक माहिती मिळवण्यासाठी आवश्यक साधने व प्रणाली विकसित करणे, ई-संसाधनांचा प्रभावी वापर करण्यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण व मार्गदर्शक साहित्य तयार करणे आणि प्रत्येक संस्थेत शैक्षणिक व संशोधन सामग्रीसाठी मुक्त प्रवेश (Open Access) असलेल्या डिजिटल संग्रहांच्या निर्मितीस चालना देऊन ज्ञानाचा प्रसार करणे याचा समावेश आहे. थोडक्यात, शैक्षणिक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञानाचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व पूरक कृती करण्यासाठी ही संस्था कटिबद्ध आहे. देशभरातील सर्व शैक्षणिक आणि संशोधन संस्थांच्या ग्रंथालयांना एकाच संगणकीय नेटवर्कद्वारे जोडून ज्ञानसाधना, अध्ययन आणि संशोधनाला भक्कम पाठबळ देणे हा या संस्थेचा प्रधान हेतू आहे. या माध्यमातून ग्रंथालयांच्या कामकाजात संगणकीकरण व एक समानता आणणे, एकत्रित ऑनलाइन कॅटलॉग (Union Catalogue) व डेटाबेसची निर्मिती, ई-मेल, फाईल हस्तांतरण आणि ऑडिओ/व्हिडिओ कॉन्फरन्सिंगसारख्या आधुनिक सुविधांद्वारे शास्त्रज्ञ, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी यांच्यातील शैक्षणिक संवाद अधिक सुलभ व प्रभावी करणे अशा अनेक गोष्टी साधल्या जातील.

या सर्व प्रक्रियांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी, इन्फ्लिबनेटकडून संपर्क प्रणाली, डेटा व्यवस्थापन आणि नेटवर्किंगच्या क्षेत्रात अद्ययावत नियंत्रण व देखरेख व्यवस्था प्रस्थापित करण्यात आली आहे. या संपूर्ण माहिती प्रणालीचे शाश्वत व्यवस्थापन करण्यासाठी कुशल मनुष्यबळ विकसित करणे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी सहकार्य वाढवणे आणि संशोधन व विकासाला (R&D) चालना देणे यावर संस्थेचा विशेष भर आहे.

इन्फ्लिबनेट केंद्राकडून राष्ट्रीय पातळीवर चालविले अनेक महत्त्वाचे उपक्रम राबवले जातात. त्यात ग्रंथालय संगणकीकरण, ई-संसाधन कन्सोर्टियम, ओपन ऍक्सेस इनिशिएटिव्हस, शैक्षणिक व संशोधन नेटवर्क, ई-कंटेंट आणि सेवा, इतर प्रकल्पांमध्ये स्वयम-प्रभा ३२ डीटीएच चॅनेलवर उच्च दर्जाचे शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करणारा प्रकल्प, NIRF पोर्टल – राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग पोर्टलची निर्मिती व डेटा व्यवस्थापन, e-NBA व NAAC प्रकल्प – तांत्रिक संस्था मान्यताप्राप्तीसाठी Accreditation Workflow Management System व बायोमेट्रिक डेटाचे प्रमाणीकरण, ICSSR डेटा सेवा – सामाजिक शास्त्र डेटा रिपॉझिटरीची निर्मिती, e-Governance @ UGC – UGC साठी आयटी-

सेल, वेबसाइट व विविध ऑनलाइन प्रणाली विकसित करणे, Ek Bharat Shreshtha Bharat – सांस्कृतिक आदान-प्रदान व कार्यक्रमांसाठी वेब पोर्टल अशा अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचा अंतर्भाव आहे.

## संशोधन आणि विकासामध्ये इन्फ्लिबनेटची भूमिका

देशभरातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांना अभ्यासपूर्ण ई-संसाधने आणि डिजिटल सेवा पुरवून इन्फ्लिबनेटने (INFLIBNET) भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा, व्याप्ती आणि समानता लक्षणीयरीत्या वाढवली आहे. ई-रिसोर्स कन्सोर्टिया, ग्रंथालय ऑटोमेशन आणि डिजिटल रिपॉझिटरीज यांसारख्या उपक्रमांमुळे भौगोलिक अडथळे दूर झाले असून, सर्वांना समान व दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाले आहे. प्राध्यापक आणि शिक्षणतज्ज्ञांसाठी पीअर-रिव्ह्यूड जर्नल्स, ई-बुक्स, आणि डेटाबेस सहज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच, संशोधकांच्या प्रोफायलिंग सिस्टीम्स, मुक्त शैक्षणिक संसाधने (Open Educational Resources) आणि विविध प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे अभ्यासक्रम रचना, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि शिक्षकांच्या व्यावसायिक विकासाला मोठी मदत होत आहे.

याशिवाय, इन्फ्लिबनेट भारताच्या संशोधन आणि माहिती पायाभूत सुविधांचा प्रमुख कणा म्हणून उदयास आले आहे. प्रबंध आणि शोधनिबंधांसाठी असलेल्या राष्ट्रीय रिपॉझिटरीजमुळे संशोधनातील पारदर्शकता आणि दृश्यमानता वाढली आहे. वाङ्मयचौर्य (Plagiarism) शोधण्याच्या सेवांद्वारे संशोधनातील नैतिकता आणि प्रामाणिकपणा अधिक मजबूत झाला आहे. या सर्वसमावेशक उपक्रमांमुळे संशोधन माहितीचे योग्य व्यवस्थापन, मूल्यांकन आणि प्रसार करणे सोपे झाले असून, देशात आंतरविद्याशाखीय आणि एका मजबूत, नाविन्यपूर्ण संशोधन संस्कृतीची निर्मिती होण्यास चालना मिळाली आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० मध्ये डिजिटल शिक्षण, बहुविद्याशाखीय अध्ययन, ज्ञानाची खुली उपलब्धता, संशोधनातील उत्कृष्टता आणि क्षमता बांधणी यावर विशेष भर देण्यात आला आहे. ही उद्दिष्टे साध्य होण्यासाठी इन्फ्लिबनेट (INFLIBNET) मदत करते :

- डिजिटल आणि मुक्त प्रवेश (ओपन ॲक्सेस) रिपॉझिटरीजना प्रोत्साहन देणे.
- तंत्रज्ञान-आधारित अध्यापन, अध्ययन आणि संशोधनास सक्षम करणे.
- सातत्यपूर्ण प्रशिक्षणाद्वारे प्राध्यापक आणि ग्रंथपालांची कौशल्ये व क्षमता बळकट करणे.
- गुणवत्ता हमी, अधिस्वीकृती (Accreditation) आणि डेटा-आधारित प्रशासनाला पाठबळ देणे.

अशा प्रकारे, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० चा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणण्यासाठी इन्फ्लिबनेट एक प्रमुख अंमलबजावणी भागीदार म्हणून महत्त्वाची भूमिका बजावते.

विकसित भारत @ २०४७ चा दृष्टिकोन एक ज्ञान-आधारित, नाविन्यपूर्ण (Innovation-led) आणि सर्वसमावेशक विकसित राष्ट्र उभारण्यावर केंद्रित आहे. इन्फ्लिबनेट (INFLIBNET) या राष्ट्रीय आकांक्षेमध्ये विविध प्रकारे योगदान देते:

- ज्ञान आणि संशोधन निष्कर्षांच्या उपलब्धतेचे लोकशाहीकरण करणे (सर्वांसाठी सुलभ करणे).
- उच्च शिक्षण संस्थांमध्ये डिजिटल आणि आयसीटी (ICT) क्षमता निर्माण करणे.
- स्वदेशी संशोधन आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देणे, तसेच भारतीय संशोधनाला जागतिक स्तरावर ओळख (Global visibility) मिळवून देणे.
- सुव्यवस्थित शैक्षणिक आणि संशोधन डेटाच्या माध्यमातून पुरावा-आधारित (Evidence-based) धोरण निर्मितीला पाठबळ देणे.

जागरूक व माहितीपूर्ण मानवी भांडवल (Human capital) जोपासून आणि राष्ट्रीय ज्ञानाच्या पायाभूत सुविधा अधिक बळकट करून, भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याच्या वाटचालीला दिशा देण्यात इन्फ्लिबनेट एक अत्यंत धोरणात्मक आणि महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

महाराष्ट्र शासन आणि 'इन्फ्लिबनेट' (INFLIBNET) यांच्यातील हा सामंजस्य करार हा राज्याच्या उच्च शिक्षणाचा संपूर्ण चेहरामोहरा बदलणारा एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या करारांतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या 'SIRF' (राज्य संस्थात्मक मानांकन आराखडा) आणि 'SHEDMS' (राज्य उच्च शिक्षण डेटा व्यवस्थापन प्रणाली) या प्रणालींद्वारे शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता येईल, प्रशासकीय कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढेल आणि विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाचे शिक्षण उपलब्ध होईल. एकंदरीतच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (NEP २०२०) उद्दिष्टांशी सुसंगत असा हा डिजिटल पुढाकार, 'विकसित भारतासाठी विकसित महाराष्ट्र' हे महत्त्वाकांक्षी ध्येय साध्य करण्याच्या वाटचालीत नक्कीच एक मैलाचा दगड ठरणार आहे.

## संदर्भ सूची


- University Grants Commission (2020) National Education Policy 2020, Retrieved from https://www.ugc.gov.in
- INFLIBNET Centre (2024) About INFLIBNET Retrieved from https://www.inflibnet.ac.in
- Higher and Technical Education Department, Government of Maharashtra (2026) Official MoU Document Retrieved from https://www.maharashtra.gov.in



# भारतातील एकसंध शिक्षण नियामक सुधारणांचे बिगुल : एक चिकित्सक अभ्यास

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे उच्च शिक्षण नियमनातील सुरू असलेल्या सुधारणांसाठी संकल्पनात्मक आणि धोरणात्मक पाया प्रदान करते. एनईपी २०२० मध्ये सर्वसमावेशक, बहुविषयक, लवचिक आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रणालीची गरज अधोरेखित करण्यात आली आहे, जी चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि नैतिक मूल्यांना प्रोत्साहन देते.

**डॉ संजय ढोले**
संचालक, संशोधन, विकास व गुणवत्ता
ज्ञान प्रसाद ग्लोबल विद्यापीठ,

भारतामधील उच्च शिक्षण हे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन नसून राष्ट्रीय विकास, सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक ओघ व स्पर्धात्मकतेचा मूलभूत स्तंभ आहे. ज्या देशात लोकसंख्येचा मोठा भाग तरुण हा प्रगती व तंत्रज्ञानाकडे वाटचाल करणारा आहे, त्या देशात उच्च शिक्षण प्रणाली ही या लोकसंख्यात्मक क्षमतेचे वास्तविक लोकसंख्यात्मक व सामाजिक लाभात रूपांतर करण्यासाठी निर्णायक भूमिका बजावते हे महत्त्वाचे. गेल्या काही दशकांमध्ये भारतातील उच्च शिक्षण क्षेत्राचा विस्तार लक्षणीयरीत्या वाढला आहे. अलीकडील सर्वेक्षणे आणि अधिकृत आकडेवारीनुसार देशभरात १,१०० हून अधिक विद्यापीठे आणि ५०,००० पेक्षा अधिक महाविद्यालये कोट्यवधी विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. शिक्षणातील या वेगवान परिमाणात्मक विस्तारामुळे प्रवेशाची संधी ही प्रत्येकासाठी निश्चितच वाढली आहे;

परंतु त्याचबरोबर नियामक प्रणालीतील, गुणवत्ता हमी चौकटीतील आणि संस्थात्मक प्रशासनातील सातत्याने अस्तित्वात असलेल्या संरचनात्मक कमतरताही उघड झाल्या आहेत. तसे ऐतिहासिकदृष्ट्या पाहिले तर भारतातील उच्च शिक्षणाचे नियमन विखुरलेल्या व विस्कटलेल्या पद्धतीने विकसित झाले आहे. ज्यामध्ये सामान्यपणे उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण आणि शिक्षक शिक्षण यांसारख्या विशिष्ट क्षेत्रांसाठी वेगवेगळ्या वैधानिक संस्थांची निर्मिती करण्यात आली होती. या मॉडेलमुळे विशेषीकरणाचा फायदा झाला असला तरी कालांतराने यामुळे अधिकारक्षेत्रातील आच्छादन, प्रक्रियांची पुनरावृत्ती आणि असंगत मानके निर्माण झाली. बहुविषयक अभ्यासक्रम देणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांना अनेक नियामक प्राधिकरणांना उत्तरदायी राहावे लागे, ज्यामुळे प्रशासकीय गुंतागुंत वाढली आणि निर्णयप्रक्रियेत विलंब होऊ लागला. याशिवाय नियमन मुख्यतः इनपुट्स आणि प्रक्रियात्मक पालनावर केंद्रित राहिले. किंबहुना शिक्षणाचे परिणाम, संशोधन उत्पादकता किंवा सामाजिक प्रभाव यावर मात्र तुलनेने कमी भर देण्यात आला. जागतिकीकरण, तांत्रिक बदल आणि नवोन्मेष व ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थांवर वाढता भर या अशा पार्श्वभूमीवर आव्हानांची तीव्रता अधिक स्पष्ट झाली.

म्हणूनच या अशा प्रणालीगत समस्यांच्या पार्श्वभूमीवर, भारत सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलून उच्च शिक्षणातील प्रशासनाचे सर्वंकष पुनर्रचना प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी एक एकात्मिक किंवा एकछत्रीय नियामक संस्था म्हणून भारतीय उच्च शिक्षण आयोगाची (HECI) स्थापना प्रस्तावित करण्यात आली आहे. HECI चौकट सध्या विद्यापीठ अनुदान आयोग (UGC), ऑल इंडिया काऊन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (AICTE) आणि नॅशनल काऊन्सिल फॉर टीचर एज्युकेशन (NCTE) यांच्याकडे असलेल्या मूलभूत नियामक कार्यांना एकत्रित रचनेत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संरचनेत नियमन, मान्यताप्रक्रिया, शैक्षणिक मानके निश्चित करणे आणि निधी वितरण या कार्यांना स्वतंत्र अशा विविध उभ्या विभागांमध्ये विभागले गेले. ही सुधारणा राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० मध्ये मांडलेल्या दृष्टिकोनावर आधारित असून, उच्च शिक्षण प्रशासन अधिक सुसंगत, पारदर्शक आणि परिणामाभिमुख करण्याचा प्रयत्न या एकसंध नियामकाचा आहे.

## भारतामधील उच्च शिक्षण नियमनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी-

स्वातंत्र्यानंतर भारतातील उच्च शिक्षण नियमनाचा प्रवास हा राज्याच्या बदलत्या प्राधान्यक्रमांचा आणि राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षणाचा साधन म्हणून वापर करण्याच्या उद्देशाचे मुख्यत्त्वे प्रतिबिंब असे मानले जाते. यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याअंतर्गत UGC ची स्थापना वैधानिक संस्थेच्या रूपाने करण्यात आली, ज्याचे कार्य विद्यापीठ शिक्षणाचे समन्वय, मानके निश्चित करणे व त्यांचे पालन सुनिश्चित करणे तसेच भारतातील विद्यापीठांना अनुदान वितरित करणे हे होते. पुढील काही दशकांत उच्च शिक्षण प्रणाली ही अधिक सक्षम व सर्वसमावेशक झाली. तसे पाहिले तर यासाठी विशिष्ट क्षेत्रांचे नियमन करण्यासाठी विशेषीकृत संस्था निर्माण करण्यात आल्या. AICTE ची सुरुवातीला सल्लागार संस्थेच्या रूपात स्थापना झाली आणि १९८७ मध्ये तिला वैधानिक दर्जा देण्यात आला. ती मुख्यत्वे अभियांत्रिकी आणि व्यवस्थापनासह तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाचे नियोजन व नियमन करण्यासाठी जबाबदार ठरली. १९९० च्या दशकात स्थापन झालेल्या NCTE वर देशभरातील शिक्षक शिक्षण कार्यक्रमांची गुणवत्ता आणि मानकीकरण सुनिश्चित करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

भारतामध्ये उच्च शिक्षणाच्या नियमनासाठी या संस्थांबरोबरच वैद्यकशास्त्र, कायदा, फार्मसी आणि वास्तुकला यांसारख्या क्षेत्रांसाठी विविध व्यावसायिक परिषदांची स्थापना करण्यात आली. प्रत्येक क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने या अनेक संस्थांची निर्मिती करण्यात आली असली, तरी त्यातून नियमनाची तुकड्या-तुकड्यांत विभागलेली आणि स्वतंत्रपणे रचना निर्माण झाली. एकात्मिक किंवा बहुविषयक अभ्यासक्रम देणाऱ्या विद्यापीठांना अभियांत्रिकी, शिक्षक शिक्षण किंवा सामान्य पदवी अभ्यासक्रमांसाठी वेगवेगळ्या मान्यता प्रक्रियांचा सामना करावा लागत असे. यामुळे कागदपत्रांची पुनरावृत्ती, विसंगत मार्गदर्शक तत्त्वे आणि आवश्यक मंजुरी मिळविण्यात होणारा विलंब अशा समस्या निर्माण होत असत. याशिवाय अनेक नियामक संस्था पायाभूत सुविधा मानके आणि प्रक्रियात्मक बाबींवर सविस्तर नियंत्रण ठेवण्यास प्राधान्य दिले गेले, तर शैक्षणिक गुणवत्ता, नवोपक्रम किंवा संशोधन उत्पादन यांना तुलनेने कमी महत्त्व देण्यात आले.

मुख्य म्हणजे एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीसच हे स्पष्ट झाले की, ही अशी संरचना वेगाने बदलणाऱ्या जागतिक वातावरणाच्या गरजांसाठी योग्य नाही. उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, खासगी संस्थांची वाढ, दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षणाचा विस्तार, तसेच जागतिक क्रमवारीत सुधारणा करण्याची आकांक्षा या सर्व बाबींनी अधिक एकात्मिक आणि आधुनिक नियामक चौकटीची गरज अधोरेखित केली. धोरणात्मक चर्चा, तज्ज्ञ समित्या आणि राष्ट्रीय सल्लामसलत यांमधून हळूहळू या विचाराला बळ मिळाले की, तुकडीकरण कमी करण्यासाठी, जबाबदारी वाढविण्यासाठी आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी भारताला उच्च शिक्षणाच्या प्रशासनाची सर्वसमावेशक पुनर्रचना आवश्यक आहे.

## उच्च शिक्षण प्रशासनातील सुधारणेची गरज-

भारतातील उच्च शिक्षणातील नियामक सुधारणेची मागणी ही रचनात्मक, कार्यात्मक आणि संदर्भात्मक अशा विविध आव्हानांच्या संयोगातून उद्भवली आहे. एक प्रमुख समस्या म्हणजे अधिकार क्षेत्रातील आच्छादन (overlapping jurisdic-

tion). संस्थांना अनेकदा समान प्रकारच्या मंजुरी किंवा नूतनीकरणासाठी एकाच वेळी विविध संस्थांच्या तपासणीला सामोरे जावे लागत असे, ज्यामुळे अनिश्चितता आणि प्रशासकीय भार वाढत असे. यामुळे संस्थांच्या संसाधनांचा अपव्यय होत असे आणि विशेषतः पारंपरिक विषयांच्या सीमांना ओलांडणारे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यास विलंब होत असे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'इनपुट-आधारित' नियमन. ऐतिहासिकदृष्ट्या, मान्यता आणि मंजुरी प्रक्रियेत पायाभूत सुविधा, किमान शिक्षकसंख्या आणि प्रयोगशाळा व ग्रंथालयांसारख्या सुविधांच्या निर्धारित निकषांची पूर्तता तपासण्यावर भर दिला जात असे. हे घटक महत्त्वाचे असले तरी ते स्वतःहून शैक्षणिक गुणवत्तेची हमी देत नाहीत. विद्यार्थ्यांच्या शिकण्यातील प्रगती, संशोधनातील योगदान, पदवीधरांची रोजगारक्षमता, औद्योगिकता आणि नवोपक्रम क्षमता यांसारख्या परिणामांना नियामक मूल्यमापनाच्या चौकटीत केंद्रस्थानी स्थान मिळत नसे. परिणामी, संस्था नियमांचे तांत्रिक पालन करूनही उच्च प्रभावी अध्यापन किंवा संशोधन देण्यात अपयशी ठरू शकत होत्या. त्यामुळे जागतिकीकरण आणि तांत्रिक बदलांच्या व्यापक संदर्भाने सुधारणेची तातडी अधिक वाढली. डिजिटल शिक्षणाचा विस्तार, ऑनलाइन अभ्यासक्रमांची वाढ, मिश्रित शिक्षण पद्धतींचा प्रसार आणि विविध विषयांच्या संगमावर उदयास येणारी नवीन क्षेत्रे या सर्वांसाठी लवचिक, अनुकूलनक्षम आणि भविष्योन्मुख नियामक व्यवस्था आवश्यक होती. कठोर आणि अनुपालन केंद्रित चौकट ही निश्चितपणे नवोपक्रमाला आळा घालू शकते आणि संस्थांना उदयोन्मुख शैक्षणिक व सामाजिक गरजांना त्वरेने प्रतिसाद देण्यापासून रोखू शकते. त्याच वेळी, काही संस्थांमध्ये शैक्षणिक मानकांची घसरण, शिक्षणाचे व्यापारीकरण आणि उच्च दर्जाच्या तसेच दुर्गम कॅम्पसमधील गुणवत्तेतील विषमता या बाबींमुळे अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह गुणवत्ता हमी प्रणालीची सार्वजनिक मागणीही वाढली.

या सर्व घटकांचा एकत्रित विचार करता, इनपुटऐवजी परिणामांवर भर देणारी, अनावश्यक पुनरावृत्ती कमी करणारी आणि जबाबदारी मजबूत करणारी एकात्मिक नियामक चौकट निर्माण करणे आवश्यक ठरते. त्यामुळे ही सुधारणा केवळ प्रशासकीय नसून, उच्च शिक्षण समावेशक वाढ, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय स्पर्धात्मकतेचा प्रमुख चालक म्हणून कायम राहावा यासाठी अत्यावश्यक आहे.

## राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शी सुसंगत धोरणात्मक दृष्टिकोन-

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे उच्च शिक्षण नियमनातील सुरू असलेल्या सुधारणांसाठी संकल्पनात्मक आणि धोरणात्मक पाया प्रदान करते. एनईपी २०२० मध्ये सर्वसमावेशक, बहुविषयक, लवचिक आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण प्रणालीची गरज अधोरेखित करण्यात आली आहे, जी चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि नैतिक मूल्यांना प्रोत्साहन देते. विद्यमान नियामक रचना तुकड्या-तुकड्यांत विभागलेली, अनुपालनावर अधिक भर देणारी आणि गुणवत्ता व परिणामांवर अपुरी लक्ष केंद्रित करणारी आहे असे हे धोरण स्पष्टपणे मान्य करते. या समस्यांवर उपाय म्हणून, वैद्यकीय आणि कायदेविषयक क्षेत्रे वगळता इतर सर्व उच्च शिक्षणावर देखरेख करण्यासाठी 'हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया' या एकमेव सर्वसमावेशक संस्थेची स्थापना करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

एनईपी २०२० पुढे सुचवते की, उच्च शिक्षण व्यवस्थेची चार प्रमुख कार्ये—नियमन, मान्यता, निधी वितरण आणि शैक्षणिक मानक-निर्धारण ही एचईसीआयच्या छत्राखालील स्वतंत्र, स्वायत्त आणि सशक्त संस्थांमार्फत पार पाडली जावीत. या कार्यविभाजनाचा उद्देश हितसंबंधांचा संघर्ष कमी करणे, अधिकारांचे अति-केंद्रीकरण टाळणे आणि अंतर्गत नियंत्रण व संतुलनाची यंत्रणा निर्माण करणे हा आहे. धोरणानुसार सूक्ष्म-नियमनापासून दूर जाऊन "हलके पण कठोर" (light but tight) अशा नियामक दृष्टिकोनाकडे वाटचाल करणे अपेक्षित आहे, ज्यात परिणाम, पारदर्शकता आणि प्रामाणिकतेबाबत कठोरता असेल; परंतु प्रक्रियांबाबत आणि अंतर्गत प्रशासनाबाबत लवचिकता असेल.

एनईपी २०२० शी सुसंगतपणे सादर करण्यात आलेले प्रस्तावित एचईसीआय विधेयक या दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करते. यात यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांना एकात्मिक चौकटीत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, नियमन, मान्यता, अनुदान वितरण आणि शैक्षणिक चौकट यासाठी स्वतंत्र उभ्या घटकांची (verticals) रूपरेषा निश्चित करण्यात आली आहे. त्यामुळे ही सुधारणा भारताला जागतिक ज्ञानकेंद्रात रूपांतरित करण्याच्या, भारतीय पदव्यांची आंतरराष्ट्रीय विश्वसनीयता वाढविण्याच्या आणि उच्च शिक्षणात संशोधन व नवोपक्रमाची संस्कृती विकसित करण्याच्या व्यापक धोरणात्मक प्रयत्नांचा एक भाग आहे.

## शिक्षण सुधारणा विधेयकाची उद्दिष्टे-

शिक्षण क्षेत्रातील नियामक सुधारणा विधेयक हे दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेल्या रचनात्मक समस्यांना तसेच नव्या जागतिक आव्हानांना प्रतिसाद देणाऱ्या परस्पर संबंधित अनेक उद्दिष्टांसह तयार करण्यात आले आहे. त्यातील एक प्रमुख उद्दिष्ट म्हणजे प्रशासन सुलभीकरण. विविध नियामक संस्थांच्या गुंतागुंतीच्या जाळ्याऐवजी विशेषीकृत उभ्या घटकांसह एकाच आयोगाची रचना करून, मंजुरी, मान्यता आणि शैक्षणिक सुधारणा प्रक्रियांमध्ये प्रशासकीय आच्छादन कमी करणे आणि निर्णयप्रक्रिया वेगवान करणे हा या सुधारणेचा हेतू आहे.

दुसरे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे सर्व संस्थांमध्ये एकसमान आणि विश्वासार्ह गुणवत्ता मानके सुनिश्चित करणे. विधेयकात सक्षम मान्यता यंत्रणा प्रस्तावित करण्यात आली असून, परिणाम-आधारित

मूल्यमापनावर भर देण्यात आला आहे. या उपायांमुळे शैक्षणिक गुणवत्तेतील तफावत कमी होईल आणि उच्च शिक्षणाविषयी सार्वजनिक विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा आहे. यासोबतच संस्थात्मक स्वायत्तता आणि जबाबदारी यांचा समतोल राखण्याचे उद्दिष्टही या विधेयकात आहे. संस्थांना अभ्यासक्रम रचना, नवीन कार्यक्रम सुरू करणे, सहकार्य प्रस्थापित करणे आणि प्रशासनिक नवोपक्रम करण्याचे अधिक स्वातंत्र्य दिले जाणार आहे, मात्र त्याचवेळी स्पष्ट कार्यप्रदर्शन निकष पूर्ण करणे आणि पारदर्शक मूल्यमापन प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक असेल.

या सुधारणेचा आणखी एक स्पष्ट उद्देश म्हणजे संशोधन आणि नवोपक्रम परिसंस्था बळकट करणे. नियामक बंधने सुलभ करून आणि मंजुरी प्रक्रिया सुसंगत करून विद्यापीठे व महाविद्यालयांना संशोधन, आंतरशाखीय प्रकल्प आणि उद्योग तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांशी भागीदारी यांसाठी अधिक वेळ आणि संसाधने देण्यास सक्षम करणे अपेक्षित आहे. शेवटी, जागतिक सुसंगतता हेही एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. ही सुधारणा नियमन, मान्यता आणि कार्यप्रदर्शन-आधारित निधी वितरणातील आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींचा आधार घेते आणि त्यामुळे भारताची जागतिक स्तरावर दृश्यमानता, स्पर्धात्मकता आणि जागतिक विद्यार्थ्यांसाठी व सहकाऱ्यांसाठी आकर्षकता वाढविण्याचा प्रयत्न करते.

## भारतीय उच्च शिक्षण आयोगाची संस्थात्मक रचना-

प्रस्तावित भारतीय उच्च शिक्षण आयोगाची संकल्पना बहु-उभ्या (multi-vertical) संरचनेवर आधारित आहे, ज्यामध्ये चार स्वतंत्र पण परस्परपूरक घटकांचा समावेश आहे. एनईपी २०२० मध्ये नमूद केलेली चार प्रमुख कार्ये प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आणि नियामक जबाबदाऱ्या स्पष्टपणे विभाजित करून व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापित करण्यासाठी या उभ्या घटकांची रचना करण्यात आली आहे.

पहिला उभा घटक म्हणजे 'नॅशनल हायर एज्युकेशन रेग्युलेटरी कौन्सिल' (NHERC), जो नियमन आणि अनुपालनासाठी जबाबदार असेल. वैद्यकीय आणि कायदेविषयक क्षेत्रे वगळता सर्व उच्च शिक्षण क्षेत्रांसाठी हा प्रमुख नियामक असेल आणि संबंधित क्षेत्रांतील यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांची विद्यमान नियामक भूमिका तो पार पाडेल. एनएचईआरसी संस्थांनी प्रशासन, पारदर्शकता आणि आर्थिक प्रामाणिकता यांसारख्या क्षेत्रांमध्ये किमान मानके पूर्ण केली आहेत याची खात्री करेल; परंतु शैक्षणिक बाबींमध्ये सूक्ष्म-नियमन टाळेल.

दुसरा उभा घटक म्हणजे 'नॅशनल ॲक्रेडिटेशन कौन्सिल' (NAC), जो मान्यताप्राप्ती प्राधिकरण म्हणून कार्य करेल. एनएसी कठोर आणि सहकारी-आधारित (peer-reviewed - समकक्ष-समीक्षित) मान्यता प्रक्रिया अंमलात आणेल, जी परिणाम-आधारित निकषांवर आधारित असेल आणि मान्यता निकाल सार्वजनिकपणे उपलब्ध करून देईल अशी अपेक्षा आहे. या पारदर्शकतेमुळे संस्थांमध्ये स्पर्धा आणि सातत्यपूर्ण सुधारणा प्रोत्साहित होतील तसेच विद्यार्थी, पालक आणि नियोक्त्यांना विश्वासार्ह माहिती उपलब्ध होईल.

तिसरा उभा घटक म्हणजे 'हायर एज्युकेशन ग्रँट्स कौन्सिल' (HEGC), जो निधी व अनुदानासाठी निकष आणि चौकट व्यवस्थापित करेल अशी कल्पना आहे. जरी काही अलीकडील घडामोडींनुसार प्रत्यक्ष निधी वितरण शिक्षण मंत्रालयाकडेच राहू शकते. तरीही, एचईजीसी संशोधन उत्पादन, समावेशकता आणि नवोपक्रम यांसारख्या निर्देशकांशी आर्थिक साहाय्य जोडणारी कार्यप्रदर्शन-आधारित अनुदान वाटप पद्धती सुरू करेल अशी अपेक्षा आहे.

चौथा उभा घटक म्हणजे 'जनरल एज्युकेशन कौन्सिल' (GEC), जो शैक्षणिक मानके, शिकण्याचे परिणाम आणि अभ्यासक्रम चौकट निश्चित करेल. यामध्ये क्रेडिट प्रणाली आणि एनईपी २०२० शी सुसंगत पदवीधरांच्या गुणवैशिष्ट्यांचा समावेश असेल. जीईसीचे कार्य बहुविषयक शिक्षण, लवचिक अभ्यासक्रम रचना आणि संस्थांदरम्यान शैक्षणिक हालचालीस सुलभ करणाऱ्या राष्ट्रीय क्रेडिट चौकटीकडे संक्रमणास आधार देईल.

एकत्रितपणे, हे सर्व उभे घटक अशा सुसंगत प्रशासनिक रचनेची निर्मिती करण्याचा उद्देश ठेवतात, ज्यामध्ये नियमन, गुणवत्ता हमी, निधी चौकट आणि शैक्षणिक मानके स्पष्टपणे विभाजित असतील; परंतु त्यांच्यात जवळचा समन्वयही असेल.

## सुधारणा विधेयकातील प्रमुख तरतुदी-

या एचईसीआय विधेयकात अनेक महत्त्वपूर्ण तरतुदी समाविष्ट केल्या असून, ज्यांचे संस्थांवर आणि संबंधित घटकांवर निश्चितच दूरगामी परिणाम होणार आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची तरतूद म्हणजे सर्व उच्च शिक्षण संस्थांची एनएचईआरसीकडे अनिवार्य नोंदणी. प्रशासन, पारदर्शकता आणि पायाभूत सुविधा यांसारख्या मूलभूत मानकांची पूर्तता करणाऱ्या संस्थांनाच कार्य करण्याची परवानगी दिली जाईल. यामुळे निकृष्ट दर्जाच्या संस्थांची आणि तथाकथित 'डिग्री शॉप्स'ची वाढ रोखली जाईल अशी अपेक्षा आहे.

दुसरी महत्त्वाची तरतूद ही मान्यता प्राप्तीशी संबंधित आहे. या विधेयकानुसार संस्थात्मक मान्यता अनिवार्य आणि कालांतराने पुनरावृत्तीने घेणे आवश्यक असेल, एकदाच घेऊन पूर्ण होणारी प्रक्रिया राहणार नाही. तसेच मान्यतेचे निकाल सार्वजनिकपणे उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. या पद्धतीमुळे मान्यताप्राप्ती ही केवळ औपचारिक प्रक्रिया न राहता गुणवत्ता वृद्धीचे गतिशील साधन बनणार आहे.

या सुधारणेत कार्यप्रदर्शन-आधारित निधीवरही भर देण्यात आला आहे. प्रस्तावित चौकटीअंतर्गत निधी आणि अनुदान वाटप हे संशोधन उत्पादन, विद्यार्थ्यांचे शिकण्याचे परिणाम, रोजगारक्षमता, सामाजिक समावेशकता आणि नवोपक्रम यांसारख्या मोजता येण्याजोग्या निकषांशी अधिकाधिक

जोडले जाईल. याचा उद्देश संस्थांना त्यांच्या कार्याचा राष्ट्रीय विकास उद्दिष्टांशी आणि जागतिक मानकांशी सुसंगतपणे संरेखित करण्यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे.

डिजिटल प्रशासन हेही या विधेयकाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. अर्ज, मंजुरी, अनुपालन अहवाल आणि माहिती संकलन यासाठी केंद्रीकृत डिजिटल नियामक व्यासपीठ विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. अशा व्यासपीठामुळे प्रशासकीय विलंब कमी होतील, पारदर्शकता वाढेल आणि धोरणनिर्मितीसाठी तात्काळ माहिती उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे. याशिवाय दंड आणि दुरुस्ती उपाययोजनांसाठीही तरतुदी करण्यात आल्या आहेत. नियामक अटींचे पालन न करणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या पद्धतींचा अवलंब करणाऱ्या किंवा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुद्ध मान्यता रद्द करणे, आर्थिक दंड किंवा इतर सुधारात्मक कारवाई करण्यात येऊ शकते. त्याचवेळी, अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धतींवरील हस्तक्षेप मर्यादित करून शैक्षणिक स्वातंत्र्याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे, ज्यामुळे संस्थांना नवोपक्रम आणि वैविध्य साध्य करण्यासाठी आवश्यक अवकाश मिळेल.

## गुणवत्ता हमी आणि परिणाम-आधारित मूल्यमापन-

संमत झालेल्या नियामक सुधारणेतील सर्वात परिवर्तनकारी पैलूंपैकी एक म्हणजे गुणवत्ता हमीचा पाया म्हणून परिणाम-आधारित मूल्यमापनावर दिलेला भर. पारंपरिक पद्धतींमध्ये गुणवत्ता ही भौतिक पायाभूत सुविधा किंवा कर्मचाऱ्यांची संख्या यांच्याशी जोडली जात असे. मात्र, नवीन चौकट विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात काय शिकले, ते आपले ज्ञान वास्तव जीवनातील परिस्थितींमध्ये कसे वापरू शकतात आणि संस्था संशोधन, नवोपक्रम व सामाजिक विकासात कसा सहभाग घेतात यावर अधिक भर देते.

व्यवहारात याचा अर्थ असा की, संस्थांचे मूल्यमापन विद्यार्थी कामगिरी, पदवीधर दर, रोजगारक्षमता, संशोधन प्रकाशने, पेटंट्स, समुदाय सहभाग आणि राष्ट्रीय प्राधान्यांमधील योगदान अशा निर्देशकांवर केले जाईल. मान्यता आणि नियामक मूल्यमापन या परिणामांचा व तसेच ते निर्माण करणाऱ्या प्रक्रियांचा, जसे की, अभ्यासक्रम रचना, अध्यापन पद्धती, मूल्यमापन प्रणाली आणि साहाय्य सेवा—विचार करतील. मान्यतेचे निकाल आणि निवडक कार्यप्रदर्शन निर्देशक सार्वजनिकपणे जाहीर केल्यामुळे पारदर्शकता आणि माहितीपूर्ण निवडीचे वातावरण निर्माण होईल.

परिणाम-आधारित मूल्यमापन संस्थांना केवळ किमान अनुपालनाच्या चौकटीत न राहता सातत्यपूर्ण सुधारणा करण्यास प्रोत्साहित करते. तसेच गुणवत्ता हमीच्या जागतिक प्रवाहाशीही ते सुसंगत आहे, जिथे शिक्षणाचा विद्यार्थ्यांवर आणि समाजावर होणारा परिणाम हा संस्थात्मक कार्यक्षमतेचा मुख्य मापदंड मानला जातो.

## विद्यार्थ्यांवरील परिणाम-

यामध्ये विद्यार्थ्यांसाठीही नियामक सुधारणा अनेक पद्धतीने सकारात्मक परिणाम घडवून आणू शकते. मान्यता प्रक्रिया अधिक कठोर आणि पारदर्शक होत असल्याने, नवीन निकषांशी यशस्वीपणे जुळवून घेणाऱ्या संस्थांमध्ये शैक्षणिक मानके आणि शिकण्याचे वातावरण अधिक चांगले होण्याची अपेक्षा आहे. जनरल एज्युकेशन कौन्सिलकडून शिकण्याचे परिणाम निश्चित करणे आणि लवचिक क्रेडिट प्रणाली अंमलात आणणे यामुळे विद्यार्थ्यांना अधिक वैयक्तिकृत आणि बहुविषयक शिक्षणमार्ग निवडता येतील. उदाहरणार्थ, ते विविध विषयांतील अभ्यासक्रम एकत्र करू शकतील, संस्थांदरम्यान क्रेडिट हस्तांतर करू शकतील आणि त्यांच्या पदवी कार्यक्रमाचा भाग म्हणून अनुभवाधारित शिक्षण किंवा संशोधन प्रकल्पांमध्ये सहभागी होऊ शकतील.

डिजिटल प्रशासनावर आणि शिक्षणातील तंत्रज्ञानाच्या समाकलनावर दिलेला भर देशभरातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिकण्याच्या साधनांपर्यंत जसे की, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि डिजिटल ग्रंथालये - अधिक प्रवेश उपलब्ध करून देईल. तसेच परिणाम-आधारित मूल्यमापन आणि कार्यप्रदर्शन-संबंधित निधीमुळे अभ्यासक्रम रोजगारक्षमता आणि उद्योजकतेशी अधिक सुसंगत होण्यास प्रोत्साहन मिळेल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना करिअर तयारी आणि कामगार बाजाराच्या गरजांशी सुसंगत शिक्षणाचा लाभ होण्याची शक्यता आहे.

उच्च गुणवत्ता हमी आणि आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धतींशी सुसंगतता यामुळे भारतीय पदव्यांची जागतिक मान्यता अधिक बळकट होईल, ज्यामुळे पदवीधरांना शैक्षणिक स्थलांतर आणि आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी अधिक सुलभपणे उपलब्ध होतील.

## प्राध्यापक आणि संशोधकांवरील परिणाम-

हे नियामक प्राध्यापक आणि संशोधकांसाठी ही एक महत्त्वाची सुधारणा संधी आणि आव्हाने दोन्ही एकत्रितपणे घेऊन आली आहे. सकारात्मक बाब म्हणजे संस्थात्मक स्वायत्ततेवर आणि सूक्ष्म-नियमनातील कपातीवर दिलेला भर अधिक शैक्षणिक स्वातंत्र्य प्रदान करू शकतो. त्यामुळे शिक्षकांना नवोपक्रमशील अध्यापन पद्धती, आंतरशाखीय अभ्यासक्रम आणि सहकारी संशोधन प्रकल्पांचा प्रयोग करण्याची संधी मिळू शकते. अतिरेकी प्रक्रियात्मक बंधनांपासून मुक्त झालेल्या संस्था प्राध्यापकांच्या उपक्रमांना आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यांना अधिक समर्थन देण्यास तयार असतील.

त्याचवेळी, संस्थात्मक आणि वैयक्तिक मूल्यमापनात कार्यप्रदर्शन निर्देशकांचे वाढते महत्त्व हे निश्चितच प्राध्यापकांवर अध्यापन आणि संशोधनामध्ये मोजता येण्याजोगे परिणाम देण्याचा अधिक दबाव आणू शकते. पदोन्नती आणि करिअर प्रगती संशोधन उत्पादन, अध्यापनाची गुणवत्ता, विद्यार्थी अभिप्राय आणि संस्थात्मक



उद्दिष्टांतील योगदान यावर अधिकाधिक अवलंबून राहू शकते, जे प्रेरणादायी असले तरी आव्हानात्मकही ठरू शकते. संभाव्य ताण कमी करण्यासाठी संस्थांनी प्राध्यापक विकास, मार्गदर्शन आणि समर्थ संशोधन परिसंस्थेत गुंतवणूक करणे आवश्यक असेल, ज्यामध्ये निधी, पायाभूत सुविधा आणि सहकार्य जाळ्यांपर्यंत प्रवेश यांचा समावेश असेल.

एकूणच, संतुलित आणि समर्थ पद्धतीने अंमलबजावणी झाल्यास, या सुधारणा उत्कृष्टता, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांप्रती बांधिलकी यांना ओळखून त्यांचे कौतुक करणारी अधिक सशक्त शैक्षणिक संस्कृती निर्माण करू शकतात.

## संस्थांवरील परिणाम-

उच्च शिक्षण संस्थांसाठी नवीन नियामक रचना परिवर्तनकारी परिस्थिती निर्माण करीत असून, अधिक स्वायत्ततेचे आश्वासन आणि स्पष्ट जबाबदारीची आवश्यकता या दोन्ही गोष्टींमुळे संस्थांना त्यांच्या प्रशासन, धोरणात्मक नियोजन आणि अंतर्गत गुणवत्ता हमी यंत्रणांचा पुनर्विचार करावा लागेल. नियामक आणि मान्यता अपेक्षा पूर्ण करण्यासाठी तसेच सातत्यपूर्ण सुधारणेसाठी परिणाम-संबंधित माहितीचा उपयोग करण्यासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालयांना त्यांच्या अंतर्गत गुणवत्ता कक्षांना, माहिती व्यवस्थापन प्रणालींना आणि अभिप्राय प्रक्रियांना अधिक बळकट करावे लागेल.

निधी चौकट आणि कार्यप्रदर्शन यांच्यातील संबंध संस्थांना संशोधन समूह, नवोपक्रम केंद्रे, विद्यार्थी साहाय्य सेवा आणि उद्योग भागीदारी यांसारख्या क्षेत्रांमध्ये धोरणात्मक गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करेल. जे संस्था यशस्वीरीत्या जुळवून घेतील त्या त्यांची प्रतिमा उंचावू शकतील, अधिक सक्षम प्राध्यापक व विद्यार्थी आकर्षित करू शकतील आणि अधिक संसाधने मिळवू शकतील. उलटपक्षी, सुधारणा स्वीकारण्यास असमर्थ किंवा अनिच्छुक संस्था मान्यता किंवा निधी टिकवून ठेवण्यात अडचणींचा सामना करू शकतात, ज्याचा त्यांच्या अस्तित्वावर परिणाम होऊ शकतो.

संक्रमण कालावधी विशेषतः लहान किंवा मर्यादित संसाधन असलेल्या संस्थांसाठी आव्हानात्मक ठरू शकतो, कारण त्यांना नवीन अपेक्षा आणि निकषांशी जुळवून घ्यावे लागेल. गुणवत्ता हमी आणि डिजिटल प्रशासनाच्या मागण्यांना तोंड देण्यासाठी सहकार्य, संघटन (consortia) आणि सामायिक सेवा या अशा संस्थांसाठी महत्त्वाच्या धोरणात्मक उपाययोजना ठरू शकतात.

## सरकार आणि प्रशासनावरील परिणाम-

या विधेयकात सरकार आणि सार्वजनिक धोरणाच्या दृष्टिकोनातून पाहता, स्वतंत्र कार्यात्मक उभ्या घटकांसह एकाच नियामक संस्थेकडे वाटचाल केल्याने उच्च शिक्षण प्रशासनात अधिक सुसंगतता आणि कार्यक्षमता साध्य होऊ शकते. विविध वैधानिक संस्थांशी स्वतंत्रपणे व्यवहार करण्याऐवजी केंद्र सरकार एकसंध आयोगासोबत काम करून धोरणात्मक दिशा ठरवू शकते, राष्ट्रीय उद्दिष्टांशी नियमांचे सरेखन करू शकते आणि संपूर्ण प्रणालीच्या कार्यक्षमतेवर देखरेख ठेवू शकते.

डिजिटल आणि माहिती-समृद्ध नियामक व्यासपीठाची सुरूवात केल्यामुळे संस्थांची कार्यक्षमता, प्रवेश पद्धती, आर्थिक स्थिती आणि इतर प्रमुख निर्देशकांबाबत तात्काळ किंवा जवळपास तात्काळ माहिती उपलब्ध होऊ शकते, ज्यामुळे पुराव्यांवर आधारित निर्णयप्रक्रिया शक्य होते. अशी माहिती धोरणात्मक हस्तक्षेप, संसाधन वाटप आणि दुर्लक्षित प्रदेश किंवा गटांसाठी लक्ष्यित साहाय्य यांसाठी उपयुक्त ठरू शकते.

नियमन आणि निधी वितरण कार्ये वेगळी केल्यास, ज्या प्रमाणात हे प्रत्यक्षात साध्य होते, त्यामुळे हितसंबंधांचा संघर्ष कमी होऊ शकतो आणि अनुदान व सबसिडी कशा दिल्या जातात आणि त्यांचे परीक्षण कसे केले जाते यामध्ये पारदर्शकता वाढू शकते. तथापि, मुख्य नियामक कार्यांचे केंद्रीकरण झाल्याने शिक्षण क्षेत्रातील केंद्र आणि राज्य यांच्यातील भूमिकेच्या संतुलनाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे, कारण शिक्षण हे घटनात्मकदृष्ट्या समवर्ती विषय आहे.

## आव्हाने आणि टीका-

मुख्यतः या विधेयकात संभाव्य लाभ असूनही, शिक्षण क्षेत्रातील नियामक सुधारणेला टीकेचा सामना करावा लागत आहे आणि अनेक व्यावहारिक आव्हानांनाही तोंड द्यावे लागत आहे. वारंवार व्यक्त होणारी एक चिंता म्हणजे अतिशय केंद्रीकरणाची

शक्यता. टीकाकारांचे मत आहे की, अत्याधिक अधिकार एका केंद्रीय आयोगाकडे दिल्यास राज्य सरकारांची स्वायत्तता मर्यादित होऊ शकते आणि प्रादेशिक शैक्षणिक गरजा व प्राधान्यांचा विविधतेचा विचार कमी होऊ शकतो. भारतासारख्या विशाल आणि विविधतेने नटलेल्या व परिपूर्ण देशात, जिथे राज्यस्तरीय उपक्रम आणि नवोपक्रमांनी ऐतिहासिकदृष्ट्या शिक्षण विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, ही बाब विशेष महत्त्वाची ठरते.

अंमलबजावणी हे आणखी एक मोठे आव्हान आहे. यूजीसी, एआयसीटीई आणि एनसीटीई यांसारख्या विद्यमान संस्थांची कार्ये एचईसीआयच्या संरचनेत समाकलित करणे ही कायदेशीर, प्रशासकीय आणि सांस्कृतिक बदलांची गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. जुन्या पद्धतींना सरावलेले अधिकारी आणि संस्था यांच्याकडून प्रतिकार होऊ शकतो, तसेच नवीन प्रणाली - विशेषतः डिजिटल व्यासपीठे - स्वीकारताना शिकण्याची प्रक्रिया आवश्यक असेल. या व्यतिरिक्त संसाधन मर्यादा देखील सुधारणेच्या प्रभावीतेवर परिणाम करू शकतात. उच्च दर्जाची मान्यता, माहिती व्यवस्थापन आणि देखरेख यासाठी पुरेसे कर्मचारी आणि कुशल यंत्रणा तसेच सक्षम तांत्रिक पायाभूत सुविधा आवश्यक असतात. लहान आणि ग्रामीण संस्था अतिरिक्त आर्थिक व तांत्रिक सहाय्याशिवाय नवीन निकष पूर्ण करण्यात अडचणीत येऊ शकतात. काही टीकाकारांनी अशीही चिंता व्यक्त केली आहे की, कार्यप्रदर्शन-आधारित निधी आणि परिणाम - केंद्रित मूल्यमापन प्रणाली आधीपासूनच सक्षम संसाधने असलेल्या संस्थांना अधिक लाभ देऊ शकते आणि त्यामुळे व्यवस्थेमध्ये अधिक स्तरिकरण (stratification) निर्माण होऊ शकते.

संस्थांनी कार्यप्रदर्शन निर्देशक सुधारण्याचा प्रयत्न केल्यास प्राध्यापकांवर कामाचा ताण आणि दबाव वाढू शकतो, ज्याचा मनोबल आणि टिकावावर परिणाम होऊ शकतो, जर त्यासोबत पुरेसे समर्थन आणि मान्यता नसेल. या जोखमींमुळे टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी, सर्व संबंधित घटकांशी सल्लामसलत आणि तक्रार निवारण तसेच धोरणात्मक लवचिकतेची यंत्रणा अत्यंत महत्त्वाची ठरते.

### जागतिक नियामक मॉडेल्सशी तुलना-

तुलनात्मक दृष्टिकोनातून पाहता, भारताची प्रस्तावित नियामक रचना जागतिक प्रवाहांशी काही बाबतीत सुसंगत आहे, तर काही बाबतीत भारतीय संदर्भानुसार वैशिष्ट्यपूर्ण आहे. उदाहरणार्थ, युनायटेड किंगडममध्ये 'ऑफिस फॉर स्टुडंट्स' ही स्वतंत्र नियामक संस्था विद्यार्थ्यांच्या हित, गुणवत्ता आणि परिणामांवर लक्ष केंद्रित करते आणि शैक्षणिक विषयवस्तूवरील सूक्ष्म नियंत्रणावर भर देत नाही. ऑस्ट्रेलियामध्ये 'टर्शियरी एज्युकेशन क्वालिटी अँड स्टँडर्डस एजन्सी' सर्व संस्थांमध्ये मानके आणि गुणवत्ता हमी यावर भर देते, ज्यामध्ये अनुपालन आणि सातत्यपूर्ण सुधारणा यांना महत्त्व दिले जाते.

संयुक्त राज्यांमध्ये मान्यता आणि

## निष्कर्ष

*भारतीय उच्च शिक्षण आयोगाच्या चौकटीद्वारे साकारलेली शिक्षण क्षेत्रातील नियामक सुधारणा ही भारतातील उच्च शिक्षण प्रशासनातील एक महत्त्वपूर्ण वळणबिंदू व मैलाचा दगड ठरत असून, प्रमुख नियामक संस्थांचे एकत्रीकरण करून आणि नियमन, मान्यता, निधी चौकट व शैक्षणिक मानक-निर्धारण या कार्यांचे स्पष्ट विभाजन करून, ही सुधारणा तुकडीकरण, पुनरावृत्ती आणि इनपुट-केंद्रित नियंत्रण या दीर्घकालीन समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न करते. ही सुधारणा स्वायत्तता, गुणवत्ता आणि जबाबदारी यांवर आधारित 'हलके पण कठोर' अशा नियामक दृष्टिकोनाची वकिली करणाऱ्या 'एनईपी २०२०'च्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे.*

*पुढील प्रवासात अतिशय केंद्रीकरणाचा धोका, अंमलबजावणीतील अडचणी आणि संसाधन मर्यादा यांसारखी मोठी आव्हाने असली तरी संभाव्य लाभ लक्षणीय आहेत. सुलभ, पारदर्शक आणि परिणाम-केंद्रित नियामक वातावरण संस्थात्मक नवोपक्रमाला चालना देऊ शकते, संशोधन व अध्यापन अधिक बळकट करू शकते आणि विद्यार्थ्यांचे अनुभव व परिणाम सुधारू शकते. व्यापक दृष्टीने पाहता, अशी प्रणाली भारताला जागतिक ज्ञाननेते बनण्याच्या आकांक्षेला बळ देऊ शकते आणि शिक्षणाला समावेशक राष्ट्रीय विकासाचे प्रमुख साधन म्हणून अधिक प्रभावीपणे वापरण्यास सक्षम करू शकते.*

गुणवत्ता हमी ही प्रादेशिक व विशेषीकृत मान्यतादाता संस्थांमार्फत केली जाते, ज्या औपचारिकरित्या सरकारपासून स्वतंत्र असल्या तरी विशिष्ट उद्देशांसाठी संघीय प्राधिकरणांकडून मान्यता प्राप्त असतात. त्याच्या तुलनेत भारतातील एचईसीआय चौकट अधिक केंद्रीकृत आहे, जे प्रणालीच्या प्रचंड व्याप्तीचे आणि हजाराहून अधिक विद्यापीठे व पन्नास हजाराहून अधिक महाविद्यालये असलेल्या देशात राष्ट्रीय समन्वयाची गरज प्रतिबिंबित करते. एनईपी २०२० नुसार, भारताने नियमन, मान्यता, निधी आणि शैक्षणिक मानक-निर्धारण ही कार्ये वेगळी करण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यात इतर काही देशांमध्ये अवलंबलेल्या संतुलन आणि नियंत्रण (checks-and-balanc-es) मॉडेल्सशी साम्य दिसते; परंतु हे सर्व एका एकसंध आयोगाच्या चौकटीत केले जात आहे. म्हणूनच, भारतीय मॉडेल हे एक प्रकारचे मिश्र मॉडेल म्हणून पाहता येते, जे केंद्रीकृत देखरेखीला संस्थात्मक स्वायत्तता आणि परिणाम-आधारित मूल्यमापनाशी जोडण्याचा प्रयत्न करते. प्रत्यक्ष अंमलबजावणीत हा समतोल कितपत प्रभावीपणे राखला जातो यावर त्याचे यश अवलंबून असेल.

## दीर्घकालीन आर्थिक आणि सामाजिक परिणाम-

दीर्घकालीन दृष्टीने, परिणाम-केंद्रित आणि प्रभावीपणे कार्य करणारी उच्च शिक्षण नियामक व्यवस्था भारताच्या आर्थिक आणि सामाजिक संरचनेला लक्षणीय बळकटी देऊ शकते. उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि सुसंगतता सुधारल्यास उद्योग, सरकार आणि नागरी समाजासाठी उपलब्ध मानवी संपत्ती अधिक सक्षम होईल, ज्यामुळे उत्पादकता, नवोपक्रम आणि स्पर्धात्मकता वाढेल. कार्यप्रदर्शन-आधारित निधी आणि जागतिक सहकार्यांनी समर्थित मजबूत संशोधन परिसंस्था विज्ञान आणि तंत्रज्ञानातील



प्रगतीस चालना देऊ शकतात, स्टार्ट-अप संस्कृतीला पाठबळ देऊ शकतात आणि राष्ट्रीय तसेच जागतिक आव्हानांवर उपाय शोधण्यात योगदान देऊ शकतात.

सामाजिक स्तरावर, समावेशक आणि न्याय्य उच्च शिक्षण व्यवस्था सामाजिक उन्नतीला चालना देते, पिढ्यानपिढ्या चालणाऱ्या दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यास मदत करते आणि अधिक जागरूक व सक्रिय नागरिकत्वाच्या निर्मितीस हातभार लावते. पारदर्शकतेवर, मान्यतेचे निकाल सार्वजनिकपणे जाहीर करण्यावर आणि जबाबदारीवर दिलेला भर उच्च शिक्षणावरील सार्वजनिक विश्वास पुनर्स्थापित करण्यात मदत करू शकतो आणि विद्यार्थ्यांना शोषणात्मक किंवा निकृष्ट दर्जाच्या संस्थांपासून संरक्षण देऊ शकतो. जर उपेक्षित घटकांसाठी प्रवेश वाढविण्यासाठी लक्षित निधी किंवा सकारात्मक धोरणे राबवली गेली, तर या सुधारणा आर्थिक वाढीसोबतच सामाजिक न्यायालाही चालना देऊ शकतात.

शेवटी, या सुधारणांमुळे भारताला जागतिक पातळीवर ज्ञानकेंद्र म्हणून स्थान मिळविण्यास मदत होऊ शकते, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थी, विद्वान आणि शिक्षण व संशोधनातील गुंतवणूक आकर्षित होऊ शकते.

## भावी संधी आणि शाश्वतता-

शिक्षण क्षेत्रातील नियामक सुधारणेचे भवितव्य मोठ्या प्रमाणावर तिच्या अंमलबजावणीच्या गुणवत्तेवर आणि प्रणालीने अभिप्रायाला दिलेल्या प्रतिसाद क्षमतेवर अवलंबून असेल. सातत्यपूर्ण देखरेख, कठोर मूल्यमापन आणि विद्यार्थी, प्राध्यापक, संस्था, राज्य सरकारे आणि उद्योग अशा सर्व संबंधित घटकांशी खुला संवाद आवश्यक ठरेल, जेणेकरून सुधारणा अपेक्षित उद्दिष्टे साध्य करतील आणि अनपेक्षित परिणामांना वेळेवर सामोरे जाता येईल. एचईसीआय आणि त्याचे उभे घटक तांत्रिक नवोपक्रम, कामगार बाजारातील बदल आणि जागतिक उच्च शिक्षणातील घडामोडी यांसारख्या बदलत्या परिस्थितीनुसार विकसित होणे आवश्यक आहे.

क्षमता वृद्धी अत्यंत महत्त्वाची ठरेल. नियामक संस्था, संस्थात्मक नेतृत्व आणि प्राध्यापक यांना परिणाम-आधारित मूल्यमापन, डिजिटल प्रशासन आणि कार्यप्रदर्शन-संबंधित निधी यांसारख्या नव्या चौकटी समजून घेण्यासाठी आणि त्यानुसार कार्य करण्यासाठी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विशेषतः संशोधन आणि वंचित प्रदेशांतील संस्थांसाठी उच्च शिक्षणात पुरेशी सार्वजनिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे, जेणेकरून सुधारणा असमानता वाढविण्याऐवजी ती कमी करण्यास मदत करतील. आंतरराष्ट्रीय भागीदारीमुळे मानकनिर्धारण, सहकारी संशोधन आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण यांसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध होऊ शकतात.

दृष्टी, बांधिलकी आणि लवचिकता यांसह सातत्याने पुढे नेल्यास, या सुधारणा येत्या दशकांत भारतीय उच्च शिक्षणाचे स्वरूप मूलभूतपणे बदलू शकतात, ज्यामुळे व्यापक प्रवेशासोबत उच्च गुणवत्ता आणि जागतिक सुसंगतता साध्य करता येईल.




# अप्रेंटशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) : उच्च शिक्षणातील नव्या युगाची नांदी

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) हे भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणारे ठरले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश केवळ पदवीधारक तयार करणे नसून, उद्योगांना आवश्यक असलेले कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करणे हा आहे. याच उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये 'अप्रेंटशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (AEDP) राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.**



**डॉ. पराग काळकर**
(प्र-कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी महाराष्ट्रामध्ये प्रभावीपणे होत असताना राष्ट्रीय पातळीवर दिसणारे दृश्य काय आहे? तर, उच्च शिक्षण संस्थांमधून पदवी अथवा पदव्युत्तर पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांकडे नोकरी व्यवसाय करण्यासाठी मात्र पुरेशी कौशल्ये नसतात. शिक्षण आणि उद्योग यांच्या समन्वयातून 'कौशल्यपूर्ण रोजगारासाठी' या विद्यार्थ्यांना कसे घडवता येईल यावर विचार सुरू झाला. याच विचारांचा पुढील टप्पा म्हणजे, उद्योग / व्यवसायासाठी पूरक; परंतु शिक्षणाची सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण असा समन्वय साधणारा प्रयोग संपूर्ण देशांमध्ये हाती घेण्याचा प्रयत्न आहे. विद्यापीठ अनुदान आयोग आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद अशा शिखर संस्थांच्या माध्यमातून विविध विषयातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांनी या संदर्भात काही मार्गदर्शक सूचना तयार करून निर्गमित केल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री .ना. चंद्रकांत दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी यांनी सर्व सार्वजनिक विद्यापीठांमार्फत 'अप्रेंटशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (AEDP) हा उपक्रम विद्यापीठांमधील विविध विभागांच्या

माध्यमातून तसेच काही स्वायत्त महाविद्यालयांमधून राबविण्याचे निश्चित केले आहे. हा प्रयोग भविष्यामधील सर्व अभ्यासक्रमांचे स्वरूप बदलणारा आहे. शासन तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग यासाठी सातत्यपूर्ण मार्गदर्शन करत आहे या प्रकल्पाचा सातत्याने आढावा घेत आहे. भारतामध्ये उच्च शिक्षण संस्थांचे नियमन करणाऱ्या प्रमुख दोन संस्था म्हणजे 'विद्यापीठ अनुदान आयोग' आणि 'अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद' (UGC & AICTE). विद्यापीठ अनुदान आयोगाने पारंपरिक अभ्यासक्रमांना अधिक परिपूर्ण आणि परिणामकारक करण्याच्या अनुषंगाने तीन आणि चार वर्षांचे पदवी अभ्यासक्रम उद्योग / व्यवसायांशी संपर्क साधून काही AEDP पदवी नव्याने तयार करण्याचे आवाहन केले आहे. तर सध्या उपलब्ध असणाऱ्या चार वर्षे अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे परिवर्तन AEDP अभ्यासक्रमांमध्ये करण्याचे निर्देश अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिले आहेत. यामध्ये किमान एक सत्र ते कमाल तीन सत्र म्हणजेच ६ ते १८ महिने साधारणतः विद्यार्थी स्वतः वर्गामध्ये शिकलेले ज्ञान व्यावसायिक आस्थापना तसेच या उपक्रमाशी संलग्नित कंपन्यांमध्ये जाऊन पूर्ण वेळ काम करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. म्हणजेच वर्गामध्ये विद्यार्थ्याला जे विषय ज्ञान मिळेल त्याचे उपयोजन (Application) व्यवसायामध्ये करण्याचा हा अभिनव प्रयोग आहे. वर्गात मिळणारे ज्ञान प्रत्यक्ष वापरायचे आहे ही जाणीव झाल्यावर फक्त परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या मानसिकतेमधून बाहेर पडून तो विद्यार्थी वर्गातील शिक्षण प्रक्रियेत अधिक जाणीवपूर्वक सहभागी होण्याची शक्यता आहे. यामुळे विद्यार्थ्याला कौशल्यावर आधारित व्यवसायाभिमुख शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) हे भारतीय शिक्षण व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणणारे ठरले आहे. या धोरणाचा मुख्य उद्देश केवळ पदवीधारक तयार करणे नसून, उद्योगांना आवश्यक असलेले कौशल्यपूर्ण मनुष्यबळ निर्माण करणे हा आहे. याच उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये 'अप्रेंटिशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' (AEDP) राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

### 1. पार्श्वभूमी आणि उद्देश :

- 'शिका आणि कमवा' या संकल्पनेवर आधारित AEDP या कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत:
- पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता (Employability) वाढवणे.
- परिणाम-आधारित शिक्षण देत (Outcome-based learning) विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक गुण विकसित करणे.
- उच्च शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यात सक्रिय समन्वय निर्माण करणे.
- उद्योगांमधील कौशल्यांची कमतरता भरून काढण्यासाठी प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

### 2. कार्यक्रमाचे स्वरूप आणि अंमलबजावणी :

AEDP अंतर्गत विद्यार्थ्याला त्याच्या पदवी अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून उद्योगात प्रत्यक्ष कामावर आधारित प्रशिक्षण (On-the-Job Training - OJT) दिले जाते. हे प्रशिक्षण केवळ इंटर्नशिप नसून तो पदवीचा एक अविभाज्य भाग आहे.

- पात्र संस्था : नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (NIRF) मध्ये मानांकन प्राप्त किंवा NAAC मान्यताप्राप्त संस्था हा कार्यक्रम राबवू शकतात.
- प्रवेश प्रक्रिया : या कार्यक्रमाची प्रवेश प्रक्रिया नियमित पदवी अभ्यासक्रमाप्रमाणेच असेल.
- मल्टीपल एंट्री-एक्झिट : राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (NCrF) नुसार विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात एकाधिक प्रवेश आणि बाहेर पडण्याचे पर्याय (Multiple Entry-Multiple Exit) उपलब्ध असतील.
- विद्यापीठांचे दायित्व : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रत्येक विद्यापीठाने किमान ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी या कार्यक्रमांतर्गत करणे बंधनकारक आहे.

### 3. कालावधी आणि क्रेडिट यंत्रणा :

AEDP मध्ये प्रशिक्षणाचा कालावधी अभ्यासक्रमाच्या कालावधीनुसार निश्चित करण्यात आला आहे.

- ३ वर्षांचा अभ्यासक्रम : किमान १ ते कमाल ३ सत्रांसाठी (Semesters) अप्रेंटिशिप अनिवार्य असेल.
- ४ वर्षांचा अभ्यासक्रम : किमान २ ते कमाल ४ सत्रांसाठी अप्रेंटिशिप अनिवार्य असेल.
- प्रशिक्षणाचा क्रेडिटमध्ये समावेश करताना कालावधीचा विचार केला जातो. उदाहरणार्थ, ३ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी १० क्रेडिट्स दिले जातील. प्रशिक्षणादरम्यान मिळालेले क्रेडिट्स विद्यार्थ्याच्या गुणपत्रकावर स्पष्टपणे नमूद केले जातील, ज्यात प्रशिक्षणाचे ठिकाण आणि उद्योगाचे नावही असेल.

### 4. त्रिपक्षीय करार आणि विद्यावेतन (Stipend) :

या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शैक्षणिक संस्था, संबंधित उद्योग आणि विद्यार्थी यांच्यात 'त्रिपक्षीय करार' (Tripartite Agreement) होणे अनिवार्य आहे. या करारामुळे तिन्ही घटकांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट होतात.

प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जाईल. याचे दोन पर्याय आहेत.

1. NATS पोर्टलद्वारे : भारत सरकारच्या नॅशनल अप्रेंटिशिप ट्रेनिंग स्कीम (NATS) अंतर्गत नोंदणी करून शासनाकडून मिळणारे विद्यावेतन.
2. थेट उद्योगामार्फत : अप्रेंटिशिप कायदा १९६१ नुसार संबंधित उद्योगामार्फत दिले जाणारे विद्यावेतन.

### 5. मूल्यांकन पद्धत :

विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचे मूल्यमापन केवळ परीक्षेवर अवलंबून नसून ते सर्वसमावेशक असेल.

- उद्योगामार्फत मूल्यांकन : ३०% ते ४०%




गुण.

- फॅकल्टी मेंटॉरद्वारे मूल्यमापन : ३०% ते ४०% गुण.
- सादरीकरण आणि तोंडी परीक्षा : २०% ते ४०% गुण.
- विद्यार्थ्यांची उपस्थिती, शिस्त, कौशल्य आत्मसात करण्याची क्षमता आणि कामाची प्रगती या आधारावर त्यांचे अंतिम ग्रेड ठरवले जातील.

### 6. निष्कर्ष :

AEDP मुळे विद्यार्थ्यांना पदवी घेतानाच कामाचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल, ज्यामुळे पदवी पूर्ण झाल्यावर त्यांना रोजगारासाठी वणवण करावी लागणार नाही. उद्योगांना देखील तयार आणि प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय राज्याच्या शैक्षणिक आणि औद्योगिक प्रगतीला नवी दिशा देणारा ठरेल. राज्यातील सर्व विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन कौशल्यपूर्ण पिढी घडवण्यासाठी सक्रिय व्हावे अशी अपेक्षा आहे .

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २२ एप्रिल २०२५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार, राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अप्रेंटिशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. हे अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार केले जाणार आहेत. जरी शासन निर्णयामध्ये विशिष्ट अभ्यासक्रमांची नावे दिलेली नसली, तरी या धोरणांतर्गत खालील प्रकारचे अभ्यासक्रम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत:

**1. प्रस्तावित अभ्यासक्रमांचे स्वरूप** :

- व्यावसायिक आणि कौशल्य-आधारित पदवी : उद्योगांना आवश्यक असलेल्या कौशल्यांवर आधारित (Skill-based) नवीन अभ्यासक्रम तयार करण्यास विद्यापीठांना सांगण्यात आले आहे.
- नियमित पदवींचे रूपांतर : विद्यापीठे त्यांच्या सध्या सुरू असलेल्या नियमित पदवी अभ्यासक्रमांचे (उदा. B.A., B.Com., B.Sc.) रूपांतर 'AEDP' मध्ये करू शकतात.

**2. अंमलबजावणीची व्याप्ती :**

- विद्यापीठांचे दायित्व : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रत्येक सार्वजनिक अकृषी विद्यापीठाने (उदा. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ इ.) किमान ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी या कार्यक्रमांतर्गत करणे बंधनकारक आहे.
- संधीची क्षेत्रे : हे अभ्यासक्रम प्रामुख्याने तांत्रिक शिक्षण (Technical Education) आणि सामान्य उच्च शिक्षण अशा दोन्ही क्षेत्रांत राबवले जातील.

**3. अभ्यासक्रमांची रचना (उदाहरणार्थ) :**

- शासन निर्णयानुसार, ३ आणि ४ वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमांमध्ये अप्रेंटिशिप खालीलप्रमाणे असेल :
- ३ वर्षांची पदवी (उदा. B.Voc. किंवा B.Com. AEDP) : किमान १ ते कमाल ३ सत्रांसाठी (Semesters) प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण.



- ४ वर्षांची पदवी (उदा. B.E. किंवा B.Tech. AEDP) : किमान २ ते कमाल ४ सत्रांसाठी प्रत्यक्ष औद्योगिक प्रशिक्षण.

थोडक्यात, विद्यापीठे त्यांच्या अधिष्ठाता मंडळ (BOD) आणि विद्या परिषदेच्या (Academic Council) मान्यतेने, उद्योगांशी करार करून विशिष्ट क्षेत्रातील (उदा. रिटेल, लॉजिस्टिक्स, आयटी, मॅन्युफॅक्चरिंग) पदवी अभ्यासक्रम २०२५-२६ पासून सुरू करणार आहेत.

## भविष्यकालीन योजना आणि अंमलबजावणीची दिशा

**1. शैक्षणिक व्याप्ती आणि विस्तार योजना :**

- विद्यार्थी नोंदणीचे उद्दिष्ट : २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक विद्यापीठाने किमान ३०० विद्यार्थ्यांची नोंदणी AEDP अंतर्गत करणे अनिवार्य केले आहे. भविष्यात ही संख्या टप्प्याटप्प्याने वाढवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कौशल्य-आधारित शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे नियोजन आहे.
- अभ्यासक्रमांचे रूपांतर : विद्यापीठे त्यांच्या सध्याच्या पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांना (उदा. B.A., B.Com., B.Sc.) उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार AEDP मध्ये रूपांतरित करू शकतील. यामुळे पदवी घेतानाच विद्यार्थ्याला कामाचा अनुभव मिळेल.

**2. उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमधील समन्वय :**

- सक्रिय भागीदारी : उच्च शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यात सक्रिय समन्वय (Active Linkage) निर्माण करण्यासाठी त्रिपक्षीय करार (Tripartite Agreement) केले जातील. यामुळे उद्योगांमधील कौशल्यांची कमतरता (Skill Gap) भरून काढणे सोपे होईल.
- अभ्यासक्रम निर्मिती (Co-creation) : उद्योगांच्या सहकार्याने भविष्यातील गरजा ओळखून प्रत्यक्ष कामावर आधारित (On-the-Job Training) अभ्यासक्रम तयार केले जातील.

**3. क्रेडिट आणि मूल्यांकन सुधारणा :**

- कालावधीवर आधारित क्रेडिट्स : भविष्यात प्रशिक्षणाचे क्रेडिट्स तासांऐवजी कालावधीनुसार दिले जातील (उदा. ३ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी १० क्रेडिट्स). हे क्रेडिट्स विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रकावर आणि ABC पोर्टलवर नोंदवले जातील.
- मल्टीपल एंट्री-एक्झिट : राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (NCrF) नुसार विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात लवचिकता मिळेल, ज्यामुळे ते आपल्या गरजेनुसार शिक्षण पूर्ण करू शकतील.

**4. आर्थिक स्थैर्य आणि प्रोत्साहन:**

विद्यावेतन (Stipend) मॉडेल : विद्यार्थ्यांना प्रशिक्षणादरम्यान आर्थिक आधार मिळावा यासाठी NATS पोर्टल किंवा थेट उद्योगांमार्फत विद्यावेतन देण्याची व्यवस्था अधिक बळकट केली जाईल.

शासकीय पाठबळ : शासन वेळोवेळी परिपत्रकाद्वारे नवीन मार्गदर्शक सूचना जारी करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करेल.

**5. देखरेख आणि मागोवा (Tracking) :**

पोस्ट ट्रेनिंग ट्रॅकिंग : अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी कोणत्या क्षेत्रात रोजगार मिळवत आहेत, याचा किमान एक वर्ष मागोवा घेतला जाईल. या माहितीचा उपयोग भविष्यात AEDP च्या अधिक विकासासाठी केला जाईल.

## सद्यस्थिती आढावा :

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी महाराष्ट्र राज्यातील १४ विद्यापीठांमधून ३५४५ विद्यार्थ्यांनी AEDP साठी प्रवेश घेतलेला आहे. त्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांची अधिक पसंती व प्रवेश आहेत. AEDP मध्ये अनेक नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांना सुरुवात झालेली आहे. (उदा. BSc AI & ML, BSc Data Science, BSc Artificial Intelligence and Machine Learning) या सर्व अभ्यासक्रमांसाठी अनेक उद्योग व औद्योगिक संघटनांसोबत सहकार्य करार केले आहेत व पुढील काळात यात अधिक भर देण्यात येणार आहे.




# अध्यापकांच्या विकासासाठी झटणारी संस्था : (MSFDA)

भारतीय ज्ञान प्रणालीचा विचार असलेला नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सक्षम आणि प्रशिक्षित अध्यापक वर्ग आवश्यक आहे, हे लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची राज्यात स्थापना केली गेली. अध्यापकांच्या विकासाचा विचार करून त्यावर कार्यवाही करणारी देशातील ही पहिलीच संस्था. शिक्षणासह सामाजिक प्रश्नावर पण ती काम करते आहे, हे तिचे महत्त्वाचे वेगळेपण आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताने शिक्षण क्षेत्रात अनेक बदल केले; पण २०२० साली आलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) हे बदलाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे आहे. तब्बल ३४ वर्षांनंतर देशाने शिक्षणाचे नवे धोरण आणले. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांची ओळख व्हावी आणि परीक्षेत चांगले गुण मिळवण्याच्या बरोबर सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट असावे असा आग्रह या धोरणात धरण्यात आला आहे. NEP २०२० हे भारतीय शिक्षणाला जगाच्या पातळीवर नेण्याचे स्वप्न पाहते. त्यासाठी या धोरणात प्राध्यापक गुणवत्तेचा विचार मांडण्यात आला आहे. अभ्यासक्रम किंवा शिक्षण कितीही चांगले आखले तरी ते वर्गात पोहोचवणारा शिक्षक जर तयार नसेल, तर तो अभ्यास कागदावरच राहतो. नवीन अभ्यासक्रम, त्यात ज्या भारतीय ज्ञान प्रणालीचा विचार आहे, ती प्रणाली विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी एक सक्षम आणि प्रशिक्षित अध्यापक वर्ग आवश्यक आहे.

ही गरज ओळखून महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने Companies Act २०१३ च्या कलम ८ अंतर्गत पुणे येथे महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA) स्थापन केली आहे. फक्त अध्यापकांच्या विकासाचा विचार आणि त्यावर काम करणारी देशातील ही पहिलीच

राज्यस्तरीय संस्था आहे. NEP २०२० ची महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी करणारे MSFDA हे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्र शासनाची इच्छाशक्ती आणि NEP २०२० ची दिशा — या दोन्हींमधून MSFDA जन्माला आली आहे.

महाराष्ट्राचे मुख्य सचिव संस्थेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष असून मंडळात उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षण विभागाचे सचिव, नामवंत शिक्षणतज्ज्ञ, विद्यापीठांचे कुलगुरू, उच्च शिक्षण संचालक आणि तंत्रशिक्षण संचालक यांचाही समावेश आहे. डॉ. शैलेंद्र देवळाणकर हे संस्थेचे कार्यकारी संचालक आहेत.

संस्थेची व्याप्ती राज्यातील २,००० महाविद्यालयांपर्यंत पोहोचली असून राज्यातील १८,५६० अध्यापकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण ५८ वेगवेगळे प्रशिक्षण कार्यक्रम संस्थेने यशस्वीपणे राबवले आहेत. त्यात अध्यापनशास्त्र, नेतृत्व, तंत्रज्ञान, मानसिक आरोग्य आणि मूल्यमापन अशा विविध विषयांचा समावेश आहे.

संस्था सुरू झाल्यावर MSFDA च्या टीमने राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आणि अध्यापकांच्या प्रशिक्षणाच्या गरजा जाणून घेतल्या. नक्की कशा प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज आहे हे समजून आणि सहा केंद्रांची स्थापना झाली. बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम व अध्यापनशास्त्र केंद्र (Centre for Multidisciplinary Curriculum & Pedagogy), नेतृत्व विकास केंद्र (Centre for Leadership Development), सर्वसमावेशकता व विविधता केंद्र (Centre for Inclusion & Diversity), नवनिर्मिती व अत्याधुनिक तंत्रज्ञान केंद्र (Centre for Innovation & Cutting-Edge Technology), मूल्यमापन व परीक्षण केंद्र (Centre for Evaluation & Assessment) आणि संसाधन केंद्र (Centre for Resources).

Centre for Multidisciplinary Curriculum & Pedagogy - हे केंद्र भिन्न विषयांना एकमेकांशी जोडणाऱ्या शिकवण्याच्या पद्धती शिक्षकांपर्यंत पोहोचवते. 'भारतीय ज्ञान प्रणाली', 'विद्यार्थीकेंद्रित शिक्षण', 'सर्वांगीण अभ्यासक्रम' इ. प्रशिक्षण या केंद्राच्या माध्यमातून होतात.

Centre for Innovation & Cutting-Edge Technology - हे केंद्र महाविद्यालये आणि समाज यांना जोडण्याचे काम करते. AI, MOOCs, ई-कन्टेंट तयार करणे, स्टार्ट-अप सुरू करण्याचे प्रशिक्षण, बौद्धिक संपदा हक्क अशा आजच्या काळाशी सुसंगत विषयांवर शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते.

Centre for Inclusion & Diversity — कोणत्याही जाती, धर्म, लिंग किंवा पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्याला महाविद्यालयात सुरक्षित आणि आदराचे वातावरण मिळाले पाहिजे, यासाठी हे केंद्र काम करते. 'लिंग संवेदनशीलता', 'सामाजिक न्याय आणि शिक्षण', 'Edu Mind Care' असे कार्यक्रम येथून राबवले जातात.

Centre for Leadership Development - प्राचार्य, संचालक, अधिष्ठाता आणि जबाबदारीच्या पदावर असलेल्या व्यक्तींसाठी हे केंद्र प्रशिक्षण आयोजित करते. 'शैक्षणिक नेतृत्व कार्यक्रम (ALP)', 'Edu-Leader २०३०' आणि नारीदृष्टी (महिला नेतृत्व) असे कार्यक्रम या केंद्रातर्फे होत असतात. नेतृत्व विकासाचे प्रत्यक्ष अनुभव घेता यावेत यासाठी काही कार्यक्रम





बाहेर खुल्या वातावरणात घेतले जातात.

Centre for Evaluation & Assessment – हे केंद्र परीक्षा आणि गुण यांच्यापलीकडे विचार करते. परीक्षा म्हणजे शिक्षणाची आणखी एक संधी आहे, दडपण घेण्याचे अथवा देण्याचे निमित्त नाही, हा संदेश देण्यासाठी हे केंद्र काम करते. CO-PO एकात्मीकरण, AI चा मूल्यमापनात वापर असे विविध कार्यक्रम २०२६ सालात या केंद्रातर्फे आयोजित केले जाणार आहेत. संसाधन केंद्र हे संस्थेचे माहितीचे केंद्र आहे.

MSFDA दोन महत्त्वाच्या गोष्टींवर काम करीत आहे. त्यातील एक, अध्ययन व्यवस्थापन प्रणाली (LMS). प्रशिक्षणासाठी पुण्याला येणे प्रत्येकाला शक्य होत नाही हे लक्षात घेऊन MSFDA एक ऑनलाइन व्यासपीठ तयार करीत आहे. इथे राज्यातील कुठल्याही कोपऱ्यातील शिक्षक घरबसल्या प्रशिक्षण घेऊ शकेल. ऑनलाइन नोंदणी, व्हिडिओ व्याख्याने, डिजिटल साहित्य आणि प्रशिक्षणाचे श्रेयांक — हे सगळे LMS मुळे शक्य होईल. गडचिरोली ते सिंधुदुर्ग आणि नंदुरबार ते नागपूर, पूर्ण राज्यात प्रत्येक अध्यापकापर्यंत यामुळे MSFDA पोहोचेल. दुसरी म्हणजे UG ४.० — चार वर्षांच्या नव्या पदवी अभ्यासक्रमासाठी तयारी. NEP २०२० मुळे आता पदवी अभ्यासक्रम तीन वर्षांऐवजी चार वर्षांचा होत आहे. यात विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयांचे संयोजन निवडता येईल तसेच विद्यार्थी भारतीय ज्ञान प्रणालीशी जोडले जातील. हे बदल वर्गात राबवण्यासाठी आधी शिक्षकांची तयारी आवश्यक आहे. MSFDA UG ४.० च्या माध्यमातून हे काम करणार आहे. यात नव्या अभ्यासक्रमाची ओळख, बहुशाखीय शिकवण्याचा सराव, IKS एकात्मीकरण आणि नव्या मूल्यमापन पद्धती यावर विशेष प्रशिक्षण देण्यात येईल.

MSFDA केवळ शिक्षणापुरते मर्यादित नाही. समाजाच्या इतर महत्त्वाच्या प्रश्नांवरही ती काम करते आहे. 'मानससूत्र' हा तीन दिवसांचा विशेष कार्यक्रम श्री. चंद्रकांतदादा पाटील मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभहस्ते उद्घाटन होऊन सुरू झाला. आज अनेक विद्यार्थी परीक्षेचे दडपण, घरच्यांच्या अपेक्षा आणि समाजमाध्यमांच्या व्यसनाच्या (Addiction) दबावाखाली मनाने खचतात. असे विद्यार्थी वेळीच ओळखून त्यांना योग्य मदत करण्याबाबत धडे संस्थेतर्फे दिले जातात. विद्यार्थ्यांच्या मनातील ताण कसा ओळखावा, त्याच्याशी कसा संवाद साधावा हे मानससूत्र मधून सांगण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

रस्ता सुरक्षा प्रशिक्षण कार्यक्रम हा ही असाच एक महत्त्वाचा उपक्रम आहे. दर वर्षी राज्यात रस्ता अपघातांमध्ये हजारो व्यक्ती जीव गमावतात, या पार्श्वभूमीवर वाहन सुरक्षितपणे चालवणे, वाहतुकीचे नियम पाळणे, अपघात झाल्यास काय करावे या गोष्टी प्राध्यापकांना शिकवल्या जातात. वाहतूक साक्षर झालेले शिक्षक विद्यार्थ्यांमध्येही ही जाणीव निर्माण करू शकतात.

कोणताही बदल अभ्यासासाठी एकत्र येणाऱ्या वर्गातून सुरू होतो आणि हा वर्ग बदलण्याची ताकद फक्त एकाच माणसाकडे असते — शिक्षकाकडे. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने MSFDA मध्ये, म्हणजे माणसांमध्ये गुंतवणूक केली आहे. कारण 'शिक्षक बदलला तर वर्ग बदलतो, वर्ग बदलला तर विद्यार्थी आणि विद्यार्थी बदलला तर समाज बदलतो'. NEP २०२०चे स्वप्न महाराष्ट्रात प्रत्यक्षात आणण्यास हातभार लावणारे MSFDA हे महत्त्वाचे माध्यम आहे, हे ओळखून महाराष्ट्र शासन या संस्थेच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.



# शिक्षणातून महिला सक्षमीकरण : लाभार्थी विद्यार्थिनींशी हितगुज

राज्य शासनाने मुलींसाठी राबविलेली ट्युशन व परीक्षाशुल्क माफी योजना ही खऱ्या अर्थाने महिलांच्या सक्षमीकरणाकडे टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. अनेकदा घरची आर्थिक परिस्थिती कठीण असल्याने हुशार व गुणी मुलींना उच्च शिक्षण घेता येत नाही. अशा वेळी संपूर्ण शुल्कमाफीमुळे त्यांच्यासाठी व्यावसायिक शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले आहेत. या योजनेमुळे पालकांनाही दिलासा मिळतो, कारण आपल्या मुलीला उच्च शिक्षण देण्यासाठी मोठ्या कर्जाचा किंवा आर्थिक ताणाचा भार उचलावा लागत नाही. ग्रामीण भागातील, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींनाही याचा विशेष फायदा होतो. महिला सक्षमीकरण, उच्च शिक्षणात समता आणि व्यावसायिक क्षेत्रात स्त्रियांचा वाढता सहभाग या व्यापक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ही योजना परिणामकारक ठरत आहे. शिक्षण हे केवळ करिअर घडविण्याचे साधन नाही, तर आत्मविश्वास, स्वावलंबन आणि समाजात आपले स्थान निर्माण करण्याची ताकद देणारे साधन आहे. ही योजना त्या दृष्टीने परिवर्तनाची नवी दिशा दाखवते. योजनेच्या माध्यमातून लाभ घेतलेल्या काही विद्यार्थिनींची मनोगतेच या उपक्रमाच्या यशाची खरी साक्ष आहेत.



**नाव :** ईश्वरी वाळू रायकर
**वर्ग :** प्रथम वर्ष - केमिकल इंजिनीअरींग
**पत्ता :** मु. पो. कावनई ता. इगतपुरी जि. नाशिक
**घरची माहिती :** घरातील एकूण व्यक्ती - ६ - आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ आणि मी स्वतः .
**वडिलांचा व्यवसाय :** सलून दुकान
**अंदाजे वार्षिक उत्पन्न :** रु. ५५,०००

महाराष्ट्र शासनाने मुलींसाठी जाहीर केलेली मोफत शिक्षण योजना ही माझ्यासाठी वरदान ठरली आहे. या योजनेमुळेच माझ्यासारख्या अत्यंत गरीब कुटुंबातल्या व दुर्गम भागात राहणाऱ्या मुलीला नाशिक येथे के. के. वाघ पॉलीटेक्निक सारख्या नावाजलेल्या संस्थेत प्रवेश घेणे शक्य झाले. ही योजना नसती तर मला दरवर्षी ओबीसी प्रवर्गासाठी लागणारी फी ही भरावी लागली असती. त्यामुळे मला पुढील शिक्षण घेणे शक्य झाले नसते. दहावी पर्यंत घोटी सारख्या छोट्या गावात शिक्षण घेऊन ९१. ८०% गुणांसह उत्तीर्ण झाले; परंतु केवळ पैशांअभावी मी पुढील शिक्षण घेऊ शकले नसते आणि माझे इंजिनीअरिंग होण्याचे स्वप्न कधीच पूर्ण झाले नसते. मुलींसाठी मोफत शिक्षण योजना नसती तर कदाचित मी पुढील शिक्षण न घेता खेड्यातच काबाड-कष्ट करत जीवन जगले असते व फार तर कशीबशी बारावी पर्यंत शिकले असते. ह्या योजनेमुळे मी केमिकल इंजिनीअरिंग सारख्या प्रतिष्ठित शाखेत प्रवेश घेऊन इंजिनीअर होणार आहे व पुढे हीच योजना अशीच चालू राहिली तर पुढचे शिक्षण घेईल आणि शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या सारख्या अनेक गरीब होतकरू मुलींना शिक्षणासाठी माझ्यापरीने होणारी सर्व मदत नक्की करेन.

शासनाच्या योजनेमुळे मला फायदा झाला तसेच महाराष्ट्रातील अनेक मुलींना या योजनेचा फायदा होईल, शासनाचे हे ऋण फेडण्यासाठी शासनाला हवी असणारी मदत करीन.

महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील यांचे मी व माझ्या सारख्या हजारो मुलींच्या वतीने आभार व्यक्त करते. सदर योजना मुलींसाठी अशीच सुरू राहील, अशी आशा व्यक्त करते.



**नाव :** कु. कशिश गोविंद चावला
**वर्ग :** प्रथम वर्ष - आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग इंजिनीअरींग
**पत्ता :** देवळाली कॅम्प, नाशिक
**घरची माहिती :** घरातील एकूण व्यक्ती - ७ - आई, वडील, आजी, आत्या, २ बहीण आणि मी स्वतः.
**वडिलांचा व्यवसाय :** कपड्याचे दुकान
**अंदाजे वार्षिक उत्पन्न :** रु. ५०,०००

सध्या मी के. के. वाघ तंत्रनिकेतन येथे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग इंजिनीअरींग या शाखेत प्रवेश घेतला आहे. अशा नामांकित संस्थेत प्रवेश मिळाला हे केवळ सरकारने मुलींसाठी राबविलेल्या मोफत शिक्षण योजनेमुळेच. उच्च शिक्षणाचा प्रवास दहावीनंतर सुरू होतो. त्यामुळे दहावीनंतर एका चांगल्या शिक्षण क्षेत्रात प्रवेश मिळावा हे प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वप्न असते आणि घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे आपले स्वप्न पूर्ण करणे प्रत्येकाला शक्य नसते. मला देखील दहावीला ९२. ६०% उत्तीर्ण असून ह्या योजनेमुळे पॉलीटेक्निकला प्रवेश घेऊ शकले. ह्या योजनेमुळे मी आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग इंजिनीअरींग सारख्या प्रतिष्ठित शाखेत प्रवेश घेऊन इंजिनीअर होणार आहे व पुढे हीच योजना अशीच चालू राहिली तर पुढचे शिक्षण घेईन.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी माझ्या सारख्या अनेक गरीब होतकरू मुलींना शिक्षणासाठी माझ्यापरीने होणारी सर्व मदत नक्की करेन.

शासनाच्या योजनेमुळे मला फायदा झाला तसेच महाराष्ट्रातील अनेक मुलींना या योजनेचा फायदा होत आहे आणि असाच होत राहील अशी मी अपेक्षा करते. शासनाचे ऋण फेडण्यासाठी शासनाला हवी असणारी मदत करीन. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील तसेच महाराष्ट्र राज्याचे तंत्रशिक्षण संचालक व तंत्रशिक्षण संचालनालयातील सर्व अधिकारी वर्ग यांचे मी व माझ्या सारख्या हजारो मुलींच्या वतीने आभार व्यक्त करते. सदर योजना मुलींसाठी अशीच सुरू राहील, अशी आशा व्यक्त करते.

# सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप : माझ्या उच्च शिक्षणाला लाभलेले बळ

**नाव :** राधिका अभय दैठणकर
**वर्ग :** विद्यार्थिनी
**महाविद्यालय :** डॉ. सौ इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर

शिक्षण हे व्यक्तीच्या आयुष्याला दिशा देणारे सर्वात प्रभावी साधन आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनात उच्च शिक्षण घेऊन स्वतःचे आणि समाजाचे भविष्य घडविण्याचे स्वप्न असते. मात्र अनेकदा आर्थिक अडचणी या स्वप्नांच्या आड़ येतात. अशा वेळी शासनाच्या शिष्यवृत्ती योजना विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरतात. माझ्यासाठी केंद्र सरकारची 'सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप' ही अशीच एक संधी ठरली, जिने माझ्या उच्च शिक्षणाच्या प्रवासाला नवे बळ आणि नवी दिशा दिली.

बारावीच्या परीक्षेत ८७% गुण मिळाल्यानंतर मला ही प्रतिष्ठित शिष्यवृत्ती प्राप्त झाली. हा क्षण माझ्यासाठी केवळ आंनदाचा नव्हता, तर माझ्या गुणवत्तेची आणि मेहनतीची दखल घेतल्याची अभिमानास्पद भावना देणारा होता. या शिष्यवृत्तीमुळे माझ्या शैक्षणिक वाटचालीतील अनेक आर्थिक अडथळे दूर झाले. शिक्षणाशी संबंधित विविध खर्चाची बिले कमी झाल्याने मला माझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करता आले.

सध्या मी डॉ. सौ. इंदिराबाई भास्कर पाठक महिला कला महाविद्यालय कला शाखेचे शिक्षण घेत आहे. उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांसमोर अनेक आर्थिक गरजा उभ्या राहतात अशा वेळी सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिपमुळे मिळालेले आर्थिक साहाय्य माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. या शिष्यवृत्तीने मला स्वावलंबीपणे शिक्षण घेण्याचा आत्मविश्वास दिला.

या शिष्यवृत्तीचे महत्त्व केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नाही. ती विद्यार्थ्याच्या मनात आत्मविश्वास निर्माण करते. शासनाने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी राबविलेली ही योजना अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्वप्नांना नवे पंख देत आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात उच्च शिक्षण ही काळाची गरज बनली आहे, अशा परिस्थितीत केंद्र सरकारचे सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिपसारख्या योजनांद्वारे विद्यार्थ्यांना दिलेले पाठबळ अत्यंत मोलाचे आहे. त्यामुळे देशातील अनेक तरुणांना आपली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली ताकद मिळत आहे.

माझ्या आयुष्यातही या शिष्यवृत्तीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तिने माझ्या स्वप्नांना आर्थिक आधार दिला, माझा आत्मविश्वास वाढविला आणि उच्च शिक्षणाच्या दिशेने अधिक निर्धाराने वाटचाल करण्याची प्रेरणा दिली भविष्यात समाजासाठी उपयुक्त कार्य करून या संधीचे चीज करण्याचा माझा प्रयत्न राहील.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, सेंट्रल सेक्टर स्कॉलरशिप ही केवळ शिष्यवृत्ती नसून विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शासनाने दिलेला विश्वासाचा हात आहे, या योजनेमुळे माझ्यासारख्या असंख्य विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी उभारी मिळत आहे आणि उच्च शिक्षणाची वाट अधिक प्रकाशमान होत आहे.

धन्यवाद

# ज्ञानवृक्षाच्या मुळाशी

भारतीय ज्ञानपद्धती ही केवळ भूतकाळाची कथा नाही, तर ती भविष्याचा नकाशा आहे. ऋषिमुनींच्या मनातून उमललेले सूत्रज्ञान, शास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नातून उभे राहिलेले विज्ञान आणि तत्त्वज्ञानातील विश्वदृष्टी या साऱ्याला आज 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' च्या माध्यमातून पुन्हा उजाळा दिला जात आहे. हा वारसा म्हणजे जी आपल्या तरुण पिढीला नवोन्मेष, चिंतन आणि प्रगतीची प्रेरणा देणारी विचारांची गंगा ठरणार आहे. या अंकातील 'भारतीय ज्ञानपद्धती' या विशेष विभागात आम्ही त्या गंगेचे काही थेंब वाचकांपर्यंत आणत आहोत.

भारतीयांसाठी वेद हे सर्वात प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. या प्राचीन ग्रंथाचा काळ साधारणपणे इसवीसनपूर्व दोन हजार किंवा सहा हजार वर्ष असा समजला जातो. जसाजसा काळ पुढे सरकत होता तशीतशी वैदिक भाषा हळूहळू बदलत गेली. महाभारताच्या काळापर्यंत वैदिक वाङ्मयातील भाषा कळायला अवघड झाली होती. वेदांमधील वेदग्रंथांची भाषा कळावी यासाठी काहीतरी करायची गरज होती. ती गरज ओळखून यास्काचार्यांनी निरुक्त हा भाषेच्या विकासातला एक महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला. निरुक्त म्हणजे भाषेविषयी संपूर्णपणे सांगणे, याचा अर्थ यास्काचार्यांना वेदग्रंथांच्या भाषेविषयी सर्वांगीण लेखन करायचे होते.



**डॉ. सुनीला गोंधळेकर**
प्राध्यापक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

# भारतीय भाषाविज्ञानाचे प्रवर्तक : यास्काचार्य

भाषाविज्ञान ही भाषेच्या अभ्यासाची शाखा आहे. या शाखेमध्ये भाषेचा उगम, स्वरूप, विकास इत्यादींचा वैज्ञानिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास केला जातो. भारतामध्ये भाषेसंबंधी सखोल चर्चा 'शिक्षा' नावाच्या वेदांगात केली गेली. ध्वनींचे उच्चार कसे होतात, एखाद्या भाषेतील ध्वनींचे घटक, स्थान आणि प्रयत्न कसे असतात, अशा मूलभूत गोष्टींचे सविस्तर वर्णन या ग्रंथांमध्ये उपलब्ध आहे. 'प्रतिशाख्य' आणि निरुक्त या ग्रंथांमधून व्युत्पत्ती, क्रियापदे, उपसर्ग इत्यादी विषयांचे शास्त्रीय विश्लेषण करणे असा भाषेचा शास्त्रीय अभ्यास या विद्वानांनी केला.

भारतीयांसाठी वेद हे सर्वात प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. या प्राचीन ग्रंथाचा काळ साधारणपणे इसवीसनपूर्व दोन हजार किंवा सहा हजार वर्ष असा समजला जातो. जसाजसा काळ पुढे सरकत होता तशीतशी वैदिक भाषा हळूहळू बदलत गेली. पुढे लौकिक संस्कृत भाषा वापरात आली. अनेक शतकांचा काळ गेल्यावर प्राचीन वेद ग्रंथांची भाषा समजायला त्रास होऊ लागला. वेद मंत्रांचा अर्थ कळेनासा झाला. त्यामुळे वेद म्हणजे रहस्यग्रंथ आहेत, त्यात काहीतरी गूढ आहे अशी कल्पना जोर धरू लागली. याच काळात वेदांगांनी वेदग्रंथ समजण्यासाठी विविध पैलूंवर लेखन करायला सुरूवात केली. यातील एक महत्त्वाचे ग्रंथकार म्हणजे यास्काचार्य. त्यांनी लिहिलेला ग्रंथ वेदांगांचा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे.

वैदिक पदांच्या किंवा शब्दांच्या निघंटु ह्या सर्वप्राचीन उपलब्ध शब्दकोशावर यास्काचार्यांनी भाष्य लिहिले. त्यांच्या ग्रंथाचे नाव निरुक्त. हे यास्काचार्य कोण होते, त्यांचा काळ काय होता याबद्दल खात्रीशीर माहिती मिळत नाही. अभ्यासकांमध्ये यास्काचार्यांच्या काळाविषयी मतभेद आहेत. अनेक विद्वान त्यांना पाणिनिपूर्वकालीन मानतात. पाणिनि ऋषिंचा काळ साधारणपणे इसवीसन पूर्व सातशे वर्ष असावा. तर काहींच्या मतानुसार यास्काचार्यांचा

काळ हा महाभारताच्या काळाच्या आसपासचा आहे. ते खरे असेल तर इसवीसनपूर्व चौथे शतक या दरम्यानचा काळ हा यास्काचार्यांचा काळ असेल. यास्काचार्यांनी स्वतःचा उल्लेख पारस्कर असा केला आहे. यास्क हे त्यांच्या वडिलांचे किंवा गुरूंचे नाव असावे. त्यांच्या परंपरेचा मान राखत त्यांनी स्वतःचा उल्लेख यास्क असा केला असण्याची शक्यता आहे.

महाभारताच्या काळापर्यंत वैदिक वाङ्मयातील भाषा कळायला अवघड झाली होती. वेदांमधील वेदग्रंथांची भाषा कळावी यासाठी काहीतरी करायची गरज होती. ती गरज ओळखून यास्काचार्यांनी लेखन केले. निरुक्त हा भाषेच्या विकासातला एक महत्त्वपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला. निरुक्त या शब्दाचा अर्थ होते भाषेविषयी संपूर्णपणे सांगणे म्हणजेच यास्काचार्यांना वेदग्रंथांच्या भाषेविषयी सर्वांगीण लेखन करायचे होते.

भाषेचे मुख्य घटक दोन- ध्वनिरूप शब्द आणि त्यांचे अर्थ. त्या अर्थांच्या आधारे शब्दांची व्युत्पत्ती यास्काचार्यांनी दिली आहे. आणि हे काम करतांना त्यांनी भाषाविज्ञानाचा पाया घातला आहे. हे त्यांनी अडीच ते तीन हजार वर्षांपूर्वी केले आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अतिशय शास्त्रीय पद्धतीने शब्द आणि अर्थ यांची सांगड त्यांनी घातली. आणि त्यांनी हे दाखवून दिले की, वैज्ञानिक दृष्टीने पाहिले तर वेदांमधील मंत्रांना अर्थ आहे. वेदमंत्र अर्थहीन नाहीत, ते केवळ गूढ मंत्र नाहीत हे त्यांनी सोदाहरण सांगितले. यास्काचार्यांनी लिहिलेल्या निरुक्तामुळे वेद वाङ्मयाचा अर्थ लावणे सुगम झाले. वेदवाङ्मयातील देवतांचे स्वरूप समजले. त्यामुळेच पुढे या प्राचीन काळाचा सामाजिक, राजकीय, मानववंशशास्त्रीय अशा वेगवेगळ्या अंगांनी अभ्यास करणे शक्य झाले.

यास्काचार्यांनी वैदिक मंत्रातील शब्दांचे अर्थ लिहिले. त्यासाठी प्रत्येक मंत्रामधील महत्त्वाचे, आवश्यक शब्द त्यांनी निवडले. वेदमंत्राचे प्रवक्ते वेगवेगळे ऋषि आहेत. हे ऋषि म्हणजे कोण होते, कसे होते याचे फार सुंदर वर्णन यास्काचार्यांनी केले आहे. ते ऋषि वैदिक मंत्रांचे द्रष्टे आहेत हा अर्थ ऋषि या शब्दातच असल्याचे त्यांनी भाषाशास्त्रीयदृष्ट्या दाखवून दिले. ऋषि या शब्दाची व्युत्पत्ती सांगताना ते लिहितात 'ऋषिर्दर्शनात्'. ऋषिंना मंत्रांचे दर्शन झाले असा त्याचा अर्थ होतो म्हणजेच वेदांची रचना ही मानवनिर्मित नाही ते द्रष्ट्या ऋषिंच्या प्रतिभेचा तो आविष्कार आहे.

भाषेची व्यवस्था कशी असते, याचे गमक सांगताना यास्काचार्य म्हणतात की, शब्द चार प्रकारचे असतात. नाम, आख्यात म्हणजे क्रियापद, उपसर्ग आणि निपात म्हणजे वाक्य जोडणारी अव्यये. या चार प्रकारच्या शब्दांमुळे कुठल्याही भाषेमध्ये अर्थपूर्ण वाक्यरचना करता येते.

यास्काचार्यांनी त्यांच्या आधी होऊन गेलेल्या अर्थविज्ञानाच्या औदुम्बरायण, औपमन्यव, शाकटायन, गार्ग्य, वार्ष्यायणि, आग्रहायण, और्णवाभ, शाकपूणि, तैटीकि, गालव अशा काही आचार्यांचा उल्लेख केला आहे. म्हणजेच भारतात अर्थविज्ञानाची परंपरा प्राचीन काळापासून होती, हे यातून लक्षात येते. तीच परंपरा यास्काचार्यांनी अधिक सक्षम केली.

निरुक्तामध्ये निर्वचनाचे पाच प्रकार सांगितले आहेत. पहिला वर्णागम. यामुळे शब्दाचा अर्थ निश्चित करत असताना गरजेप्रमाणे दुसऱ्या वर्णाचा आगम केला जातो. जसे--वार—द्वार. वर्णविपर्यय म्हणजे अक्षरे मागे किंवा पुढे करणे. जसे कसिता---सिकता. वर्णविकार म्हणजे मूळ अक्षरांच्या उच्चारणात बदल होणे. वर्णनाश म्हणजे मूळ अक्षराचा लोप होणे. उदा. राजन्---राजा. आणि शेवटचा प्रकार म्हणजे धातूचा अर्थ विस्तारित करणे. या पाच प्रकारांनी बहुतेक सर्व शब्दांच्या अर्थापर्यंत पोहोचता येते.

यावरून लक्षात येते की निरुक्त हा शब्दकोश नाही. निरुक्तं श्रोत्रमुच्यते म्हणजे ते व्युत्पत्तिशास्त्र आहे. निरुक्तातील नैगमकाण्ड या भागात पर्यायवाची शब्द, अनेकार्थक शब्द आणि ज्यांची व्युत्पत्ति माहीत नाही अशा शब्दांचे निर्वचन केले आहे. वेदांतील मंत्रांचे प्रकार, त्यांचे विषय आणि देवतांचे स्वरूप ह्यांची चर्चा त्यांनी सातव्या अध्यायाच्या आरंभी केली आहे. नंतर अग्नी, जातवेदस्

. शब्दांचे विवेचन करून दैवतकांडातील शब्दांवरील भाष्य बाराव्या अध्यायाच्या अखेरीस संपविले आहे. दैवतकाण्डामध्ये वेदग्रंथांमधील देवतांच्या नावांची व्युत्पत्ति व अर्थ सांगितले आहेत. उदा. देवता या शब्दाचे प्रदीप्त, दीप्तिमान किंवा द्युलोकवासी असे अर्थ यास्काचार्यांनी दिले आहेत. यातून त्यांचे तेजस्वी असणे अधोरेखित होते. अशाप्रकारे अर्थ देताना त्यामागे काही सिद्धांत आहेत.

यास्काचार्यांच्या सिद्धांतानुसार सगळी नामे कुठल्यातरी क्रियापदापासून उत्पन्न झालेली असतात. त्यामुळे यास्काचार्य अनेक नामांच्या अर्थाचा उलगडा धातूंपासून दाखवतात. उदा. पृथ्वी या नामाची व्युत्पत्ती प्रथनात् या धातूपासून आहे आणि त्यानुसार त्याचा अर्थ लांबवर पसरलेली असा या शब्दाचा अर्थ होतो. किंवा राज या शब्दाची व्युत्पत्ती राज् या धातूपासून आहे आणि त्याचा अर्थ शोभून दिसणारा असा होतो. तर पुत्र या शब्दाच्या तीन शक्यता दिल्या आहेत. त्रायते म्हणजे जो रक्षण करतो तो पुत्र, पित्याचे पिण्डदान करून पालन करतो तो पुत्र हे पृ धातूपासून, किंवा जो पुं म्हणजे नरक. त्यातून पित्याची सुटका करतो. अशा प्रकारच्या निर्वचनामुळे अनेकवेळा त्या काळातल्या कल्पना, रितिरिवाज समजायला मदत होते. आजही अशा प्रकारच्या व्युत्पत्ती मान्य केल्या जातात.

यास्काचार्यांची लेखनपद्धती पुढील पद्धतीने सांगता येईल. प्रथम निघंटूतील शब्दाची व्युत्पत्ती द्यायची. शब्दाचा अर्थ स्पष्ट नसेल तिथे तो सांगायचा आणि तो शब्द ज्या ऋचेत आला असेल, ती ऋचा उदाहरण म्हणून लगेच सांगायची. त्या ऋचेवर भाष्य करीत असताना निघंटूत नसलेल्या, परंतु त्या ऋचेत आलेल्या इतर शब्दांच्याही व्युत्पत्त्या यास्काचार्य देतात. इतकेच नव्हे, तर त्या शब्दांशी संबंधित असलेल्या इतर शब्दांच्या व्युत्पत्त्याही त्यांनी अनेकदा दिलेल्या आहेत. भाष्य करीत असताना त्यांच्या काळी प्रचारात नसलेल्या वैदिक शब्दांची रूपे यास्काचार्य सांगतात त्यामुळे वैदिक ऋचांची भाषा आणि यास्ककालीन भाषा ह्यांतील फरक लक्षात येतो.

निरुक्तात यास्काचार्यांनी व्युत्पत्तीची सूत्रे दिली असल्यामुळे आणि त्या सूत्रांनुसार अनेक शब्दांचा उलगडा करून दाखविला असल्यामुळे व्युत्पत्तिशास्त्राच्या इतिहासात निरुक्ताचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. यास्काचार्यांच्या निर्वचन पद्धतीचा मुख्य उद्देश शब्दाच्या अधिकाधिक अर्थापर्यंत पोहोचणे हा आहे. त्यात त्या शब्दांचे आदिम रूपही समजते. त्यादृष्टीने या महत्त्वाच्या ग्रंथाचे वि. का. राजवाडे यांनी मराठीत भाषांतर केले आहे.

# डायरेक्टर स्पीक्स!

"डायरेक्टर स्पीक्स" या विशेष सदरातून उच्च व तंत्र शिक्षण विभागातील चारही संचालनालये आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांचे संचालक त्यांच्या दृष्टिकोनातून विचार मांडणार आहेत. शिक्षणक्षेत्रातील धोरणे, नवनवीन उपक्रम, आव्हाने आणि भविष्यातील दिशा याबद्दल त्यांचे अनुभव व मते जाणून घेणे हे या सदराचे वैशिष्ट्य आहे. थेट संचालकांच्या संवादातून वाचकांना विभागाच्या कार्यपद्धतीची जवळून ओळख होणार असून, शिक्षण क्षेत्रातील बदलत्या क्षितिजांची झलकही यातून मिळणार आहे.





**प्रा. किशोर इंगळे,**
संचालक, कला, महाराष्ट्र राज्य

मुलाखत : **डॉ. मृदुला बेळे**

# कला माणसाला संवेदनशील बनवते

कला हा मानवी जीवनाचा आरसा आहे, हे नक्की; पण कला आता फक्त छंदापुरती उरलेली नाही. मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या गोष्टी निर्माण करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. या दृष्टीने तिच्याकडे बघणे ही आता काळाची गरज झाली आहे. या क्षेत्राच्या विकासासाठी विविध योजना राबवणारे कला संचालनालयाचे संचालक श्री किशोर इंगळे यांची मुलाखत.

## आपल्या शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रवासाबद्दल थोडक्यात सांगा. कला शिक्षण क्षेत्राकडे वळण्यामागची प्रेरणा काय होती?

● कला ही केवळ एक अभिव्यक्ती नाही, तो मानवी जीवनाचा आरसा आहे, अशा विश्वासाने माझा प्रवास सुरू झाला. कला क्षेत्रातील पदवी, पदव्युत्तर आणि त्यानंतरचे संशोधन (Ph.D.). या प्रवासाने मला कलेचे तांत्रिक आणि सैद्धांतिक पैलू शिकवले. कला महाविद्यालयात प्राध्यापक, सिनेट सदस्य आणि आता 'कला संचालक' म्हणून काम करताना मला या क्षेत्राचा शैक्षणिक आणि प्रशासकीय अशा दोन्ही बाजूंनी अनुभव घेता आला.

कला शिक्षण क्षेत्राकडे वळण्याची माझी प्रेरणा या मातीशी जोडलेली आहे. लहानपणापासूनच माझा चित्रकलेकडे ओढा होता. आमच्या गावात सण-उत्सवांमध्ये देवी-देवतांच्या मूर्ती घडवल्या जायच्या, तेव्हा मी त्या स्थानिक कलाकाराकडे कौतुकाने जायचो. मूर्ती घडताना आणि रंगताना बघताना माझी कलेची आवड वाढत गेली. त्या ओढीनेच आज मला या सर्वोच्च पदापर्यंतचा प्रवास घडवून आणला.

## कला शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात नेमकी कोणती भूमिका बजावली पाहिजे?

● कला शिक्षण म्हणजे केवळ 'चित्र काढणे' किंवा 'शिल्प बनवणे' एवढ्या तांत्रिक कौशल्यांपुरते मर्यादित नाही, ते माणसाला खऱ्या अर्थाने एक 'संवेदनशील माणूस' बनवते. आजच्या तांत्रिक युगात भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence) कमालीची महत्त्वाची ठरत आहे, अशावेळी कला माणसाला स्वतःशी आणि समाजाशी जोडण्याचे काम करते. कला शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संयम, एकाग्रता, सूक्ष्म निरीक्षण शक्ती आणि कोणत्याही समस्येकडे वेगळ्या तऱ्हेने पाहण्याची दृष्टी (Out-of-the-box thinking) विकसित होते. ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक संतुलित आणि परिपक्व बनवते.

## पूर्वीच्या तुलनेत आजच्या आधुनिक समाजात 'ललित कलां'कडे (Fine Arts) पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे?

● होय, समाजात आज नक्कीच एक सकारात्मक बदल पाहायला मिळत आहे. पूर्वी कलेकडे केवळ एक 'छंद' किंवा मुख्य शिक्षणाला पर्यायी करिअर म्हणून पाहिले जायचे. पण आज चित्र पूर्णपणे बदलले आहे. कॉर्पोरेट क्षेत्र, मनोरंजन सृष्टी, डिजिटल मीडिया आणि डिझाइन इंडस्ट्रीच्या विस्तारामुळे कला ही एक अत्यंत प्रतिष्ठित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करिअरची शाखा म्हणून पुढे आली आहे. आज पालकही आपल्या पाल्यांना त्यांच्या आवडीनुसार या क्षेत्रात येण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. आम्ही शासकीय पातळीवरूनही विविध उपक्रम आणि वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शनांच्या माध्यमातून हा दृष्टिकोन अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न करत आहोत.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) मुळे कला शिक्षणाच्या पारंपरिक चौकटी कशा मोडीत निघतील असे वाटते?

● NEP २०२० हे कला क्षेत्रासाठी एक सुवर्णसंधी घेऊन आले आहे. या धोरणाने पारंपरिक शिक्षणाच्या भिंती पाडल्या आहेत. आता विज्ञानाचा किंवा इतर शाखेचा विद्यार्थीही आपल्या आवडीनुसार 'फाईन आर्ट्स'मधील एखादा विषय 'मायनर विषय' (Minor Subject) म्हणून निवडू शकतो. या लवचिकतेमुळे कला शिक्षणाला मुख्य प्रवाहातील स्थान मिळाले आहे.

'मल्टी-डिसिप्लिनरी' (बहुशाखीय) दृष्टिकोनामुळे कलेचा थेट संबंध तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाशी जोडला गेला आहे. या धोरणाला गती देण्यासाठी 'महाराष्ट्र कला शिक्षण मंडळाच्या' माध्यमातून आम्ही अभ्यासक्रमात महत्त्वपूर्ण बदल केले असून, विद्यार्थ्यांना हे बहुशाखीय शिक्षण देण्यावर आमचा विशेष भर आहे. यामुळे विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या आणि संशोधनाच्या अभूतपूर्व संधी निर्माण होत आहेत.

## ग्रामीण/शहरी अशा भौगोलिक पार्श्वभूमीमुळे कला विद्यार्थ्यांमध्ये दुजाभाव होऊ नये यासाठी काय योजना आहेत?

● ही दरी, अंतर कमी करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागात गुणवत्तेची अजिबात कमतरता नाही, उणीव आहे ती केवळ योग्य संधी आणि संसाधनांची. ही दरी सांधण्यासाठी आम्ही विविध योजनांवर काम करत आहोत:

**डिजिटलायझेशन :-** ग्रामीण भागातील सर्व शासकीय व अनुदानित कला महाविद्यालयांना आधुनिक डिजिटल साधनांनी सज्ज करणे.

**फिरती कला प्रदर्शने व कार्यशाळा :-** नामवंत कलाकारांच्या कार्यशाळा आणि फिरती प्रदर्शने थेट ग्रामीण भागात आयोजित करणे, त्यामुळे तिथल्या विद्यार्थ्यांना थेट अनुभव मिळेल.

**स्कॉलरशिप आणि मार्गदर्शन :-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील नवनवीन प्रवाहांची (Trends) माहिती व्हावी, यासाठी विशेष सत्रांचे आयोजन करणे.

**स्थानिक पातळीवर रोजगार :-** स्थानिक प्रशासनासोबत (Local Administration) समन्वय साधून तिथल्या कला विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावरच रोजगाराच्या संधी व काम मिळवून देणे.

## आजच्या जागतिकीकरणाच्या युगात कला शाखेतील पदवीधरांसाठी 'उद्योग' आणि 'स्टार्ट-अप' क्षेत्रात काय वाव आहे?

● आज जागतिकीकरणामुळे कला क्षेत्राची व्याप्ती कमालीची वाढली आहे. पारंपरिक चित्रकला-शिल्पकलेच्या जोडीनेच उद्योजकतेच्या अनेक नव्या वाटा खुल्या झाल्या आहेत.

डिजिटल आर्ट आणि डिझाइन या क्षेत्रात UI/UX डिझाइन, गेम डिझाइन, २D/३D ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स (VFX) या क्षेत्रांत मोठी मागणी आहे, तर उद्योजक म्हणून तरुण कलाकार स्वतःचे डिझाइन स्टुडिओ, स्वतंत्र आर्ट गॅलरीज, फॅशन आणि टेक्सटाईल डिझाइन, हस्तकला



(Handicrafts) यात काम करू शकतात. तसेच प्रॉडक्ट डिझाइनमध्येही स्टार्ट-अप यशस्वीपणे सुरू करत आहेत. *सांस्कृतिक पर्यटन आणि संवर्धन याचा विचार केला तर संग्रहालये (Museums), ऐतिहासिक वास्तू, गडकिल्ल्यांचे पुनरुज्जीवन आणि 'आर्ट क्युरेशन' या क्षेत्रांत रोजगाराच्या उत्तम संधी निर्माण होत आहेत.

### कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल क्रांती हे कलाकारांसमोर आव्हान आहे की नवे साधन? याकडे आपण कसे पाहता?

● मी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) किंवा डिजिटल तंत्रज्ञानाकडे 'धोका' म्हणून पाहत नाही, तर ते कलेसाठी एक 'प्रभावी साधन' आहे असे मला वाटते. मानवी भावना, कल्पकता आणि आत्मिक अनुभूती यांची जागा AI कधीही घेऊ शकत नाही. मात्र, या तंत्रज्ञानाचा वापर करून कलाकार आपला वेळ वाचवू शकतात आणि त्यांचे प्रयोग अधिक वेगाने करू शकतात. म्हणूनच, आमच्या कला शिक्षणाच्या अभ्यासक्रमात आम्ही पारंपरिक हस्तकौशल्यांचे मूलभूत महत्त्व कायम ठेवून, डिजिटल आर्ट, AI टूल्सचा प्रभावी वापर आणि 'न्यू मीडिया आर्ट' यांचा अंतर्भाव करत आहोत.

### महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ तांत्रिक कौशल्यांऐवाजी सामाजिक भान आणि चिकित्सक विचार (Critical Thinking) कसा रुजवावा?

● महाविद्यालयांनी केवळ चार भिंतींच्या आतले पुस्तकी शिक्षण न देता 'प्रायोगिक शिक्षण' (Experiential Learning) देण्यावर भर दिला पाहिजे. विद्यार्थ्यांनी थेट समाजात जाऊन, तिथल्या सामाजिक समस्या समजून घेऊन त्यावर आधारित कलाकृती किंवा भित्तिचित्रे (Graffiti/ Murals) रेखाटली पाहिजेत, त्यामुळे कलेच्या माध्यमातून लोकजागृती होईल. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी महाविद्यालयांमध्ये नियमित 'ब्रेनस्टॉर्मिंग सेशन्स' आणि अभ्यासपूर्ण वादविवाद आयोजित केले जावेत. त्याखेरीज कला इतिहास आणि समकालीन सामाजिक घडामोडी यांचा मेळ अभ्यासक्रमात घातला पाहिजे, ज्यामुळे विद्यार्थ्यांची कला केवळ सौंदर्यात्मक न राहता वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ बनेल.

### आपल्या समृद्ध भारतीय ज्ञानपरंपरेचा आणि स्थानिक लोककलांचा (Folk Arts) आधुनिक कला अभ्यासक्रमात कसा मेळ घालता येईल?

● आपली भारतीय ज्ञानपरंपरा ही कला आणि संस्कृतीचा अथांग सागर आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर वारली चित्रकला, पैठणी विणकाम कला, प्राचीन मंदिर शिल्पकला आणि आपले ऐतिहासिक गडकिल्ले हा आपला फार मोठा वारसा आहे. हा वारसा पुढील पिढीकडे सोपवण्यासाठी आम्ही अभ्यासक्रमात आवश्यक बदल केले असून, या स्थानिक आणि पारंपरिक लोककलांचा थेट समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना या मूळ कलाप्रकारांचे सौंदर्य व तंत्र जतन करून, त्यात आधुनिकतेचा मेळ घालत 'फ्युजन आर्ट' (Fusion Art) तयार करण्यासाठी आम्ही प्रोत्साहित करत आहोत.

### कला आणि मराठी भाषा-साहित्य यांचा परस्परांवर काय प्रभाव पडतो? उच्च शिक्षण संस्थांनी या दोन्हीच्या संवर्धनासाठी काय करावे?

● कला आणि भाषा यांचा अत्यंत अतूट संबंध आहे, त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. उच्च शिक्षण संस्थांनी कला आणि साहित्याचा सुंदर समन्वय साधला पाहिजे. उदाहरणार्थ, मराठीतील अभिजात साहित्यावर (कादंबऱ्या, कथा, कविता) आधारित चित्रकला किंवा



नाट्य सादरीकरणे महाविद्यालयांमध्ये आवर्जून झाली पाहिजेत. याशिवाय, कला महाविद्यालयांतील संशोधनाचे प्रबंध आणि महत्त्वाचे संदर्भ ग्रंथ मराठी भाषेत उपलब्ध करून देण्यावर आमचा विशेष भर आहे. भाषा जितकी समृद्ध असेल, तितकीच कलाकाराची विचार प्रक्रिया अधिक प्रगल्भ होते.

### रिल्स आणि सोशल मीडियाच्या गराड्यात अडकलेल्या तरुण पिढीला आपल्या मूळ कला-सांस्कृतिक वारशाकडे कसे आकर्षित करता येईल?

● तरुण पिढीला आपल्याकडे वळवायचे असेल, तर आपल्याला त्यांच्याच भाषेत आणि त्यांच्याच माध्यमात जाऊन साद घालावी लागेल. आज अनेक तरुण कलाकार या सोशल मीडिया आणि 'रिल्स'चा अत्यंत सकारात्मक वापर करून आपली पारंपरिक कला जगभर पोहोचवत आहेत आणि त्यातून अतिशय चांगले अर्थार्जनही करत आहेत. हाच धागा पकडून आम्ही पुढील उपक्रम राबवत आहोत.

**आर्ट फेस्टिव्हल्स :-** राज्यभरात तरुणाईला आकर्षित करतील असे मोठे आणि आधुनिक कला उत्सव (Youth Art Festivals) आयोजित करणे.

डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर :- तरुण कलाकारांच्या कलाकृतींचे डिजिटल प्रदर्शन भरवणे आणि व्हिडिओंच्या माध्यमातून त्यांचा कलाप्रवास जगासमोर आणणे.

**बाल चित्रकला स्पर्धा :-** अगदी शालेय स्तरापासूनच (उदा. राज्यस्तरीय बाल चित्रकला स्पर्धा) मुलांमध्ये कलेची गोडी निर्माण करून त्यांना भविष्यातील सांस्कृतिक दूत म्हणून घडवणे.

### 'कला संचालक' या सर्वोच्च प्रशासकीय पदावर कार्य करताना आपल्यासमोरील सर्वात मुख्य प्रशासकीय प्राधान्यक्रमे (Priorities) कोणते?

● प्रशासकीय प्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळताना समोर आव्हाने नक्कीच आहेत; पण मी त्याकडे सुधारणेची मोठी संधी म्हणून पाहतो. माझी मुख्य प्रशासकीय प्राधान्यक्रमे खालीलप्रमाणे आहेत:

**पायाभूत सुविधा आणि आधुनिकीकरण :-** महाराष्ट्रातील ऐतिहासिक कला संस्थांचे मूळ वैभव व वारसा टिकवून ठेवतानाच, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाने (Smart Classrooms, Digital Labs) सज्ज करणे.

**ई-ऑफिस आणि गतिमानता :-** कार्यालयात अत्याधुनिक 'डिजिटल ॲप्स' आणि 'ई-ऑफिस' (e-Office) प्रणालीचा प्रभावी वापर करून प्रशासकीय कामांचा निपटारा अत्यंत वेगाने व पारदर्शकतेने करणे.

**योजनांची अंमलबजावणी :-** शासकीय धोरणे आणि कल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील आणि ग्रामीण भागातील शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचवणे.

### राज्यातील कला महाविद्यालयांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी आणि त्यांना 'ग्लोबल ब्रँड' बनवण्यासाठी कोणत्या धोरणात्मक सुधारणा आवश्यक वाटतात?

● राज्यातील कला महाविद्यालये जागतिक स्तरावर जावीत यासाठी आम्ही एका विशेष त्रिसूत्रीवर आणि नवीन शैक्षणिक धोरणावर काम करत आहोत.

१. अभ्यासक्रम नूतनीकरण (Curriculum Upgradation) :- जागतिक कला जगताच्या आणि बदलत्या उद्योग क्षेत्राच्या (Industry) गरजा ओळखून अभ्यासक्रमात सातत्याने कालसुसंगत बदल करणे.

२. शिक्षकांचे सक्षमीकरण (Faculty Development) :- आपल्या प्राध्यापकांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील नवीन तंत्रज्ञान, डिजिटल आर्ट आणि बदलत्या कला प्रवाहांचे उच्च दर्जाचे प्रशिक्षण देणे.

३. ऑन-फील्ड ट्रेनिंग आणि सामंजस्य करार (NEP On-Field Training & MoUs) :- नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळण्यासाठी 'ऑन-फील्ड ट्रेनिंग' (On-Field Training) अनिवार्य करणे. यासाठी देश-विदेशातील नामांकित कलावंत, डिझाइन कंपन्या आणि नामांकित स्टुडिओ यांच्यासोबत महाविद्यालयांचे सामंजस्य करार (MoUs) करून विद्यार्थ्यांना थेट 'इंटर्नशिप' उपलब्ध करून देणे.

# दीपस्तंभ

आजच्या बदलत्या काळात विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि समाजाला प्रेरणा देणाऱ्या व्यक्तिमत्वांच्या च्या अनुभवांतून शिकणे ही खरी संपत्ती आहे. म्हणूनच या त्रैमासिकात आम्ही एक विशेष सदर सुरू करत आहोत—'दीपस्तंभ'. या सदरात अशा व्यक्तींच्या मुलाखती सादर केल्या जातील ज्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अपूर्व कामगिरी केली आहे, नेतृत्वाची नवी परिभाषा निर्माण केली आहे आणि ज्यांचे आयुष्यच एक प्रेरणागाथा आहे. त्यांच्या विचारांमधून आणि जीवनप्रवासातून वाचकांना केवळ व्यावसायिकच नाही तर वैयक्तिक आयुष्याच्याही अनेक मौल्यवान शिकवणी मिळतील. हे सदर म्हणजे यश, संघर्ष, तत्त्वनिष्ठा आणि नेतृत्व यांचे मार्गदर्शन करत वाट दाखवणारा एक दीपस्तंभ ठरेल.






**डॉ. अभय जेरे,**
माजी उपाध्यक्ष,
अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद

मुलाखत : **डॉ. मृदुला बेळे**

# ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेला पर्याय नाही!

भारतामध्ये नवोपक्रम आणि उद्योजकतेची चळवळ गेल्या दशकात ज्या वेगाने वाढली आहे, त्यामागे काही दूरदृष्टी असलेल्या व्यक्तींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यापैकी एक अग्रगण्य नाव म्हणजे डॉ. अभय जेरे. फार्मसीची शैक्षणिक पार्श्वभूमी, एचआयव्ही संशोधनातील दीर्घ अनुभव, जपान आणि अमेरिकेतील संशोधन संस्थांमधील कार्यकाळ, पर्सिस्टंट सिस्टिम्समधील संशोधन व विकास नेतृत्व आणि त्यानंतर शिक्षण मंत्रालयातील मुख्य नवोपक्रम अधिकारी म्हणून केलेले कार्य. या सर्व अनुभवांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. स्मार्ट इंडिया हॅकथॉन, शिक्षण मंत्रालयाचा इनोव्हेशन सेल, राष्ट्रीय नवोपक्रम आणि स्टार्टअप धोरण, इनोव्हेशन ॲम्बेसेडर कार्यक्रम, शालेय स्तरावरील

डिझाइन थिंकिंग उपक्रम यांसारख्या अनेक परिवर्तनकारी उपक्रमांच्या निर्मितीमध्ये डॉ. जेरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये नवोपक्रम, उद्योजकता आणि समस्या-आधारित शिक्षणाची संस्कृती रुजविण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे.

'विकसित भारत २०४७' या संकल्पनेच्या केंद्रस्थानी नवोपक्रम, बौद्धिक संपदा आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था का असली पाहिजे, शिक्षण व्यवस्थेमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत, संशोधन आणि उद्योजकता यांचा परस्पर संबंध काय आहे आणि भारताच्या नवोपक्रम परिसंस्थेचे भविष्य कसे असेल, याविषयी डॉ. अभय जेरे यांच्याशी साधलेला हा सविस्तर संवाद.

### सर, सुरुवात आपण आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रवासापासून करूया. आपण पर्सिस्टंट सिस्टिम्समध्ये कार्यरत होता आणि त्यानंतर उद्योग क्षेत्रातून शिक्षण क्षेत्रातील नेतृत्वाच्या भूमिकेत आलात. हा प्रवास नेमका कसा घडला?

**डॉ. अभय जेरे :** माझी मूळ पार्श्वभूमी फार्मसीची आहे. मी डी.फार्म. पूर्ण केल्यानंतर एम.टेक. आणि त्यानंतर पीएचडी केली. एचआयव्ही व्हॅक्सिन्स आणि एचआयव्ही जेनेटिक्स या क्षेत्रात जवळपास बारा वर्षे संशोधन केले. या काळात मला जपानमध्ये दोन वर्षे आणि अमेरिकेतील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थमध्ये तीन वर्षे काम करण्याची संधी मिळाली.

अमेरिकेतून भारतात परतल्यानंतर मी २०१० मध्ये पर्सिस्टंट सिस्टिम्समध्ये संशोधन व विकास विभाग प्रमुख म्हणून रुजू झालो. आजही मी पर्सिस्टंटशी सबॅटिकलच्या स्वरूपात जोडलेलो आहे.

त्यानंतर २०१८ मध्ये शिक्षण मंत्रालय आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (All India Council for Technical Education - AICTE) येथे मुख्य नवोपक्रम अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पुढे मी AICTE च्या उपाध्यक्षपदाची जबाबदारीही सांभाळली. नुकतीच ती कार्यकाळाची मुदत पूर्ण झाली असून सध्या मी पुण्यात कार्यरत आहे.

### फार्मसीपासून एचआयव्ही संशोधन, त्यानंतर माहिती तंत्रज्ञान क्षेत्र आणि पुढे नवोपक्रम व्यवस्थापन - हा प्रवास खूपच वेगळा वाटतो. हे संक्रमण कसे घडले?

**डॉ. अभय जेरे :** खरे सांगायचे तर हा पूर्वनियोजित प्रवास नव्हता. फार्मसीच्या पार्श्वभूमीमुळे माझा प्रवास सिरम्स, लसी आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्राकडे वळला. एम.टेक. पूर्ण केल्यानंतर मी लसीविज्ञान आणि विशेषतः एचआयव्ही संशोधनाकडे आकर्षित झालो. त्यातूनच पीएचडी आणि अमेरिकेतील पोस्ट-डॉक्टरल संशोधनाचा मार्ग खुला झाला.

भारतात परतल्यानंतर योगायोगाने माझी भेट पर्सिस्टंट सिस्टिम्सचे संस्थापक डॉ. आनंद देशपांडे यांच्याशी विमानप्रवासादरम्यान झाली. आमच्यात दीर्घ चर्चा झाली. त्यावेळी माहिती तंत्रज्ञान आणि जीवनविज्ञान या दोन क्षेत्रांच्या संगमामध्ये प्रचंड संधी असल्याचे आम्हा दोघांनाही जाणवले.

जिनोमिक्स, प्रोटिओमिक्स, ट्रान्सक्रिप्टोमिक्स यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर माहिती निर्माण होत होती. त्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची आवश्यकता होती. त्यामुळे जैवतंत्रज्ञानातील संशोधक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ यांनी एकत्र काम करणे आवश्यक असल्याचे आम्हाला वाटले.

याच विचारातून पर्सिस्टंटमध्ये संशोधन आणि विकासासाठी स्वतंत्र उपक्रम सुरू करण्यात आला. पुढे तो 'पर्सिस्टंट लॅब्स' म्हणून विकसित झाला. आम्ही जैविक मोठ्या माहिती संचांचे विश्लेषण, तंत्रज्ञान व्यासपीठे आणि विविध संशोधन साधने विकसित करण्याचे काम सुरू केले.

### संशोधन आणि उद्योग क्षेत्रातील अनुभवातून आपण राष्ट्रीय नवोपक्रम चळवळीत कसे सहभागी झालात?

**डॉ. अभय जेरे :** २०१२-१३ च्या सुमारास भारतातील नवोपक्रम क्षेत्र आकार घेऊ लागले होते. पर्सिस्टंटमध्ये संशोधन व विकास विभागाचे नेतृत्व करत असताना मी विविध सामाजिकदृष्ट्या उपयुक्त तंत्रज्ञानांकडेही लक्ष देत होतो. एचआयव्ही संशोधनाच्या काळात मला समाजातील विविध स्तरांतील लोकांशी जवळून काम करण्याची संधी मिळाली होती. त्यामुळे तंत्रज्ञान केवळ अत्याधुनिक असणे पुरेसे नाही, तर ते समाजासाठी उपयुक्त असावे, ही जाणीव माझ्या मनात कायम होती.

याच काळात मी देशभरातील नवोपक्रमकर्ते शोधण्यास सुरुवात केली. नवे बौद्धिक संपदा हक्क निर्माण करणारे, समाजाभिमुख तंत्रज्ञान विकसित करणारे संशोधक आणि उद्योजक यांच्याशी संवाद साधू लागलो.

२०१३-१४ मध्ये सकाळ समूहाच्या सहकार्याने आम्ही भारतातील सर्वात मोठ्या नवोपक्रम प्रदर्शनांपैकी एक प्रदर्शन आयोजित केले. या प्रदर्शनाला सुमारे दीड लाख लोकांनी भेट दिली. प्रदर्शनस्थळाबाहेर अनेक किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या होत्या. तेव्हा मला जाणवले की, समाजात नव्या कल्पना, नव्या तंत्रज्ञानांविषयी प्रचंड उत्सुकता आणि भूक आहे.

याच अनुभवातून माझा नवोपक्रम परिसंस्थेकडे अधिक गंभीरपणे प्रवास सुरू झाला.

### स्मार्ट इंडिया हॅकथॉनची कल्पना कशी जन्माला आली?

**डॉ. अभय जेरे :** २०१४ नंतर स्मार्ट सिटी उपक्रमाची घोषणा झाली. त्या काळात मी पर्सिस्टंटमध्ये नवीन तंत्रज्ञानांवर काम करत होतो. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात हॅकथॉन ही संकल्पना आधीपासून अस्तित्वात होती; परंतु ती मुख्यतः संस्थांच्या अंतर्गत उपक्रमांपुरती मर्यादित होती.

मला वाटले की हीच संकल्पना नागरिकांच्या सहभागासाठी वापरता येईल. पुणे स्मार्ट सिटी प्रस्तावासाठी आम्ही 'डिजिटल पुणे हॅकथॉन' आयोजित केली. नागरिक, विद्यार्थी, उद्योग आणि प्रशासन यांना एकत्र आणून शहराच्या समस्यांवर उपाय शोधण्याचा तो प्रयत्न होता.

या उपक्रमाला मोठे यश मिळाले. त्यानंतर मी तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांच्यासमोर ही संकल्पना मांडली. त्यांना ती अत्यंत आवडली. त्यांनी ही कल्पना राष्ट्रीय स्तरावर नेण्याची सूचना केली आणि पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत ती पोहोचली. पंतप्रधानांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला.

अशा प्रकारे स्मार्ट इंडिया हॅकथॉनची सुरुवात झाली. आज ती जगातील सर्वात मोठ्या हॅकथॉनपैकी एक मानली जाते.

## स्मार्ट इंडिया हॅकथॉनमागील मूलभूत विचार काय होता?

**डॉ. अभय जेरे :** भारतात लाखो विद्यार्थी दरवर्षी प्रकल्प करतात. मात्र अनेकदा हे प्रकल्प केवळ शैक्षणिक औपचारिकता म्हणून केले जातात. दुसरीकडे सरकार, उद्योग आणि समाजासमोर हजारो व्यावहारिक समस्या असतात, ज्यांना नाविन्यपूर्ण उपायांची आवश्यकता असते.

आम्ही विचार केला की, या दोन गोष्टी एकत्र आणता येतील का?

त्यासाठी विविध मंत्रालये, सरकारी विभाग आणि सार्वजनिक संस्थांकडून प्रत्यक्ष समस्या मागविण्यात आल्या. त्यांना 'प्रॉब्लेम स्टेटमेंट्स' म्हणून संकलित केले गेले. नंतर देशभरातील विद्यार्थ्यांना या समस्यांवर उपाय शोधण्याचे आव्हान देण्यात आले.

एकीकडे लाखो तरुणांची बुद्धिमत्ता आणि ऊर्जा उपलब्ध होती, तर दुसरीकडे देशासमोरील वास्तविक आव्हाने होती. या दोघांना एकत्र आणण्याचा प्रयत्न म्हणजे स्मार्ट इंडिया हॅकथॉन.

सुरुवातीची काही वर्षे मी पर्सिस्टंट आणि शिक्षण मंत्रालय या दोन्हींसोबत काम करत होतो; परंतु पुढे आम्हाला जाणवले की, केवळ हॅकथॉन आयोजित करून देशाची नवोपक्रम क्षमता विकसित होणार नाही. त्यासाठी व्यापक आणि सर्वसमावेशक नवोपक्रम परिसंस्था उभी करावी लागेल.

त्यावेळी शिक्षण मंत्रालयाचे सचिव श्री. आर. सुब्रह्मण्यम यांनी अधिक व्यापक हस्तक्षेपाची आवश्यकता अधोरेखित केली. त्यातूनच शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेलची स्थापना झाली आणि मला मुख्य नवोपक्रम अधिकारी म्हणून त्याचे नेतृत्व करण्याची जबाबदारी देण्यात आली.

## त्या काळात भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये नवोपक्रमासमोरील सर्वात मोठे आव्हान कोणते होते?

**डॉ. अभय जेरे :** आपल्या शिक्षण व्यवस्थेचा मोठा भाग पाठांतरावर आधारित होता. विद्यार्थ्यांना माहिती आत्मसात करणे शिकवले जात होते; परंतु प्रश्न विचारणे, समस्या ओळखणे आणि उपाय शोधणे यासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जात नव्हते.

अचानक पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षणाच्या टप्प्यावर विद्यार्थ्यांना 'नवोपक्रम करा' असे सांगितले जात होते. परंतु त्यासाठी लागणारी मानसिक तयारी, कौशल्ये आणि विचारपद्धती त्यांच्यात विकसित झालेली नव्हती.

माझ्या मते शिक्षण व्यवस्थेमध्ये चार अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी विकसित होणे आवश्यक आहे. मी त्यांना 'चार सी' असे संबोधतो.

पहिली म्हणजे चिकित्सक विचारशक्ती (Critical Thinking).

दुसरी म्हणजे सर्जनशील विचारशक्ती (Creative Thinking).

तिसरी म्हणजे सहकार्याची क्षमता (Collaboration).

आणि चौथी म्हणजे संवाद कौशल्य (Communication).

या चार गोष्टींची प्रभावी जोपासना झाली, तर आपण समस्या सोडवणारी पिढी घडवू शकतो.

लोकप्रिय उदाहरण द्यायचे झाले तर 'थ्री इडियट्स' चित्रपटातील रँचोसारखे विद्यार्थी आपल्याला घडवायचे आहेत. केवळ गुण मिळवणारे नव्हे, तर प्रश्न विचारणारे, शोध घेणारे आणि नवे उपाय निर्माण करणारे विद्यार्थी घडवणे ही आजची गरज आहे.

## पण सर, जर विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमशीलता विकसित करायची असेल, तर त्याची सुरुवात उच्च शिक्षणापासून न होता शालेय शिक्षणापासून व्हायला हवी असे वाटत नाही का? जपानमध्ये राहण्याचा मला अनुभव आहे. तिथे लहानपणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये स्वतंत्र विचार, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सर्जनशीलता विकसित केली जाते.

**डॉ. अभय जेरे :** अगदी बरोबर. तुम्ही अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. सुरुवातीला आम्ही उच्च शिक्षण क्षेत्रातून काम सुरू केले; परंतु त्याच काळात केंद्र सरकारने अटल इनोव्हेशन मिशनची स्थापना केली होती. अटल इनोव्हेशन मिशन मुख्यतः शालेय शिक्षणावर लक्ष केंद्रित करून कार्य करत होते.

त्यावेळी अशी विभागणी झाली की, अटल इनोव्हेशन मिशन शाळांमध्ये काम करेल आणि आम्ही उच्च शिक्षण क्षेत्रात नवोपक्रम परिसंस्था विकसित करण्याचे काम करू. त्यातून देशभरात अटल टिंकरिंग लॅब्स स्थापन करण्यात आल्या.

मात्र काही वर्षांनंतर असे दिसून आले की, प्रयोगशाळा उभ्या राहत आहेत; परंतु त्यांचा अपेक्षित परिणाम होत नाही. सुविधा उपलब्ध असणे आणि त्यांचा प्रभावी वापर होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे आम्ही शालेय शिक्षणातही अधिक सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली.

मृदुला बेळे : त्यासाठी तुम्ही कोणती कार्यपद्धती अवलंबली?

डॉ. अभय जेरे : आम्ही शाळा आणि महाविद्यालये या दोन्ही स्तरांवर चार प्रमुख स्तंभांवर आधारित काम सुरू केले.

पहिला स्तंभ म्हणजे धोरणात्मक बदल (Policy Pillar).

नवोपक्रमाला चालना द्यायची असेल तर योग्य धोरणे आवश्यक असतात. शिक्षक, विद्यार्थी आणि संस्थांना नवोपक्रम आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणाऱ्या यंत्रणा नसतील, तर बहुतांश लोक दैनंदिन कामकाजाच्या चौकटीतच अडकून राहतात.

म्हणूनच नवोपक्रमाला प्रोत्साहन देणारी धोरणे, पुरस्कार, प्रोत्साहनपर योजना आणि संस्थात्मक यंत्रणा विकसित करणे आवश्यक होते.

दुसरा स्तंभ म्हणजे हँडहोल्डिंग किंवा सातत्यपूर्ण मार्गदर्शन.

अनेक संस्था आणि विद्यार्थी काहीतरी नवीन करण्यास उत्सुक असतात; पण सुरुवात कुठून करायची, पुढील पायऱ्या कोणत्या असतील, कोणती साधने वापरायची, कोणाशी संपर्क साधायचा याबाबत त्यांना मार्गदर्शनाची गरज असते.

त्यासाठी आम्ही नियमित मार्गदर्शन कार्यक्रम, मासिक संवाद, प्रशिक्षण सत्रे आणि तज्ज्ञांचे साहाय्य उपलब्ध करून दिले.

तिसरा स्तंभ म्हणजे नवोपक्रमाभिमुख शैक्षणिक कार्यक्रम.

आम्ही अनेक नवीन अभ्यासक्रम, प्रमाणपत्र कार्यक्रम, बूटकॅम्प्स आणि उद्योजकता कार्यक्रम विकसित केले. त्यामध्ये 'एमबीए इन इनोव्हेशन, आंत्रप्रेन्युअरशिप अँड व्हेंचर डेव्हलपमेंट' यांसारखे विशेष अभ्यासक्रमही समाविष्ट होते.

विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान न देता त्यांना नवोपक्रमकर्ता आणि उद्योजक म्हणून विकसित करणे हा या कार्यक्रमांचा उद्देश होता.

चौथा स्तंभ म्हणजे राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठे (Platforms).

स्मार्ट इंडिया हॅकथॉन, विविध नवोपक्रम स्पर्धा, चॅलेंजेस आणि प्रदर्शनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांची क्षमता प्रदर्शित करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

या चार स्तंभांच्या आधारे आम्ही शाळा आणि महाविद्यालये दोन्ही स्तरांवर नवोपक्रम संस्कृती विकसित करण्याचा प्रयत्न केला.

### शालेय शिक्षणामध्ये डिझाइन थिंकिंगच्या समावेशाबद्दलही आपण काम केले आहे, नाही का?

**डॉ. अभय जेरे :** होय. मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, डिझाइन थिंकिंग शालेय स्तरावर समाविष्ट करणाऱ्या पहिल्या देशांपैकी भारत एक आहे.

सहावी ते बारावी या वर्गांसाठी डिझाइन थिंकिंगवरील अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आणि त्याची पुस्तके सीबीएसईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली.

आज देशातील हजारो शाळा हा विषय ऐच्छिक अभ्यासक्रम म्हणून शिकवत आहेत. लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे, कारण डिझाइन थिंकिंग विद्यार्थ्यांना समस्या समजून घेणे, सहानुभूतीपूर्वक विचार करणे, कल्पना विकसित करणे, प्रयोग करणे आणि उपाय शोधणे शिकवते. ही कौशल्ये भविष्यातील नवोपक्रमक घडवण्यासाठी अत्यावश्यक आहेत.

### म्हणजे आपण म्हणू शकतो की नवोपक्रम ही केवळ तंत्रज्ञानाची बाब नसून ती विचार करण्याची पद्धत आहे?

**डॉ. अभय जेरे :** अगदी बरोबर. नवोपक्रम हा एखाद्या तंत्रज्ञानाचा किंवा उत्पादनाचा विषय नाही. तो विचार करण्याची एक पद्धत आहे.

विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात असो— अभियांत्रिकी, फार्मसी, वैद्यकीय शिक्षण, व्यवस्थापन, कला किंवा सामाजिक विज्ञान—त्याला समस्या ओळखता आली पाहिजे, प्रश्न विचारता आले पाहिजेत, विविध दृष्टिकोन समजले पाहिजेत आणि नाविन्यपूर्ण उपाय शोधता आले पाहिजेत.

हे कौशल्य विकसित झाले तर नवोपक्रम आपोआप घडतो. म्हणूनच आम्ही शिक्षण व्यवस्थेमध्ये नवोपक्रमाला स्वतंत्र विषय म्हणून नव्हे, तर विचारसरणी म्हणून रुजवण्याचा प्रयत्न करत आहोत.

### आपण सातत्याने 'आयडिया टू प्रोटोटाइप' संस्कृतीचा पुरस्कार केला आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये हा बदल घडवून आणण्यासाठी नेमके काय करावे लागले?

डॉ. अभय जेरे : खरं तर या प्रश्नाचं उत्तर देताना मी अनेकदा एक वेगळाच प्रश्न विचारतो—'कल्पनांचा खून कोण करतो?'

थोडं कठोर वाटेल; पण अनेकदा मुलांच्या कल्पना घरात पालकांकडून आणि शाळा-महाविद्यालयांमध्ये शिक्षकांकडूनच नकळत दडपल्या जातात.

एखादं मूल एखादा वेगळा प्रश्न विचारतं, एखादी नवी कल्पना मांडतं, तर त्याला अनेकदा प्रोत्साहन मिळत नाही. उलट "हे सगळं ठीक आहे, पण तुला किती गुण मिळाले?" हा प्रश्न विचारला जातो. परिणामी मुलं हळूहळू चौकटीबाहेर विचार करणं कमी करतात.

जर नवोपक्रमाची संस्कृती निर्माण करायची असेल, तर विद्यार्थ्यांसोबतच शिक्षकांच्या मनोवृत्तीमध्येही बदल घडवून आणावा लागतो. त्यामुळे आम्ही दोन्ही स्तरांवर एकाच वेळी काम केले.

### शिक्षकांसाठी कोणते विशेष उपक्रम राबवले गेले?

डॉ. अभय जेरे : शिक्षकांसाठी आम्ही काही अत्यंत महत्त्वाचे हस्तक्षेप केले.

सर्वप्रथम, देशभरातील अभियांत्रिकी, व्यवस्थापन, तांत्रिक आणि इतर उच्च शिक्षण संस्थांमधील तीस हजारांहून अधिक प्राध्यापकांना आम्ही नवोपक्रम आणि उद्योजकता या विषयांमध्ये प्रशिक्षित केले.

या प्रशिक्षित प्राध्यापकांना आम्ही 'इनोव्हेशन ॲम्बेसेडर' ही भूमिका दिली.

प्रत्येक संस्थेत असा एक किंवा अधिक प्रशिक्षित प्राध्यापक असावा, ज्याच्याकडे विद्यार्थी आपल्या कल्पना घेऊन जाऊ शकतील, अशी आमची संकल्पना होती. विद्यार्थ्यांकडे एखादी चांगली कल्पना असेल, एखादे तंत्रज्ञान विकसित करायचे असेल किंवा स्टार्टअप सुरू करण्याची इच्छा असेल, तर त्यांना संस्थेमध्येच मार्गदर्शन मिळावे हा त्यामागचा उद्देश होता.

### या इनोव्हेशन ॲम्बेसेडर्सना नेमके कशाप्रकारचे प्रशिक्षण दिले जात होते?

**डॉ. अभय जेरे :** हे प्रशिक्षण अतिशय व्यापक स्वरूपाचे होते.

पहिला घटक होता डिझाइन थिंकिंग.

दुसरा घटक होता कल्पनेचे मार्गदर्शन आणि संवर्धन. एखादी कल्पना कोणत्या टप्प्यावर आहे, तिची परिपक्वता किती आहे, ती तंत्रज्ञान सिद्धतेच्या (Technology Readiness Level - TRL) कोणत्या स्तरावर आहे, पुढील पायऱ्या कोणत्या असतील, याचे मूल्यमापन करण्याचे प्रशिक्षण दिले गेले.

तिसरा घटक होता प्री-इन्क्युबेशन, इन्क्युबेशन आणि ॲक्सेलरेशन या संपूर्ण नवोपक्रम प्रवासाची समज.

केवळ संज्ञा माहित असणे पुरेसे नाही, प्रत्येक टप्प्यावर नेमके काय करावे लागते, कोणती मदत उपलब्ध असते आणि ती कुठून मिळू शकते, याची स्पष्ट समज शिक्षकांना असणे आवश्यक आहे.

याशिवाय, एखाद्या समस्येवर स्वतःकडे उत्तर नसेल, तर योग्य तज्ज्ञ किंवा संस्थेकडे विद्यार्थ्यांना कसे मार्गदर्शन करायचे, हेही त्यांना शिकवले गेले.

### धोरणात्मक स्तरावरही काही बदल करण्यात आले का?

**डॉ. अभय जेरे :** निश्चितच.

आमच्या लक्षात आले की, नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी केवळ प्रशिक्षण पुरेसे नाही. संस्थात्मक धोरणेही तितकीच महत्त्वाची असतात.

म्हणून आम्ही विद्यार्थी आणि प्राध्यापकांसाठी राष्ट्रीय नवोपक्रम आणि स्टार्टअप धोरण तयार केले. अनेक विद्यापीठांनी आणि संस्थांनी त्याचा स्वीकार करून ते आपल्या संस्थात्मक धोरणाचा भाग बनवले.

या धोरणामुळे नवोपक्रम, बौद्धिक संपदा निर्मिती, स्टार्टअप्स आणि उद्योजकतेला संस्थात्मक मान्यता मिळाली. विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक यंत्रणा निर्माण होऊ लागल्या.

अनेकदा लोकांमध्ये क्षमता असते, इच्छाही असते; परंतु योग्य प्रोत्साहन आणि संस्थात्मक पाठबळ नसल्यामुळे ते पुढे येत नाहीत. धोरणात्मक बदलांमुळे ही परिस्थिती बदलण्यास मदत झाली.



### संस्थांमध्ये नवोपक्रम संस्कृती रुजवण्यासाठी आणखी काय केले गेले?

**डॉ. अभय जेरे :** आम्ही देशभरात मोठ्या प्रमाणावर नवोपक्रम, डिझाइन आणि उद्योजकता विषयक बूटकॅम्प्स आयोजित केले.

या बूटकॅम्प्समध्ये प्राध्यापक, विद्यार्थी आणि संस्थांचे नेतृत्व सहभागी होत असे. नवोपक्रम म्हणजे केवळ कल्पना मांडणे नाही, तर त्या कल्पनांना मूल्यनिर्मितीपर्यंत नेणे, हा संदेश आम्ही सातत्याने दिला.

यासोबतच संस्थांच्या व्यवस्थापनालाही संवेदनशील करण्याचे काम केले. कारण संस्थेच्या नेतृत्वाचा पाठिंबा नसल्यास नवोपक्रम संस्कृती टिकून राहत नाही.

स्मार्ट इंडिया हॅकथॉनसारख्या राष्ट्रीय उपक्रमांमुळे या संकल्पनांना व्यापक प्रसिद्धी मिळाली. पंतप्रधान स्वतः या उपक्रमांमध्ये सहभागी होत असल्यामुळे नवोपक्रम हा राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला.

त्याचा परिणाम असा झाला की, संस्थांच्या सर्वोच्च नेतृत्वापासून ते विद्यार्थ्यांपर्यंत सर्व स्तरांवर नवोपक्रमाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

### म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये एकाच वेळी बदल घडवून आणण्याचा प्रयत्न झाला?

**डॉ. अभय जेरे :** अगदी तसेच.

विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे आवश्यक आहे; पण त्याचबरोबर त्यांना योग्य मार्गदर्शन देणारे शिक्षकही आवश्यक आहेत.

विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी प्रकल्प करावेत एवढेच उद्दिष्ट नसावे. त्यांनी अशा कल्पनांवर काम करावे ज्या पुढे उत्पादन, तंत्रज्ञान, स्टार्टअप किंवा सामाजिक परिणाम घडवणाऱ्या उपायांमध्ये रूपांतरित होऊ शकतील.

ही मानसिकता विकसित झाली, तर नवोपक्रम संस्कृती आपोआप निर्माण होते.

आमचा प्रयत्न नेमका हाच होता—कल्पनेपासून प्रोटोटाइपपर्यंत आणि प्रोटोटाइपपासून प्रभावी उपायांपर्यंत विद्यार्थ्यांना आणि संस्थांना प्रवास घडवून आणणे.

### सर, विद्यार्थ्यांना केवळ प्रकल्पांपुरते मर्यादित न ठेवता त्यांना नवोपक्रम आणि उद्योजकतेकडे वळवण्याबाबत आपण सातत्याने बोलत आला आहात. विशेषतः संशोधन आणि पीएचडीच्या संदर्भात आपला दृष्टिकोन काय आहे?

**डॉ. अभय जेरे :** माझ्या स्वतःच्या अनुभवातून बोलायचे झाले तर, उद्योजक होण्यासाठी किंवा नवोपक्रमक बनण्यासाठी पीएचडीसारखे उत्कृष्ट प्रशिक्षण दुसरे नाही.

जेव्हा तुम्ही पीएचडी करता, तेव्हा तुम्ही प्रत्यक्षात समस्या सोडवण्याचे प्रशिक्षण घेत असता. एखाद्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर वर्षानुवर्षे काम करणे, अपयश स्वीकारणे, दिशा बदलणे, नव्याने विचार करणे, पुरावे गोळा करणे आणि शेवटी उत्तर शोधणे—हा संपूर्ण प्रवास उद्योजकतेसाठी आवश्यक

असलेल्या मानसिकतेशी अत्यंत जवळचा आहे.

स्टार्टअप उभारतानाही नेमकी हीच कौशल्ये लागतात. समस्या समजून घेणे, उपाय शोधणे, सतत सुधारणा करणे, गरज पडल्यास दिशा बदलणे आणि चिकाटीने पुढे जाणे—हे सर्व संशोधनातूनच शिकायला मिळते.

### पण आजही पीएचडीचे मूल्यमापन प्रामुख्याने संशोधन लेखांच्या आधारे होते. यात काही बदल होण्याची गरज आहे असे वाटते का?

**डॉ. अभय जेरे :** मला वाटते की, आता आपण त्या दिशेने विचार करण्यास सुरुवात केली आहे.

उदाहरणार्थ, चीनमध्ये काही क्षेत्रांमध्ये पारंपरिक प्रबंधाऐवजी उत्पादन किंवा तंत्रज्ञानाधारित परिणाम स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. अर्थात, प्रत्येक क्षेत्रासाठी एकच निकष लागू होऊ शकत नाही.

माझ्या मते, संशोधकांना विविध पर्याय उपलब्ध असावेत.

एखादा संशोधक उत्कृष्ट संशोधन लेख प्रकाशित करू शकतो.

दुसरा संशोधक पेटंट्स निर्माण करू शकतो.

तर तिसरा संशोधक एखादे नाविन्यपूर्ण उत्पादन विकसित करू शकतो.

या सर्व गोष्टी ज्ञाननिर्मितीच्या आणि नवोपक्रमाच्या वैध अभिव्यक्ती आहेत.

म्हणून भविष्यात पीएचडीचे मूल्यमापन अधिक लवचिक होईल, अशी अपेक्षा आहे. संशोधन लेख, पेटंट्स, तंत्रज्ञान हस्तांतरण किंवा उत्पादन विकास—या सर्व बाबींना समान महत्त्व दिले जाईल.

### म्हणजेच बौद्धिक संपदा निर्मिती आणि संशोधन यांच्यातील संबंध अधिक मजबूत होण्याची आवश्यकता आहे?

**डॉ. अभय जेरे :** नक्कीच.

आजही अनेक संशोधक उत्कृष्ट संशोधन करतात; परंतु त्यांचे बौद्धिक संपदेत किंवा उत्पादनात रूपांतर होत नाही. परिणामी समाजाला त्याचा अपेक्षित लाभ मिळत नाही.

नवोपक्रमाच्या दृष्टीने पाहिले तर नावीन्य तीन प्रकारे दिसून येऊ शकते—साहित्यामध्ये, प्रक्रियेमध्ये किंवा उपयोगामध्ये.

जर या तिन्हीपैकी कोणत्याही एका घटकामध्ये नवीनता असेल, तर त्यातून नवोपक्रम निर्माण होऊ शकतो.

म्हणून संशोधनाचा अंतिम उद्देश केवळ ज्ञाननिर्मिती नसून मूल्यनिर्मितीही असायला हवा. त्या मूल्यनिर्मितीमध्ये पेटंट्स, तंत्रज्ञान हस्तांतरण, स्टार्टअप्स आणि उत्पादने यांची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

### भारताच्या नवोपक्रम परिसंस्थेकडे आपण २०४७ च्या दृष्टीने कसे पाहता?

**डॉ. अभय जेरे :** मी अत्यंत आशावादी आहे. २०४७ पर्यंत भारत जगातील सर्वाधिक नवोपक्रमक्षम देशांपैकी पहिल्या पाच देशांमध्ये असेल, असा माझा ठाम विश्वास आहे.

सध्या आपण ज्या टप्प्यावर आहोत, तिथे कदाचित अजून मोठ्या प्रमाणावर जागतिक स्तरावरील परिवर्तनकारी उत्पादने दिसत नसतील. परंतु महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण त्या दिशेने प्रवास सुरू केला आहे.

देशभरातील महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था आणि स्टार्टअप परिसंस्था नवोपक्रमाच्या दिशेने सक्रियपणे काम करू लागल्या आहेत. ही सुरुवात अत्यंत महत्त्वाची आहे.

भारतातील तरुणाईमध्ये अपार क्षमता आहे. एकदा दिशा मिळाली की भारतीय संशोधक आणि उद्योजक जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करू शकतात, याची अनेक उदाहरणे आपण पाहिली आहेत.

### भारताच्या या यशामागील सर्वात मोठी ताकद कोणती असेल असे आपल्याला वाटते?

**डॉ. अभय जेरे :** भारतीय समाजाची एक वैशिष्ट्यपूर्ण क्षमता म्हणजे मर्यादित संसाधनांमध्येही प्रभावी उपाय शोधण्याची वृत्ती.

मी 'जुगाड' या शब्दाचा गौरव करणार नाही; परंतु समस्यांकडे व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहण्याची आणि अत्यंत कमी खर्चात परिणामकारक उपाय शोधण्याची जी क्षमता भारतीयांमध्ये आहे, ती अत्यंत मौल्यवान आहे.

भविष्यात हीच क्षमता उच्च दर्जाच्या संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेशी जोडली गेली, तर भारत जगाला अनेक अभिनव उपाय देऊ शकेल.

### विकसित भारत २०४७ या संकल्पनेच्या दृष्टीने नवोपक्रमाचे स्थान आपण कसे पाहता?

**डॉ. अभय जेरे :** विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचे असेल, तर आपल्याला ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करावी लागेल. केवळ सेवा क्षेत्रावर किंवा पारंपरिक कृषी अर्थव्यवस्थेवर आधारित राहून विकसित राष्ट्र बनणे शक्य नाही. ज्ञान, संशोधन, तंत्रज्ञान, नवोपक्रम, बौद्धिक संपदा आणि उद्योजकता यांवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करणे ही काळाची गरज आहे. मला आनंदाची गोष्ट वाटते की, आज देशातील शैक्षणिक संस्था, उद्योग, धोरणकर्ते आणि संशोधक या सर्वांना या बदलाची जाणीव झाली आहे. आपण योग्य दिशेने वाटचाल सुरू केली आहे. आता सातत्य, गुणवत्ता आणि दीर्घकालीन दृष्टिकोन यांची आवश्यकता आहे.

### सर, आपल्या अनुभवांमधून आणि विचारांमधून आम्हाला अनेक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन मिळाले. या सविस्तर संवादासाठी मनःपूर्वक धन्यवाद.

**डॉ. अभय जेरे :** धन्यवाद. नवोपक्रम, संशोधन आणि उद्योजकतेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी अशा संवादांची अत्यंत आवश्यकता आहे. आपण हा विषय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवत आहात, याबद्दल आपलेही अभिनंदन.

# कलादालन

कला ही केवळ रंगरेषांची मांडणी किंवा शिल्पातील आकार नसून ती मानवी संवेदनांचा आणि विचारांचा प्रगटीकरणाचा मार्ग आहे. परंतु भारतीय समाज अजूनही कलांचा खरा अर्थ समजून घेण्यात काहीसा निरक्षर आहे. शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच 'कला-साक्षरता' हीदेखील तितकीच महत्त्वाची ठरते. कारण कलेतूनच समाजात संवेदनशीलता, सौंदर्यदृष्टी आणि विचारांचा विस्तार घडतो. प्रस्तुत विभागात आम्ही वाचकांना चित्रकला, शिल्पकला आणि अन्य कलाप्रवाह यांचा सखोल वेध घेणारे लेख सादर करत आहोत. हे लेख केवळ कलांचे सौंदर्य दाखवणार नाहीत, तर त्यामागची सांस्कृतिक परंपरा, सामाजिक आशय आणि आधुनिक काळातील बदलते आयामही उलगडून दाखवतील.





स्मिता नि. किंकळे

## कला शिक्षणातील नव्या पर्वाची नांदी

कला ही केवळ सौंदर्यनिर्मिती नसून ती सामाजिक आणि सांस्कृतिक जबाबदारी आहे, याची जाणीव सांगली येथे झालेल्या राज्य कला प्रदर्शनाने करून दिली. समकालीन समाजातील परिवर्तन, तांत्रिक प्रगती, पर्यावरणीय संकटे आणि सांस्कृतिक ओळख यांसारख्या विषयांचे प्रतिबिंब युवा कलाकारांच्या कुंचल्यातून उमटले होते. मागील पिढीची तांत्रिक शिस्त, माध्यमावरील प्रभुत्व आणि नव्या पिढीची संकल्पनात्मक मांडणी आणि तंत्रज्ञानाचा वापर करत नव्या वाटा शोधण्याचे प्रयत्न ह्याचे दर्शन इथे घडले. या अर्थांने दोन पिढ्यांमधील सुसंवाद साधण्याचे काम या प्रदर्शनाने केले आहे.

महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा ही विविध स्तरांवर विकसित झालेली, ऐतिहासिक सातत्य जपणारी आणि सामाजिक परिवर्तनाशी घट्ट निगडित आहे. या परंपरेत दृश्यकला हा एक महत्त्वपूर्ण घटक असून, ती केवळ सौंदर्यनिर्मितीची प्रक्रिया नाही; तर वैचारिक संवाद, सामाजिक नोंद आणि सांस्कृतिक पुनर्रचनेचे एक सशक्त माध्यम आहे. सांगलीच्या ऐतिहासिक भूमीत आयोजित करण्यात आलेले '६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन (विद्यार्थी विभाग)' हे राज्याच्या कला-शिक्षण व्यवस्थेचे प्रदर्शन होतेच; पण युवकांच्या सर्जनशील क्षमतेचे आणि शासनाच्या दूरदर्शी सांस्कृतिक धोरणाचे एकत्रित दर्शन घडवणारे अभूतपूर्व आयोजनही होते. हे प्रदर्शन वार्षिक स्वरूपाचे असले, तरी त्याचे महत्त्व केवळ आयोजनापुरते मर्यादित नाही. ते राज्यातील कला शिक्षणाच्या पायाभूत संरचनेचा, संस्थात्मक सातत्याचा आणि सांस्कृतिक गुंतवणुकीच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचा एक अविभाज्य भाग आहे.

१९५६ साली सुरू झालेली राज्य कला प्रदर्शनाची परंपरा ही महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक धोरणातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड मानली जाते. विद्यार्थ्यांना स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देणे, गुणवत्तेला सार्वजनिक मान्यता मिळवून देणे आणि राज्यभरातील कला संस्थांमध्ये सुसंवाद निर्माण करणे हा या उपक्रमाचा मूळ हेतू आहे. आज राज्यात शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित अशा एकूण २१३ शासनमान्य कला संस्था कार्यरत आहेत. या सर्व संस्थांमधील विद्यार्थ्यांना समान संधी आणि सन्मान मिळवून देणारे हे प्रदर्शन 'संस्थात्मक समतोलाचे' एक जिवंत प्रतीक बनले आहे.

२०२४ साली 'महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाची' झालेली स्थापना हे या क्षेत्रातील एक क्रांतिकारी प्रशासकीय आणि शैक्षणिक पाऊल आहे. यामुळे अभ्यासक्रमातील सुसंगती, मूल्यमापन प्रक्रियेतील पारदर्शकता आणि ग्रेड परीक्षा प्रणालीचे पुनर्रचन अधिक भक्कम झाले. पूर्वी विविध संस्थांमधील मूल्यांकन पद्धतींमध्ये जी विसंगती जाणवत होती, ती दूर होऊन एक सुसूत्र आणि गुणवत्तानिष्ठ संरचना विकसित होत आहे. यावर्षी या नव्या ऊर्जेचा परिणाम म्हणून राज्यातील विविध कला संस्थांमधून ३,४९० विद्यार्थ्यांच्या एकूण ५,६८० कलाकृती प्रदर्शनासाठी प्राप्त झाल्या. निवड समितीने त्यातून अत्यंत चोखंदळपणे १२७५ उत्कृष्ट कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड केली.

यावेळच्या आयोजनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चित्रकला संचालनालयास लाभलेले तरुण आणि तडफदार नेतृत्व. या नेतृत्वाखाली नियोजनातील शिस्त, वेळेवर निर्णय आणि गुणवत्तेला प्राधान्य देणारी कार्यसंस्कृती विकसित झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. जागतिक कलाक्षेत्राचा अनुभव असलेल्या महिला अध्यापकावर प्रथमच 'प्रदर्शन अधिकारी' म्हणून जबाबदारी सोपवून महिला शक्तीचा सन्मान करण्यात आला, तसेच अनुभवी समन्वयकांच्या सहभागामुळे प्रदर्शनाला एक व्यावसायिक परिमाण लाभले. बालचित्रकला आणि ग्रेड परीक्षा चित्रांचा प्रदर्शनातील प्रथमच झालेला समावेश हा केवळ स्वरूपात्मक बदल नसून, तो कला शिक्षणाच्या संपूर्ण प्रवासाला एकात्मिक दृष्टीने पाहण्याचा धोरणात्मक निर्णय आहे. १८१६ पासून चालत आलेली ग्रेड परीक्षांची परंपरा ही आपल्या औपचारिक कला शिक्षणाचा पाया आहे, हे या निमित्ताने सार्वजनिक व्यासपीठावर अधोरेखित झाले.

प्रदर्शनातील कलाकृतींवर नजर टाकल्यास असे लक्षात आले की, समकालीन समाजातील परिवर्तन, तांत्रिक प्रगती, पर्यावरणीय संकटे आणि सांस्कृतिक ओळख यांसारख्या विषयांचे प्रतिबिंब युवा कलाकारांच्या कुंचल्यातून उमटले होते. डिजिटल माध्यम, मिश्र माध्यम आणि स्थापत्यात्मक प्रयोगांचा वाढता वापर हा आधुनिक अभ्यासक्रमीय बदलांचाच सकारात्मक परिणाम आहे. या प्रवासात ज्येष्ठांचा सन्मानही तितकाच महत्त्वाचा ठरला. ज्येष्ठ कलावंत जी. एस. माजगावकर यांचा गौरव हा महाराष्ट्राच्या समृद्ध चित्रकला परंपरेचा आणि मूल्यांचा सन्मान करण्यासारखे होते. जुनी पिढी तांत्रिक शिस्त आणि माध्यमावरील प्रभुत्व जपते, तर नवी पिढी संकल्पनात्मक मांडणी आणि तंत्रज्ञानाचा वापर करत नव्या वाटा शोधते. या दोन पिढ्यांमधील सुसंवाद साधण्याचे काम या प्रदर्शनाने केले आहे.

सांगलीसारख्या सांस्कृतिक वारसा लाभलेल्या नगरीत हे प्रदर्शन आयोजित होणे, हे सांस्कृतिक विकेंद्रीकरणाचे उत्तम उदाहरण आहे. सांगली ही शिक्षणाची पंढरी आहेच; पण संगीत, नाटक आणि कलेला राजाश्रय देणारी भूमी आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांनी या उपक्रमाला शासकीय पाठबळच दिले आणि अनोखे पालकत्वही निभावले. पारितोषिकांच्या रकमेत दुप्पट वाढ आणि जिल्ह्यातील हजारो शालेय विद्यार्थ्यांना हे प्रदर्शन पाहता यावे यासाठी त्यांचा बस प्रवास, पिण्याचे पाणी आणि अल्पोपहाराची स्वतः जबाबदारी स्वीकारून त्यांनी एक नवीन आदर्श घालून दिला. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत जवळपास ६५,००० हून अधिक विद्यार्थी आणि कलाप्रेमींनी या प्रदर्शनाला भेट दिली. हा भविष्यातील कलासंस्कृतीच्या दृष्टीने अत्यंत आशादायक टप्पा आहे.

थोडक्यात सांगायचे तर, ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन हे केवळ एक वार्षिक कार्यक्रम नसून, महाराष्ट्राच्या कला शिक्षण व्यवस्थेतील एका नव्या पर्वाचा प्रारंभ आहे. कला ही केवळ सौंदर्यनिर्मिती नसून ती सामाजिक आणि सांस्कृतिक जबाबदारी आहे, याची जाणीव या प्रदर्शनाने करून दिली आहे. ज्याप्रमाणे 'Venice Biennale' जागतिक स्तरावर किंवा 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' साहित्यात मानले जाते, तसेच हे प्रदर्शन भविष्यात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलावंतांना आकर्षित करणारे व्यासपीठ बनेल, असा विश्वास वाटतो. उपेक्षेपासून उन्नतीकडे वाटचाल करणारा हा ऐतिहासिक टप्पा महाराष्ट्राला कलाक्षेत्रात जागतिक ओळख मिळवून देण्यात यशस्वी ठरेल.

( लेखिका सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट येथे अधिव्याख्याता म्हणून कार्यरत असून त्या सध्या महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या सचिव म्हणून काम बघत आहेत.)



# शिवछत्रपतींचा सर्वाधिक सहवास लाभलेली दुर्गवास्तू : राजगड

शिवछत्रपती अन् गडकोट हे नाते सोळाव्या शतकापासून आजपर्यंत इतिहास, भूगोल अन् वारसा अभ्यासकांना आकर्षित करीत आहे. 'युनेस्को वर्ल्ड हेरिटेज साइट' अर्थात जागतिक वारसास्थळ म्हणून १२ गडकोटांची निवड होणे, ही प्रत्येक मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट आहे. पुढील काळात पुरातत्त्व खाते आणि सरकारी यंत्रणेसह या वारशासाठी नव्या पिढीचे योगदान महत्त्वाचे ठरणार आहे. जागतिक वासरा झालेल्या या गटकोटांची ही ओळख करून देणारी ही नवी लेखमाला सुरू करत आहोत.



**प्रसाद पवार**

राजगड हा केवळ एक किल्ला नाही, तर हिंदवी स्वराज्याच्या उभारणीचा साक्षीदार, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नांचा पहिला आधारस्तंभ आणि मराठी अस्मितेचे जिवंत प्रतीक आहे. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून गौरवले गेलेले हे दुर्गवैभव शिवकालीन इतिहासातील असंख्य महत्त्वपूर्ण घटनांचे केंद्र राहिले. महाराजांच्या पावलांनी पावन झालेला, जिजाऊ माँसाहेबांच्या संकल्पांना बळ देणारा आणि स्वराज्याच्या विस्ताराचा प्रत्येक टप्पा अनुभवणारा राजगड आजही सह्याद्रीच्या कुशीत अभिमानाने उभा आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत स्थान मिळाल्याने त्याच्या ऐतिहासिक, स्थापत्य आणि सांस्कृतिक वैभवाला जागतिक मान्यता प्राप्त झाली आहे. गडांचा राजा

आणि राजांचा गड म्हणून ओळखला जाणारा राजगड हा केवळ दगड-मातीची रचना नसून, स्वराज्याच्या संघर्ष, पराक्रम आणि प्रेरणेची अखंड गाथा आहे

राजगड म्हटले की, 'गडांचा राजा आणि राजांचा गड' हे अनेकदा कानी पडलेले वाक्य समोर. येथे राजांनी राजगड बांधायला सुरुवात केल्यापासून, ते इतिहासांतील नोंदींनुसार इसवी सन १६७० मध्ये ते दुसरी राजधानी रायगडावर जाण्यापर्यंत स्वराज्याचा प्रवास राजगडाच्या साक्षीने झाला. सह्याद्रीतला हा दुर्गराज केवळ तटा-बुरुजांनी साकारलेला गड नाही, तर तो स्वराज्याचा एक खंदा शिलेदार-सेनापती आहे. शिवछत्रपतींचा सर्वाधिक सहवास लाभलेला हा गड म्हणूनच इतिहासात अद्वितीय ठरतो.



'युनेस्को'च्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत दाखल झालेल्या सर्वच गडांची आपापली वैशिष्ट्ये आहेत. मात्र, त्यात 'राजगड' असणे या यादीला सर्वाधिक वजन प्राप्त करून देणारी गोष्ट आहे. याची अनेकविध कारणे आहेत. शिवछत्रपतींनी स्वतः आपल्या देखरेखीखाली बांधून घेतलेला गड, तोरण्यावर सापडलेल्या धनाचा वापर करून साकारलेली अद्वितीय गडवास्तू, पहिल्या राजधानीचा मान, शिवछत्रपतींचे २५ वर्षांचे वास्तव्य, शिवछत्रपतींच्या संपूर्ण परिवाराचा निवास, स्वराज्य संकल्पित जिजाऊ माँसाहेबांचा पद्मावती माचीवरील वाडा, गड पायथ्याला शिवपट्टण गाव (आजचा भोसलेवाडी परिसर) स्वराज्यावर आलेल्या सगळ्या संकटांचा साक्षी, शिवछत्रपतींचे आग्र्याला जाणे आणि तिथून परत येणे, छत्रपती राजाराम महाराजांचा जन्म, दुसऱ्या राजधानीसाठी रायगडाकडे प्रस्थान... अशा कितीएक गोष्टी राजगडाबद्दल सांगता येतील. विशेषतः गडाचा अद्वितीय बालेकिल्ला आणि त्यावरील वास्तू... या सगळ्यासाठी राजगड या यादीत दाखल झाला नसता तरच नवल!

राजगड या वास्तूने शिवछत्रपतींनी स्थापन केलेले स्वराज्य चढत्या कलेने वाढत गेलेले पाहिले. एका अर्थाने राजगड ही केवळ गडवास्तू नसून, तो स्वराज्याचा शिलेदार, सेनापती म्हणता येईल. राजगड या वास्तूने शिवछत्रपतींनी स्थापन केलेले स्वराज्य चढत्या कलेने वाढत गेलेले पाहिले. एका अर्थाने राजगड ही केवळ गडवास्तू नसून, तो स्वराज्याचा शिलेदार, सेनापती म्हणता येईल. 'शहामृग पर्वत, मुरुमदेव वा मुरूंबदेव' असे नाव असणाऱ्या डोंगराचे शिवछत्रपतींनी राजगड असे नामकरण केले आणि आज दिसणारा अद्वितीय असा राजगड आकाराला आला.

राजगड ही स्वराज्याची २५ वर्षे राजधानी होती. शिवछत्रपतींचा सर्वांत जास्त सहवास ज्या गडाला लाभला, तो हा गड असल्याने राजगड पाहण्यासाठी तुमच्याकडे भरपूर वेळ हवा. याचे कारण राजगडाचा विस्तार मोठा आहे. आकाशातून पंख पसरलेल्या गरूडासारखा दिसणाऱ्या राजगडाला गडांचा राजा आणि राजांचा गड, असे म्हटले जाते. या गडाची रचनाही वेगळीच आहे. पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा अशा तीन माच्या... माची म्हणजे मुख्य गडाचा कमी उंचीचा तसेच वस्तीचा भाग. राजगडाच्या या माच्यांच्या मध्यभागी आहे, कातळी बालेकिल्ला. बालेकिल्ला म्हणजे गडावरचा सर्वांत दुर्गम आणि उंच असा भाग. राजगडावर तुम्ही पाली या गावातून राजमार्गाने, तर गुंजवणे या गावातून छोट्या दिंडीमार्गे जाऊ शकता.

गडावर पहिल्यांदा जाताना पाली या गावातील राजमार्गाने गेलात, तर राजगडाच्या महाद्वाराची अद्वितीय रचना पाहता येईल आणि गडाच्या घेऱ्यातला समृद्ध जंगलपट्टाही. त्याशिवाय मळे, भुतोंडे या गावांमधूनही राजगडावर जाता येते. मुख्य दरवाजासह राजगडाला छोटे दिंडी दरवाजेही आहेत. शत्रूपासून रक्षणासाठी राजगडाचे बांधकाम लष्करीदृष्ट्या अतिशय काटेकोरपणे केलेले दिसते. पद्मावती माचीवर पद्मावती तलाव, पद्मावती मातेचे मंदिर, रामेश्वर मंदिर, पाण्याची टाकी, तटातील शौचकूप, राजवाडा आणि सदर या गोष्टी पाहता येतात. सुवेळा आणि संजीवनी या माच्या पाहण्यासाठी स्वतंत्र वेळच हवा. एका भेटीत हे सगळे पाहून होणार नाही. दुहेरी वक्ररेषांकित नाळयुक्त तटबंदी हे या दोन्ही माच्यांचे वैशिष्ट्य आहे. (दुहेरी तटबंदी म्हणजे एका तटाच्या आत दुसरा तट बांधून माची लढण्यासाठी अधिक भक्कम करणे.)

उगवतीची म्हणजेच पूर्वेची सुवेळा ही माची सूर्योदय होताना पाहावी, तर सूर्यास्त हा संजीवनी माचीच्या साक्षीने पाहावा. संजीवनी माचीचे बांधकाम पाहून तुम्ही चकीत व्हाल. आज साडेतीनशे ते चारशे वर्षांनीही या माचीचे बांधकाम जसेच्या तसे आहे. दोन तटांमध्ये सैनिक लपू शकतील



पद्मावती माची



सांजीवनी माची

अशा जागा आहेत. चिलखती बुरुजात जायचा दरवाजे आहेत. हे सगळे अधिक तपशिलात आणि कुतूहल जागृत ठेवून पाहणे श्रेयस्कर. आता बालेकिल्ल्याकडे वळूयात. उत्तर वा दक्षिण भारतातले प्रशस्त दुर्ग पाहताना साहजिकच त्यांची तुलना आपल्या गडांशी केली जाते. मात्र, ती करताना आपल्या गडांची वैशिष्ट्ये जर या दुर्गांना लावली, तर आपल्याकडचे गड अधिक सरस ठरतात. याचे कारण सह्याद्रीच्या कुशीत असल्याने त्यांना इतिहास-भूगोल आणि पर्यावरण या सगळ्यांच वेगळे महत्त्व आहे. या गडांचा अधिवास संपन्न आहे. त्यात निसर्गालाही जागा आहे. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने या गडांचे वेगळे मोल आहे. जिथे कुणी जायचा विचार करू शकत नाही, तिथे या गडांच्या रूपाने नूतन सृष्टी निर्माण झाली. आज्ञापत्रात म्हटल्याप्रमाणे 'गडकोट ही राज्यलक्ष्मी'ठरते. या सगळ्याचा विचार केल्यास सर्व गडांमध्ये राजगडाचा बालेकिल्ला देखणा आहे. कातळकोरीव आणि अतिशय दुर्गम वाट चढून जात इथे पोहोचता येते.

बालेकिल्ल्याचे अष्टकोनी बुरूजांचे महाद्वार पाहून हे इथे कसे बांधले असेल, असा प्रश्न पडतो. तिथूनच सुवेळा माचीचे मनोहर दर्शन घडते. आत जननीमातेचे मंदिर, चंद्रतळे हे चंद्रकोरीच्या आकाराचे तळे, ब्रह्मर्षी मंदिर, राजवाडा, बाजारपेठ आणि छान वळणदार तट-बुरूज पाहताना आपण भान हरपून जातो. गडाच्या महाद्वाराचा शेवटचा टप्पा चढण्यापूर्वी एक गुहाही लागते. तिथून वर महाद्वारात आल्यावर पद्मावती, सुवेळी आणि संजीवनीचे डोळ्यांत साठवावे, असे दर्शन घडते. तुम्ही जितक्या वेळा राजगड पाहाल तितका तो नवाच वाटतो. राजगडाला जाताना भरपूर अभ्यास करून जा, तिथली प्रत्येक वास्तू पाहून ती समजून घेणे हा अद्वितीय अनुभव ठरतो. राजगड पाहताना मनात एक भावना डोकावते, ती म्हणजे राजगडाचा जितका अभ्यास कराल तितका कमीच आहे.

## राजगडाच्या घेऱ्यात...

राजगडाच्या पायथ्याशी वसलेल्या आणि गडाच्या संरक्षणासाठी व देखभालीसाठी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या गावांमधील (घेऱ्यातील) प्रमुख गावे पुढीलप्रमाणे आहेत.

गुंजवणे : गडाच्या ईशान्येला असलेले आणि ट्रेकर्ससाठी मुख्य प्रवेशद्वार मानले जाणारे गाव. या गावात बाजारपेठ होती आणि गडावरील बहुतांश अधिकाऱ्यांची घरे येथेच होती. येथून गडाच्या गुंजवणे दरवाजाची वाट आहे. प्रशासकीय कामकाज करणाऱ्यांची ये-जा याच बाजूने होत असे, असेही सांगितले जाते. या ठिकाणीही (गुंजवणे दरवाजा) महाराजांना गुप्तधन मिळाल्याचे काही नोंदी सांगतात. विशेष म्हणजे, गुंजवणे गाव परिसरात अनेक पुरातन मंदिरे व वास्तूंचे अवशेष आजही विखुरलेले आहेत. रानात काही ठिकाणी वीरगळ आहेत. या भागाचा अभ्यास होणे अद्याप बाकी आहे.

पाली : गडाच्या पश्चिमेला असलेले, मुख्य पाली दरवाजाचे पायथ्याचे गाव. गडाच्या महादरवाजाची वाट असल्याने पाल (भोसलेवाडी) या गावालाही वेगळे महत्त्व आहे. इथून खंडोबाचा माळमार्गे गडावर जाता येते.

वाजेघर : राजगड चढताना 'भिकुल्यांचे मेट' या ऐतिहासिक तपासणी केंद्राचा मार्ग याच गावातून जातो. भिकुल्यांचे मेट म्हणजे, बाबुदा भिकुले यांच्या घराची जागा. बाबुदा भिकुले हे दीर्घकाळ राजगडाच्या पद्मावती माचीवरील कचेरीत मुक्कामी होते. अनेकांशी त्यांचा स्नेह होता. विशेषतः ज्येष्ठ साहित्यिक आणि दुर्गप्रेमी, अभ्यासक गोनीदा उर्फ गो. नी. दांडेकर यांच्यामुळे बाबुदा सर्वदूर ख्यात झाले. गोनीदांनी राजगड व परिसराच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली 'वाघरू' ही प्रसिद्ध कादंबरी भिकुले आणि त्यांचे जावई हनुवती फणसे यांच्यावर आधारित आहे. भिकुल्यांचे मेट येथे आज बाबुदांचे वंशज राहतात.

भुतोंडे : राजगडाच्या परिसरातील आणखी एक महत्त्वाचे गाव. भोर तालुक्यातील हे गाव स्वराज्याचे सरसेनापती येसाजी कंक यांच्या वास्तव्यामुळे प्रसिद्ध झाले. राजगडाच्या संजीवनी माचीखालचे हे गाव आणि तिथळा कंक यांचा वाडा पाहण्यासाठी आज शिवप्रेमी मोठ्या संख्येने जातात.



सुवेळा गणेश



माता पद्मावती

या गावात छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सहकारी व सरसेनापती येसाजी कंक यांचा ऐतिहासिक वाडा असून, तो आजही सुस्थितीत आहे. कालपरत्वे त्याच्यात सुधारणा होत गेल्या असाव्यात, असे दिसते. या वाड्यात त्यांच्या ११ व्या ते १४ व्या पिढीचे वंशज राहतात आणि त्यांनी वापरलेली ऐतिहासिक शस्त्रे व त्यांचे स्मारक आजही येथे जतन करून ठेवलेले आहे. हे गाव संजीवनी माचीच्या बाजूने राजगडाच्या पायथ्याचे गाव आहे. 'भु' म्हणजे भूमी आणि 'तोंड' म्हणजे मुख्य भाग म्हणजेच 'राजगड परिसरातील मुख्य भूमीवरील गाव' असा याचा ऐतिहासिक अर्थ लावला जातो. यासह दादवडी आणि मळे, लव्ही अशी गावेही राजगडाच्या घेऱ्यात आहेत. यातील मळे हे गाव गडाच्या सुवेळा माचीकडील काळेश्वरी बुरुजाच्या बाजूला आहे. इथल्या गुप्त वाटेने मळे या गावात चढ-उतार करता येते. राजगडाचा संपूर्ण घेरा सुमारे २० किलोमीटर (१२ कोस) एवढा प्रचंड आहे, जो दाट जंगलांनी आणि डोंगरांनी वेढलेला होता. आजही त्यातले अनेक जंगलपट्टे टिकून आहेत. राजगडाच्या घेऱ्यातून राजगड पाहणे, हाही एक वेगळा सोहळा असतो. विविध अंगांनी आणि विविध रूपांत राजगड ही वास्तू अतिशय गूढरम्य आणि तितकीच बुलंद, बेलाग भासते.

## राजगडावरील दैवते...

- गणपती: स्वराज्याची प्रथम राजधानी असलेल्या राजगडाचे काम ज्याच्या चरणी नतमस्तक होऊन सुरू झाले, ते गणराय राजगडावर सुवेळा माचीच्या तटात विराजमान आहेत. येथे गणरायाची प्रतिष्ठापना करून गडाचे बांधकाम सुरू झाले, असे अनेक अभ्यासक आणि तज्ज्ञांचे मत आहे. या अर्थाने सुवेळी पूजलेला राजगणेश असे या ठिकाणाला निश्चितच म्हणता येईल. सन १६४५ च्या सुमारास गडाचे राजधानीच्या दृष्टीने काम सुरू झाले असावे. सुवेळा माचीवर गणपती पुजून एका चांगल्या कामाचा प्रारंभ झाला. ही मूर्ती राजगडाच्या पूर्वेकडील सुवेळा या माचीच्या तटाच्या एका कोनाड्यात स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समोर दगडी दीपदेखील आहे. राजगडावर काळेश्वरी बुरुज व दिंडीजवळ एका कोनाड्यात आणखी एक गणपतीची सुबक मूर्ती आहे. दुर्गराज राजगडावरील गणरायाची मूर्ती ही डाव्या सोंडेची असून चतुर्भुज आहे. गणपतीच्या मागील दोन्ही हाती शस्त्रे आहेत. उजव्या हाती प्रसाद आहे. उजव्या पायशी मूषक पाहायला मिळतो. या मूर्तीवर चंद्र, सूर्यही कोरलेले असल्याचे दिसते. शिवकालाच्या सुवर्णपर्वाचा साक्षीदार असणारा हा गजानन म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण आहे.

**श्री माता पद्मावती देवी:** राजगडावरील हे सर्वांत मुख्य आणि प्रसिद्ध मंदिर आहे. हे पद्मावती माचीवर वसलेले आहे. पद्मावती माची ही गडावरील सर्वांत प्रशस्त जागा. या मंदिरात देवीची प्राचीन मूर्ती आणि तांदळा (पिंडी) आहे. या मंदिरातच पर्यटकांच्या आणि शिवप्रेमींच्या मुक्कामाची सोय होते. तांदळा व अनगड स्वरूपातील मूर्ती आज मुख्य मूर्तीसमोर पाहता येते. आजा जी मूर्ती पूजली जाते, ती भोरकर पंतसचिवांच्या काळात त्यांनी प्रतिष्ठापित केलेली आहे. शिवकाळानंतर गडाची व्यवस्था भोर संस्थानातून पाहिली जात असे. पद्मावती हे आदिमाया पार्वतीमातेचेच रूप असून, ती पद्मावती माचीवरील तलावाजवळच्या उंचवट्यावर आहे. मंदिर प्रांगण प्रशस्त आहे. मंदिराजवळ पाण्याची खोदीव टाकी आहेत. पूजेअर्चेसाठी केलेली ही व्यवस्था असावी.

- **रामेश्वर मंदिर:** पद्मावती माचीकडून राजवाड्याकडे जाऊ लागले की, उजवीकडे या पद्मावतीजवळच रामेश्वराचे मंदिर आहे. दक्षिणेतले रामेश्वर हे समस्त भारतीयांचे श्रद्धास्थान असणारे मंदिर आहे. त्याच्या नावावरील हे मंदिर राजगडावर असणे हा निव्वळ योगायोग नसून, शिवछत्रपतींच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे ते प्रतीक आहे.

- **श्री ब्रह्मर्षी मंदिर:** गडावरील सर्वांत जुने देवस्थान म्हणजे ब्रह्मर्षी मंदिर होय. या प्राचीन ऋषींच्या नावावरूनच या डोंगराला पूर्वी 'मुरंबदेव' असे नाव असल्याचे सांगितले जाते. बालेकिल्ल्यावर स्थित हे मंदिरही चंद्रतळ्याजवळ असून, या मंदिराभोवतीही खोदीव पाण्याची टाकी असल्याने, त्याचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसते. ब्रह्मदेवांची अतिशय मोजकी मंदिरे देशात पाहायला मिळतात. या दृष्टिकोनातून विचार केल्यास राजगडावर हे मंदिर असणे, ही या गडाच्या वैशिष्ट्यांत भर घालणारी गोष्ट आहे. शिवछत्रपतींनी कितीदा या मंदिरात पूजाअर्चा केली असेल, असा विचार करून आपण नकळत येथे नतमस्तक होतो.

**काळेश्वरी वा किल्लेश्वरी:** बालेकिल्ल्याचा कातळटप्पा चढून महाद्वारात गेल्यावर लगेचच समोर किल्लेश्वरी वा काळेश्वरीचे मंदिर



दिसते. अतिशय दुर्गम जागी आदिमाया येथे विसावलेली आहे. आदिलशहाचा सरदार, क्रूरकर्मा अफजल खान याचा कोथळा राजांनी प्रतापगडाच्या जनीचा टेंब या ठिकाणी काढला. अफजलचे शीर धडावेगळे करण्यात आले होते. ते राजगडी मातुश्री जिजाऊ माँसाहेबांना पाहण्यासाठी पाठविण्यात आले. जसे शत्रू संपला, की शत्रुत्व संपते... या न्यायाने राजांनी जनीच्या टेंबाबर अफजलच्या शवास जागा दिली, तसे त्याचे मुंडकेही राजगडाच्या बालेकिल्ल्याच्या प्रवेशद्वारात कोनाड्यात ठेवण्यात आल्याचे काही ऐतिहासिक नोंदी सांगतात. गोनीदांनी या प्रसंगाचे वर्णन 'बत्तीस दातांचा बोकड माय भवानीला बळी दिला' असे केले आहे.

**गंगा-भागिरथी मंदिर:** राजगडाच्या पद्मावती माचीच्या बाजूने सुवेळा माचीकडे जाताना उजवीकडे अतिशय अपरिचित असे हे गंगा-भागिरथी मंदिर लागते. पाण्याच्या टाक्याजवळ कोरीव आणि सुंदर गंगा-भागिरथीची मूर्ती, शिवलिंग आणि गणपती अशी दैवते येथे आहेत. विशेष म्हणजे, राज्यातल्या कोणत्याही गडावर गंगेचे मंदिर असल्याचे ऐकिवात नाही. मात्र, ते राजगडावर असणे, हे त्याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

**मारुतीराया:** बलोपासनेची देवता म्हणून मारुतीराया प्रत्येक गडावर आढळतो. असेच मारुती मंदिर सुवेळा माचीकडे जाताना लागते. हे मंदिर नरवीर तानाजी मालुसरे यांच्या सुवेळा माचीवरील निवासाजवळ आहे, असे उल्लेख काही कागदपत्रांमध्ये आढळून येतात. आज हे मंदिर लहान स्वरूपात असले, तरी पूर्वी ते आणखी प्रशस्त असावे, असे वाटते.

या दैवतांसह राजगडावर मावलायांचे (सप्तमातृका) स्थान असल्याचे दाखले कागदपत्रांत मिळतात. ते नमके कुठे होते, हे शोधण्याची गरज आहे. काळेश्वरी बुरुजावर तुळशीवृंदावनासारखे स्मारक असून, येथे स्वराज्यसंकल्पक शहाजी महाराजांची समाधी असल्याचे अभ्यासकांचे मत आहे. गडावरील मृत व्यक्तींचे उत्तरकार्य या भागात होत असे, असेही सांगितले जाते.

## महाराजांचा निवास वैशिष्ट्यपूर्ण बालेकिल्ला

एखाद्या मुकुटासारखा राजगडाच्या सर्वोच्च भागी बालेकिल्ला वसलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा राजवाडा असून त्याच्या आसपास काही प्राचीन अवशेष आणि देवस्थाने आहेत. बालेकिल्ल्याचा विस्तार मर्यादित असला, तरी राजपरिवाराला राहण्यासाठी तो प्रशस्त आहे, असे दिसते. बालेकिल्ल्यावर किल्लेश्वरी वा काळेश्वरी, ब्रह्मदेव ही मंदिरे, राजवाडा, कचेरी, सदर, बाजारपेठ, वैशिष्ट्यपूर्ण बांधणीचे बुरुज असे अनेकानेक अवशेष पाहता येतात. इथली वैशिष्ट्यपूर्ण तटबंदी पाहताना आपण भान हरपून जातो. येथील बुरुजातही एक गुप्तद्वार आहे. राजगडाच्या बालेकिल्ल्यावरून सिंहगड, पुरंदर, तोरणा, लिंगाणा, रायगड, रोहिडा असे अनेक गडकोट दिसतात. राजगड अन् बालेकिल्ल्याबाबत असणारा 'समद्या चौऱ्यांशी गडात असा गड न्हाई' हे वाक्य खूप काही सांगून जाणारे आहे. विशेष म्हणजे, गडावर स्वयंपाकघर आणि तिथली चुल्हाणेही (चूल) आज पाहता येतात. बालेकिल्ल्यासह पद्मावती माचीवरही प्रशस्त राजवाडा आहे. या ठिकाणी माँसाहेब जिजाऊंचा निवास होता, असे सांगतात. येथील उत्खननात देवघर आणि चांदीचे टाक आढळून आले आहेत. राजगडाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, गडावरील तटांत कोरलेले शौचकूप. ही व्यवस्था महाराजांनी बांधलेल्या गडांवर आवर्जून केल्याचे दिसते. या दृष्टीने स्वराज्यातील स्थापत्यशास्त्र किती प्रगत होते, याची प्रचिती येते.

एकूणात... राजगड या गडवास्तूचा विचार करता, माँसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महाराणी सईबाईसाहेब-सोयराबाईसाहेब, महाराणी पुतळाबाईसाहेब व काशीबाईसाहेब असा राज्ञीपरिवार, शिवछत्रपतींच्या कन्या, छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज, स्नुषा महाराणी येसूबाईसाहेब, सेनापती हंबीरराव मोहिते, नरवीर तानाजी मालुसरे, नरवीर येसाजी कंक व इतर स्वराज्याचे शूरवीर मावळे आणि नरवीर अशा सगळ्यांची पावले राजगडाला लागली आहेत. स्वराज्यावरील आक्रमणात औरंगजेबाने १६ फेब्रुवारी १७०४ रोजी राजगड जिंकला आणि या ऐतिहासिक दुर्गवास्तूचे नाव बदलून त्याने त्याचे नाव 'नबीशाहगड' असे ठेवले. मात्र, ते इतिहासात कधीच प्रचलित होऊ शकले नाही. राजगड हा शिवछत्रपतींचा श्वास आणि जणू अंतःकरण जाणणाऱ्या विश्वासू सहकाऱ्यासारखा आहे. या गडवास्तूने स्वराज्यावरील सर्व आघात पाहिले, ते पचविले आणि शिवछत्रपतींसारख्या थोर युगपुरुषाला आपल्या अंगाखांद्यावर पाऊण शतक मिरविले. राजगड आणि शिवराय हे जणू एक झाले. राजगड ही प्रत्येक मराठी मनासाठी, कधीही न संपणारी प्रेरणा आहे; म्हणूनच 'गडांचा राजा आणि राजांचा गड' हे त्याचे बिरुद आकाशी चंद्र-सूर्य आहेत; तोवर कायम राहील...

*(लेखक गडकिल्ल्यांचे अभ्यासक व ट्रेकर आहेत)*

# नव्या वाटा - नवे उद्यम

आजच्या नव्या युगात नवकल्पना आणि उद्योजकता हीच प्रगतीची खरी गुरुकिल्ली ठरते आहे. विद्यार्थ्यांनी, संशोधकांनी आणि तरुण व्यावसायिकांनी केलेल्या कल्पना प्रयोगशाळेतच न थांबता प्रत्यक्ष समाजोपयोगी उत्पादने व सेवा म्हणून साकार व्हाव्यात, यासाठी स्टार्टअप संस्कृती महत्त्वाची भूमिका बजावते. या सदरातून वाचकांना विविध स्टार्टअप उपक्रम, तरुण उद्योजकांचे अनुभव, यशस्वी कल्पनांची उदाहरणे आणि नव्या संधींबाबत प्रेरणा मिळेल. 'कल्पनेतून कृतीकडे' या प्रवासाची कहाणी मांडत हे सदर उद्योजकतेकडे वाटचाल करू इच्छिणाऱ्यांसाठी दिशादर्शक ठरेल.

# डिपेक्स : तंत्राविष्कार ते समाज परिवर्तन

ग्रामीण व निमशहरी भागातील तरुणांनी आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर उद्योग उभे करावे, उद्योजक बनावे आणि अनेक हातांना रोजगार द्यावा - या उद्देशाने डिपेक्स हा उपक्रम सुरू झाला. हळूहळू ते उद्योजकतेच्या दिशेने वाटचाल करणारे व्यासपीठ बनले. गेल्या चाळीस वर्षांत काळानुसार अनेक बदल या उपक्रमात झाले आणि त्याची व्याप्तीही वाढली. त्यामुळे औद्योगिक धोरण ठरवणाऱ्या तज्ज्ञ लोकांसाठी आज हे व्यासपीठ उपयुक्त आणि महत्त्वाचे ठरले आहे.



**डॉ. भरत अमलकर**

१९८६ साली सांगली येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू झालेला 'डिपेक्स' हा उपक्रम आज निव्वळ एक प्रदर्शन न राहता महाराष्ट्राच्या तंत्र चळवळीचे प्रतीक बनला आहे. सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा एक प्रयोग म्हणून सुरू झालेला हा उपक्रम आज एका भव्य तांत्रिक प्रदर्शनात परिवर्तित झाला आहे. शिवाय तो आता महाराष्ट्रापुरताच मर्यादित न राहता अनेक राज्यांतील विद्यार्थ्यांमध्ये डिपेक्सबद्दल कुतूहल, आकर्षण आणि जिज्ञासा निर्माण झाली आहे.

आज आपण 'टेक्निकल एक्झिबिशन', 'स्टार्टअप', 'इन्क्युबेशन', 'इनोव्हेशन' असे शब्द सहजपणे वापरतो. मात्र या संकल्पना प्रत्यक्षात विद्यार्थ्यांच्या कृतीतून रुजवण्याचे काम डिपेक्सने अनेक दशकांपूर्वी सुरू केले होते. तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ पदवी मिळवण्यासाठी नाही, तर समाजातील समस्या सोडवण्यासाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी व्हावा ही त्यामागची मूलभूत भूमिका होती. याच भूमिकेतून आकाराला येत गेलेला डिपेक्स ही केवळ स्पर्धा नाही, तर सामाजिक दायित्वाची जाणीव करून देणारी प्रक्रिया आहे.

डिपेक्स विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेवर आधारित आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील तरुणांनी आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर उद्योग उभे करावे, उद्योजक बनावे आणि अनेक हातांना रोजगार द्यावा - या उद्देशाने हा उपक्रम सुरू झाला. हळूहळू ते उद्योजकतेच्या दिशेने वाटचाल करणारे व्यासपीठ बनले.

अभियांत्रिकी पदवी आणि पदविका घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा यातील सक्रिय सहभाग वाढावा यासाठी विविध चर्चा, कार्यशाळा, मार्गदर्शन शिबिरे सातत्याने आयोजित केली गेली. तंत्रशिक्षणाच्या महाविद्यालयांमधील विद्यार्थी त्यांच्या तासिका, वर्कशॉप्स आणि




अभ्यास सांभाळून परिषद कार्यासाठी वेळ देत होते. व्यावसायिक शिक्षणातील अनिवार्य उपस्थिती, करिअरबाबत विचार करणारा दृष्टिकोन आणि स्पर्धात्मक वातावरण हे सांभाळून 'विद्यार्थ्यांनी समाजासाठी काहीतरी करावे' हा भाव जागवण्याचे काम डिपेक्सने केले.

डिपेक्सची वाटचाल म्हणजे सातत्याने नवकल्पनांचा स्वीकार. गेल्या चाळीस वर्षांत प्रत्येक दशकात या उपक्रमाने काळानुसार स्वतःमध्ये बदल केले. सृजन ट्रस्टची स्थापना, परीक्षा नियमावलीची आखणी, आयटीआय विद्यार्थ्यांचा समावेश, उद्योगाने प्रायोजित केलेले प्रकल्प, 'शोध' विभाग, डिपेक्सच्या विभागीय फेऱ्या - या सर्वांनी डिपेक्सची व्याप्ती वाढवली. हे बदल केवळ बाह्य नव्हते, तर अंतर्गत रचना आणि कार्यपद्धतीतही सातत्याने सुधारणा करण्यात आल्या.

बाह्य स्वरूपातही डिपेक्स आधुनिकतेकडे वाटचाल करत राहिला. प्रदर्शनाचे आकर्षक सादरीकरण, ग्रँड ग्रीन मॅटिंग, ऑनलाइन निवड प्रक्रिया, आधुनिक प्रमाणपत्रे, भोजन व निवास व्यवस्था यामध्ये तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करण्यात आला. आजच्या डिजिटल युगात आवश्यक असलेली पारदर्शकता आणि सुसूत्रता डिपेक्समध्ये दिसून येते.

या उपक्रमामागे कार्यरत असते, ती विद्यार्थ्यांची मोठी आणि समर्पित टीम. दरवर्षी 'आपण काहीतरी योगदान दिले पाहिजे' या भावनेने अनेक विद्यार्थी यात सहभागी होतात. वर्षानुवर्षे उद्योग-व्यवसाय सांभाळूनही माजी कार्यकर्ते आजच्या पिढीला मार्गदर्शन करतात. गरज पडल्यास ते प्रत्यक्ष मैदानात उतरतात. त्यांचा अनुभव, उद्योगजगताशी असलेला संबंध आणि व्यावसायिक दृष्टिकोन डिपेक्सला अधिक सक्षम बनवतो. सृजन विश्वस्त मंडळींच्या मार्गदर्शनामुळे डिपेक्सची ओळख एका तंत्रचळवळीच्या रूपात दृढ झाली आहे.

डिपेक्सच्या निमित्ताने विद्यार्थी, प्राध्यापक, उद्योजक, शासन-प्रशासन आणि विद्यापीठे एकत्र येतात. या संवादातून स्टार्टअप, इन्क्युबेशन आणि इनोव्हेशन या संकल्पनांना व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. आज औद्योगिक धोरण घडवणाऱ्या तज्ज्ञांसाठीही डिपेक्स हे समर्पक आणि सुसंगत व्यासपीठ ठरते. कारण येथे समाजाच्या गरजा, भविष्यातील आव्हाने आणि त्यावर विद्यार्थ्यांनी सुचवलेले उपाय प्रत्यक्ष पाहायला मिळतात.

Gen Z पिढीसाठी डिपेक्सचे महत्त्व अधिक आहे. ही पिढी डिजिटल आहे, वेगवान आहे आणि परिणामकेंद्री आहे. त्यांना केवळ नोकरी नको, तर प्रभाव निर्माण करायचा आहे. डिपेक्स त्यांना 'आयडिया टू इम्पॅक्ट' हा प्रवास दाखवतो. एका साध्या कल्पनेपासून प्रत्यक्ष प्रोटोटाइप, त्यातून उद्योग आणि पुढे समाजपरिवर्तन - हा संपूर्ण प्रवास अनुभवण्याची संधी येथे मिळते.

डिपेक्स म्हणजे केवळ प्रोजेक्ट सादरीकरण नाही, तो आत्मविश्वासाचा उत्सव आहे. सामान्य विद्यार्थ्यांच्या असामान्य प्रयत्नांचे हे प्रदर्शन आहे. समाजातील निकड ओळखून तंत्रज्ञानाच्या साहाय्याने त्यावर उपाय शोधण्याची प्रक्रिया येथे घडते. त्यामुळे डिपेक्स ही स्पर्धा नसून शिकण्याची, घडण्याची आणि नेतृत्व विकसित करण्याची शाळा आहे.

या सर्व बदलांमध्ये एक गोष्ट कायम राहिली - ती म्हणजे विद्यार्थी परिषदेची कार्यपद्धती. नियमित संपर्क, बैठकांची परंपरा, पूर्व आणि पूर्ण नियोजन, टीमवर्क, समाजातील विविध घटकांना जोडण्याची वृत्ती - या मूल्यांमुळेच डिपेक्स टिकून राहिला. विद्यार्थी कार्यकर्ता ते सजग, गुणवान नागरिक हा प्रवास डिपेक्समधून घडतो. आतापर्यंत अनेक कार्यकर्ते या प्रक्रियेतून घडले आहेत आणि पुढील काळातही घडत राहतील.

आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात डिपेक्सची गरज अधिक आहे. कारण ती केवळ तांत्रिक कौशल्य विकसित करणारी बाब नसून सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि उद्योजकतेची मानसिकता घडवणारी रसरशीत घटना आहे. १९८६ साली अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून सुरू झालेली ही ठिणगी आज एका व्यापक चळवळीत परिवर्तित झाली आहे. डिपेक्स म्हणजे कल्पकतेचा उत्सव, तंत्रज्ञानाचा सामाजिक वापर आणि युवकशक्तीचा सर्जनशील अविष्कार आणि म्हणूनच तो आजही तितकाच प्रासंगिक, प्रेरणादायी आणि भविष्यदर्शी आहे.

*( लेखक डीपेक्स आयोजित करणाऱ्या सृजन ट्रस्टचे कार्याध्यक्ष आहेत.)*

# बुक्स अँड रिल्स

"You are the books you read, the movies you watch, the music you listen to, and the people you meet" ही प्रसिद्ध ओळ आपण अनेकदा वाचली आहे. हो ओळ आयुष्याचं खूप सुंदर तत्त्व सांगते. आपण काय वाचतो, काय बघतो, काय ऐकतो आणि कोणासोबत राहतो, यावरून आपलं व्यक्तिमत्त्व घडतं. पुस्तकं आणि चित्रपट ही फक्त वेळ घालवण्याची साधनं नाहीत! ती आपल्याला विचार करायला लावतात, नवी दृष्टी देतात आणि कधी कधी आयुष्याची दिशा बदलतात.

या सदरातून विद्यार्थ्यांना अशाच काही पुस्तकं आणि चित्रपटांची ओळख करून दिली जाणार आहे जे फक्त मनोरंजन करत नाहीत तर प्रेरणा, विचार आणि जीवनमूल्यांचा खजिना आहेत. एखादं पुस्तक वाचताना आपल्याला त्यातील पात्रांमध्ये स्वतःचं प्रतिबिंब दिसतं, तर एखादा चित्रपट आपल्याला जगाकडे वेगळ्या दृष्टीने पाहायला शिकवतो. या सदरामध्ये तुम्हाला कधी विचार करायला लावणारी कथा सापडेल, कधी मनाला भिडणारा संदेश मिळेल, तर कधी एखादी कल्पना जी तुम्हाला पुढे नेईल.
या विभागाचा हेतू केवळ चांगले वाचण्याची आणि पाहण्याची सवय लावणे हा नाही, तर त्यातून मनोरंजनासोबत मनन घडवणे हा आहे. पुस्तकांच्या पानांमधून आणि पडद्यावरील दृश्यांतून घडणारी ही एक आगळीवेगळी शिक्षणयात्रा आहे. ही यात्रा आयुष्य समजायला, नवे विचार स्वीकारायला आणि स्वतःला घडवायला शिकवेल.

## वाचाल तर वाचाल

बाराखडी ते अभ्यासाची भली मोठी पुस्तके वाचता वाचता आपण सगळ्यांनीच शब्दांच्या जादूचा अनुभव घेतलेला आहे. पानोपानी उलगडणाऱ्या या अक्षरविश्वाने कित्येक पिढ्यांना विचार दिला, दिशा दिली, आणि अनेक नवी जीवनमूल्यं शिकवली. या प्रवासात असंख्य अमूल्य पुस्तके निर्माण झाली. त्यापैकी काही विशेष, त्यातही तरुण विद्यार्थ्यांनी नक्की वाचावीत अशी पुस्तके आपण 'वाचाल तर वाचाल' या सदरामधून जाणून घेणार आहोत.



**नीता कुलकर्णी**

# 'शाळाभेट': शिक्षणविश्वाचा जिवंत अनुभव देणारे पुस्तक

ग्रामीण भागातील जिल्हा परिषदांच्या शाळांविषयी बोलताना अनेकदा निराशेचे सूर ऐकू येतात. शिक्षणाची घसरलेली गुणवत्ता, अपुऱ्या सुविधा, शिक्षकांची कमतरता अशा समस्यांचे चित्र रंगवले जाते. मात्र या चित्राला एक दुसरी, उजळ बाजूही आहे. अत्यंत मर्यादित साधनसामग्रीत, अनेक अडचणींशी दोन हात करत विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाचा आणि संस्कारांचा दीप प्रज्वलित करणारे असंख्य शिक्षक आजही खेडोपाडी कार्यरत आहेत. त्यांच्या धडपडीची, कल्पकतेची आणि शिक्षणावरील निष्ठेची दखल घेणारे नामदेव माळी यांचे 'शाळाभेट' हे पुस्तक म्हणजे अशाच आशावादी आणि प्रेरणादायी वास्तवाचा शब्दबद्ध प्रवास आहे. चौदा ग्रामीण शाळांच्या भेटीतून लेखकाने अनुभवलेले शिक्षणविश्व केवळ शाळांचे दस्तावेजीकरण करत नाही, तर शिक्षणाच्या माध्यमातून घडणाऱ्या सामाजिक परिवर्तनाचीही हृदयस्पर्शी कहाणी सांगते.

“जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा झालाय, असं म्हंटलं जातं. पण ते तितकंसं खरं नाही. तुमच्या-माझ्या आसपास कितीतरी चांगल्या शाळा आणि चांगले शिक्षक आहेत. ते मन लावून, जीव ओतून काम करीत आहेत. तेथे शाळाही आहे आणि शिक्षणही आहे!

ही बाजू समोर आली पाहिजे असं वाटतं म्हणजे काम करणाऱ्यांचा उत्साह वाढेल, त्यांना प्रेरणा मिळेल.

किमान त्यांची निराशा दूर होईल!”

हा आहे 'शाळाभेट' या पुस्तकाचा ब्लर्ब... अर्थात पुस्तकाच्या मलपृष्ठावरचा मजकूर! या पुस्तकाचं मर्म सांगणारा, त्याची ओळख करून देणारा!

.... आणि खरोखरच हे पुस्तक वाचत असताना अत्यंत सकारात्मक अनुभव मनात भरून जातो. अत्यंत बिकट आणि अडचणीच्या परिस्थितीत किती सर्जनशील पद्धतीने मार्ग काढता येतो हे प्रत्यक्ष उदाहरणातून दाखवून देणारे शिक्षक पुस्तकाच्या पानांतून भेटत राहतात. त्यांच्या विद्यार्थ्यांची सुपीक डोकी आणि आनंदी चेहरे आपल्या मनात घर करून बसतात. विलक्षण कृतज्ञता वाटू लागते. त्या शिक्षकांना तर आपण मनोमन सलाम करतोच; पण खेडोपाडी आणि वाड्यावस्त्यांत फार चांगला हेतू मनाशी बाळगून या शिक्षकांची त्यांच्या शाळांची आणि कल्पक उपक्रमांची ओळख करून देणाऱ्या लेखक नामदेव माळी यांनाही वाचक विशेष दाद देतो.

मराठी साहित्यात शिक्षणव्यवस्थेवर आधारित अनेक पुस्तके आहेत. या क्षेत्रातल्या समस्या, उपाय किंवा कल्पक प्रयोग याविषयी अनेक पुस्तकं लिहिली गेली आहेत; पण नामदेव माळी यांचं 'शाळाभेट' त्या सगळ्यांत वेगळेपणाने उठून दिसतं. हे पुस्तक केवळ शिक्षणव्यवस्थेची समीक्षा करत नाही. शाळांमध्ये प्रत्यक्ष जाऊन तिथे अनुभवलेल्या वास्तवाचं प्रामाणिक आणि संवेदनशील चित्रण ते करतं. या पुस्तकातून वाचकांना शिक्षणव्यवस्थेच्या आतल्या सर्जनशील आणि संवेदनशील जगाची जिवंत ओळख होते.

'शाळाभेट' या शीर्षकातूनच पुस्तकाचा आशय लक्षात येतो. लेखकाने वेगवेगळ्या १४ शाळांना भेट दिली. आपण भेट देणार आहोत हे त्यांनी जेमतेम तासभर आधी पूर्वसूचना देऊन कळवलं. थोडक्यात काय, तर कुणी सरकारी अधिकारी भेट देणार असेल, तर जी ऐन वेळेची तयारी किंवा जामानिमा असतो, त्यालाच त्यांनी फाटा दिला. शाळेचं रोजचं रुपडं कसं असतं, हेच त्यांना बघायचं होतं. त्यामुळे तात्पुरता मुलामा चढवलेलं शाळेचं किंवा शिक्षकांचं आणि विद्यार्थ्यांचंही रूप त्यांना बघायचं नव्हतं. म्हणूनच या भेटींमध्ये ते केवळ 'निरीक्षक' राहिले नाहीत, तर शिक्षक, विद्यार्थी आणि स्थानिक लोकांशी संवाद साधून त्यांनी शाळेचं काम, शिक्षकांचे अभिनव प्रयोग जाणून घेतले. आणि मगच त्या अनुभवांना शब्दरूप दिलं. त्यामुळेच हे पुस्तक वाचताना वाचकाला आपण स्वतः त्या शाळांच्या परिसरातच फिरत असल्याचा अनुभव येतो.

या पुस्तकातील सर्वच शिक्षकांचे अनुभव लक्ष वेधून घेतात. अत्यंत मर्यादित साधनसामग्री असूनही विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी विविध कल्पक पद्धती वापरणारे, फळा, खडू आणि काही जुनी पुस्तके एवढ्यावरच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची आवड निर्माण करणारे, लहान वयापासून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या वाटेची गोडी लावणारे, शाळेच्या आवारात कष्टाने वनौषधींची बाग फुलवणारे, भित्तीपत्रकासारख्या साध्या वाटणाऱ्या साधनाच्या मदतीने मुलांना भाषेचा लळा लावणारे, पुस्तकी अभ्यासाच्या जोडीला पर्यावरणाची जपणूक, स्वच्छता, स्वावलंबन अशा अनेक मूल्यांचं कधी थेट तर कधी 'शुगरकोटेड' पद्धतीने ज्ञान देणारे चौदा शाळांतले शिक्षक, तिथले मुख्याध्यायपक, पदाधिकारी आणि विद्यार्थी या पुस्तकात जे काही बोलले आहेत, ते ऐकून 'प्रभावित व्हायला होतं' हे विधान अत्यंत सपक ठरेल. आपल्या कामाचा वसा निष्ठेने निभवणारे आणि त्यात आनंद मानणारे हे सारे जण आहेत. अशा अनुभवांमधून शिक्षणाच्या प्रक्रियेत असलेली आव्हानं आणि त्यातूनच उभी राहणारी सकारात्मकता स्पष्ट होते.

नामदेव माळी यांची लेखनशैली साधी, ओघवती आणि संवादात्मक आहे. दुसरी आवर्जून सांगण्याजोगी गोष्ट म्हणजे त्यांची निरीक्षण शक्ती आणि समोरच्या व्यक्तीचं बोलणं ऐकून घेण्याची वृत्ती! उत्तम श्रोता असल्याने बघितलेल्या, टिपलेल्या गोष्टी त्यांनी अचूकपणे पुस्तकात नोंदवल्या आहेत. त्यात कुठेही क्लिष्टता नाही, कोरडी भाषा नाही. हे करत असतानाच त्यांनी ग्रामीण भागातील शाळांचे वास्तव अत्यंत प्रामाणिकपणे मांडले आहे. साधनसामग्रीचा अभाव, अपुरी पायाभूत सुविधा, शिक्षकांची धडपड आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांचं प्रभावी निरीक्षण त्यांनी नोंदवलं आहे.

या सगळ्या अनुभवांतून शिक्षण ही केवळ पाठ्यपुस्तकांपुरती मर्यादित प्रक्रिया नसून ती जीवनाशी ती कशी घट्ट जोडलेली आहे, हे अधोरेखित होतं.

काही त्रुटींनबाबत उपाययोजना सुचवण्याचाही प्रयत्न नामदेव माळी करतात. शिक्षणात शिक्षकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, शाळेचं वातावरण कसं असावं, विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग कसा वाढवता येईल आणि समाजाने शिक्षणात कशी भूमिका घ्यावी, याबाबत त्यांनी वाचकाला विचार करायला उद्युक्त केलं आहे.

'शाळाभेट' हे पुस्तक शिक्षक, पालक, विद्यार्थी तसंच शिक्षणक्षेत्राशी निगडित प्रत्येकासाठी उपयुक्त आहे. विशेषतः ग्रामीण शिक्षणव्यवस्थेची खरी ओळख करून घ्यायची असेल, तर हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचं आहे. शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी हे पुस्तक प्रेरणादायी आहे.

एकूणच, 'शाळाभेट' हे पुस्तक दुर्गम भागातल्या शिक्षणव्यवस्थेचा अतिशय पॉझिटिव्ह आरसा दाखवणारं आहे. नामदेव माळी यांनी आपल्या निरीक्षण आणि अनुभवांच्या माध्यमातून उभा केलेला हा शब्दप्रवास वाचकाला अंतर्मुख करतो आणि शिक्षणाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोनही देतो.

*(लेखिका संपादक आणि अनुवादक आहेत )*

# रूपे रूपेरी

चित्रपट बघायला आवडत नाही, अशी व्यक्ती सापडणं अवघड. आपल्या सगळ्यांना रूपेरी पडद्यावरच्या या जादूने गेल्या शतकाहून अधिक काळ वेड लावलं आहे. या काळात अनेक उत्तमोत्तम चित्रपट तयार झाले. त्यातल्या काही विशेष, त्यातही तरुण विद्यार्थ्यांनी आवर्जून पाहाव्यात अशा काही कलाकृतींचा वेध आपण 'रूपे रूपेरी' या सदरामधून घेणार आहोत.

# झुंड : भिंत ओलांडताना...



**श्रीपाद ब्रह्मे**

नागराज मंजुळे हा माझा आवडता दिग्दर्शक आहे. त्याच्या बहुतेक कलाकृती मी पाहिल्या आहेत आणि त्या आवडल्याही आहेत. अगदी 'फँड्री'पासून ते 'वैकुंठ'पर्यंत! हा कविमनाचा दिग्दर्शक चित्रभाषेचा उत्तम वापर करून त्याला जे काही सांगायचं आहे, ते नेमकं आणि स्पष्टपणे सांगत आलाय. त्याचं हे सांगणं तसं त्रासदायक आहे. ती नुसती करमणूक कधीच नसते. त्याच्या कलाकृती आपल्याला प्रश्न विचारतात - अगदी डोळ्यांत डोळे घालून प्रश्न विचारतात. त्यातल्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरं आपल्याकडं नसतात. ती उत्तरं आपल्याकडं नसणं हा नेहमीच आपला दोष नसतो. पण आपल्यापैकी जी संवेदनशील मनं आहेत, निदान ती तरी त्यावर विचार करू लागतात. याच कारणांमुळं नागराजच्या कलाकृती पाहणं ही कायमच वैचारिक खाद्य पुरवणारी गोष्ट असते. चार वर्षांपूर्वी नागराज 'झुंड' नावाचा हिंदी सिनेमा करतोय आणि त्यात अमिताभ बच्चन प्रमुख भूमिकेत आहे, हे कळल्यावर मात्र मी थोडा सचिंत झालो होतो. दोन कारणं होती. एक, 'सैराट'च्या तुफान यशानंतर हा दिग्दर्शक हिंदीत प्रवाहपतित होतो की काय, ही भीती आणि दुसरं म्हणजे भाषा हे नागराजचं महत्त्वाचं माध्यम असल्यानं ती बदलल्यानं त्याचा संदेश पातळ होतो की काय, ही दुसरी भीती! 'झुंड' २०२२ मध्ये प्रदर्शित झाला आणि त्याविषयी वेगवेगळं कानी येऊ लागलं. मी स्वत: सिनेमा पाहीपर्यंत त्याबद्दलचं काहीही लिहिलेलं वाचणं, ऐकणं टाळतो. पूर्वग्रहविरहित नजरेनं सिनेमा पाहता यावा एवढाच त्यामागं हेतू असतो. त्यामुळं जरा निवांत, उशिरा हा सिनेमा पाहिला. बघितल्यावर सर्वप्रथम हे सांगितलं पाहिजे की, माझ्या मनात ज्या दोन्ही भीती होत्या, त्या अगदी फोल ठरल्या आणि त्याचा मला मनापासून आनंद झाला. नागराजचा हा सिनेमाही 'स्टार्ट टु एंड' नागराजचाच सिनेमा आहे आणि तो हिंदी भाषेत काय, अगदी झुलू भाषेत काढला असता, तरी तो तितकाच प्रभावी ठरला असता, असंही वाटून गेलं.

ही कहाणी एका खऱ्या घटनेवर आधारित आहे, हे मी वाचलं होतं. नागपूरचे विजय बारसे यांनी झोपडपट्टीतल्या मुलांना एकत्र आणून त्यांची फुटबॉल टीम तयार केली आणि या दरम्यान या मुलांची आयुष्यंही बदलवून टाकली, अशी ही 'वनलायनर' कथा. नागराजला ती का आवडली असावी आणि मोठ्या पडद्यावर का मांडावीशी वाटली असावी, हे या विषयावरून सहज लक्षात येतं. समाजातील दुर्लक्षित, वंचित, उपेक्षित वर्गाचं जगणं आणि त्यांचा जगण्यातला संघर्ष मांडणं या दिग्दर्शकाला आवडतं. ती त्याची सहज प्रवृत्ती आहे. इथं या संघर्षाला कॅनव्हास आहे तो फुटबॉलचा. आता इथं खेळ क्रिकेट नसून, फुटबॉल आहे हेही फार महत्त्वाचं. फुटबॉल हा श्रीमंत खेळ नाही. कुणीही तो खेळू शकतो. त्यामुळंच दक्षिण अमेरिका, आफ्रिका येथील गरीब देशांतही हा खेळ तुफान लोकप्रिय आहे. तिथंही अगदी झोपडपट्टीतून येऊन मोठा खेळाडू झालेल्या अनेक कहाण्या आहेत.

नागपूर शहरातल्या गद्दी गोदाम या झोपडपट्टीतून ही कथा सुरू होते. कथेतील महत्त्वाची पात्रं ही अगदी कोवळी, तरुण मुलं आहेत. ती फाटकी आहेत. अतिशय गरिबीत राहतात. चोऱ्यामाऱ्या करतात. मारामाऱ्या करतात. नशापाणी करतात. थोडक्यात, 'गंदी नाली के क़ीडे' असं कुणीही म्हणावं असंच त्यांचं आयुष्य आहे. या मुलांच्या आयुष्यात योगायोगानं विजय बोराडे सर (अमिताभ) येतात आणि त्यांचं आयुष्य बदलतं. नागराज अगदी तब्येतीत, सावकाशीनं हा सगळा संघर्षाचा प्रवास रेखाटतो. एखादी ठाय लयीतली शास्त्रीय बंदिश चालावी, तसं हे चित्रण येतं. त्यामुळं सिनेमाचा कालावधीही तब्बल तीन तासांचा आहे. मात्र, अगदी मोजके क्षण वगळले तर तो कुठेही कंटाळवाणा होत नाही, हे दिग्दर्शकाचं यश आहे. मला वैयक्तिकरीत्या मात्र तो अजून किमान अर्ध्या तासानं कमी करता आला असता, असं वाटलं.

या सिनेमात पहिल्या प्रसंगापासूनच या संघर्षाची बीजं दिग्दर्शक रोवतो. एकेका व्यक्तिरेखेला सावकाश प्रस्थापित करतो.

यातली एक मुस्लिम तरुणी तिला सतत त्रास देणाऱ्या पतीला सोडून, आपल्या तीन मुलींना घेऊन घराबाहेर निघते आणि ‘तू क्या मुझे तलाक देगा? मै ही तुझे तलाक देती हूँ’ असं म्हणून तीनदा ‘तलाक’ म्हणते आणि तिथून निघून जाते. इथूनच या बंडखोर कथेला प्रारंभ होतो. या झोपडपट्टीतली मुलं, त्यांची अतिशय शिवराळ भाषा, भडक कपडे, रंगीबेरंगी केस यांसकट त्यांचं सगळं कठीण जगणं दिग्दर्शक आरसा धरल्यासारखा दाखवीत राहतो. हे सगळं आपण आपल्या आजूबाजूला नक्कीच पाहिलेलं असतं. अनेकदा आपण अशा वस्तीतून गेलेलोही असतो. मात्र, तिथं थांबून तिथल्या माणसांकडं नीट बघणं आपल्याला कधी जमलेलं नसतं, तर त्यांच्याशी बोलणं किंवा त्यांच्याशी मैत्री ही तर फार दूरची गोष्ट. बोराडे सर नेमकं हेच करतात. एका प्रसंगामुळं त्यांचा या मुलांशी सामना होतो आणि त्यांची पावलं नकळत या झोपडपट्टीकडं वळतात. एका कॉलेजमध्ये फुटबॉल प्रशिक्षक असलेल्या बोराडे सरांना या मुलांच्या पायांत असलेलं फुटबॉलचं अद्भुत कसब दिसतं. सुरुवातीला ते चक्क पैसे देऊन या मुलांना फुटबॉल खेळायला लावतात. हळूहळू मुलांमध्ये आणि त्यांच्यात मैत्री होते. अखेर त्यांच्याच कॉलेजच्या टीमला ही टीम हरवते आणि तिथून त्यांच्या एका आगळ्यावेगळ्या प्रवासाला सुरुवात होते. या प्रवासाची कथा म्हणजे सिनेमाचा उत्तरार्ध आहे. मध्यंतरात येणारं डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचं गाणं आणि अमिताभचं बाबासाहेबांसमोर नतमस्तक होणं हे फार सूचक आहे.
उत्तरार्धात कथेत आणखी पात्रं येतात. संघर्ष आणखी टोकदार होतो. झोपडपट्टीतल्या प्रमुख पात्रांसोबत आता आपलीही ‘नाळ’ जुळलेली असते. त्यांच्या ‘सैराट’पणावर आपणही फिदा होऊ लागतो. त्यांच्या जगण्यातल्या संघर्षाला हळहळतो, त्यांच्या छोट्याशा विजयाला टाळ्या पिटतो. पात्रांमधली आणि आपल्यामधली भिंत हळूहळू कोसळू लागते. उत्तरार्धात दिग्दर्शकाचा उपरोध, उपहास आणखी बोचरा होतो. या देशात सामान्य माणसाची किंमत काय, तर त्याचं ओळखपत्र असलेला एक कागद. तोच जर नसेल तर त्या माणसाचं अस्तित्वही हा देश मानणार नाही, हे उघडंवाघडं सत्य दिग्दर्शक काही प्रसंगांतून समोर मांडतो. नागराजच्या सिनेमांमध्ये




क्लायमॅक्सला महत्त्व आहे. या सिनेमात तो मुंबई विमानतळावरच्या प्रसंगात येतो. हा प्रसंगही उत्तम आणि पुरेसा सूचक आहे. मात्र, नागराजच्या आधीच्या सिनेमांसारखा तो सणसणीत आणि गोळीबंद नाही. पण या सिनेमाची ती कदाचित गरजही नाही. आपल्या प्रमुख पात्रांनी भिंत ओलांडण्याची प्रतीकात्मक कृती सिनेमाला दोन्ही अर्थांनं ‘उच्च’ पातळीवर नेते.

या सिनेमात अमिताभ बच्चनचं असणं वेगवेगळ्या अर्थांनी महत्त्वाचं आहे. त्यात दिग्दर्शकाची काही वैयक्तिक भावना असणं हा भाग बाजूला ठेवला तरी, अमिताभसारख्या पडद्याबाहेर ‘लार्जर दॅन लाइफ’, ‘महानायक’ अशी प्रतिमा असणाऱ्या मोठ्या अभिनेत्यानं यातली बोराडे सरांची भूमिका साकारणं खूपच प्रतीकात्मक ठरलं आहे. वास्तविक अमिताभचं वय त्या पात्राच्या वयापेक्षा नक्कीच अधिक असणार. मात्र, अमिताभच्या जागी अनिल कपूर किंवा जॅकी श्रॉफ किंवा अक्षयकुमार किंवा अजय देवगण अशा त्या पात्राच्या खऱ्या वयाच्या अभिनेत्याचा विचार केला तरी, अमिताभचं तिथं असणं आणि प्रत्यक्षात सिनेमात त्याचं बोराडे सरांच्या रूपात दिसणं किती महत्त्वाचं आहे, हे लक्षात येईल. (त्यातल्या त्यात शाहरुख खाननं ही भूमिका उत्तम केली असती, असंही एकदा वाटून गेलं. पण ते असो.) अमिताभच्या इमेजमुळं आणि वयामुळंही त्या भूमिकेला आलेली एक गोड स्वीकारार्हता या सिनेमाच्या यशाचा मोठा घटक आहे, हे निश्चित!
बाकी इतर प्रमुख भूमिकांमध्ये किशोर कदम, छाया कदम हे नागराजचे आवडते कलाकार यात दिसतात. आमचे नाना, म्हणजे रामदास फुटाणे यांना छोट्याशा भूमिकेत अमिताभसोबत काम करताना बघणं सुखावह आहे. आकाश ठोसर आणि रिंकू राजगुरूही आहेत. मात्र, त्यांना तुलनेत फार चांगल्या भूमिका मिळालेल्या नाहीत. ‘फँड्री’मधला जब्या, म्हणजेच सोमनाथ अवघडे हाही यात एका भूमिकेत दिसतो. सर्वांत कौतुक करायचं ते डॉन झालेल्या अंकुश गेडामचं. तो या सिनेमाचा सर्वार्थाने नायक आहे. अगदी पहिल्या दृश्यापासून हा मुलगा आपली नजर वेधून घेतो. प्रसंगी त्याचा रागही येतो. मात्र, सर्व सिनेमावर या डॉनची छाप आहे हे निर्विवाद. सायली पाटीलनं तिची भूमिका चोख केली आहे. तिच्यातला आणि डॉनमधला रोमँटिक ट्रॅक मस्त आहे. बाकी भूमिकांत राजिया सुहैल, अँजेल अँथनी, कार्तिक उइके, प्रियांशू ठाकूर, जसप्रीतसिंग रंधवा या सर्वच नव्या आणि ‘रॉ’ मुलांनी कमाल केली आहे. अजय-अतुलचे संगीत नेहमीप्रमाणेच ढंगदार. मात्र, सिद श्रीरामचे ‘बादल से दोस्ती’ या गाण्याव्यतिरिक्त बाकी गाणी माझ्या तरी लक्षात राहिली नाहीत. साकेत कानेटकर यांचे पार्श्वसंगीत आणि सुधाकर यंकटी रेड्डी याचं छायाचित्रण अव्वल दर्जाचं!
हा सिनेमा सर्वांनी नक्कीच पाहायला पाहिजे. आपल्या स्वतःच्या मनात असलेल्या अनेक भयांवर, न्यूनगंडांवर मात करण्यासाठी बघायला हवा. आपल्याच आजूबाजूला असलेलं उपेक्षितांचं जग नीट जाणून घेण्यासाठी बघायला हवा. आपल्यातल्या आणि त्यांच्यातल्या अंतराची जाण आणि भान येण्यासाठी बघायला हवा. मधली ती मोठी भिंत ओलांडण्यासाठी ते आवश्यक आहे.

जाता जाता - एक अगदी सूक्ष्म, पण मला खटकलेला मुद्दा. या सिनेमाच्या श्रेयनामावलीत नागराजनं त्याचं नाव ‘मंजुले’ असं का लिहिलं आहे? हिंदी सिनेमा आहे म्हणून? हिंदीने आता ‘ळ’ स्वीकारला आहे आणि नसला स्वीकारला तरी नागराजनं त्याचं आडनाव बदलण्याचं काहीच कारण नाही. ‘आयडेंटिटी’साठी लढणारा, भांडणारा दिग्दर्शक म्हणून नागराजची ओळख आहे, त्या पार्श्वभूमीवर हा विरोधाभास गमतीशीर वाटला.

*(लेखक ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या पुणे आवृत्तीत वृत्तसंपादक आहेत.)*

# मनाचीये गुंती

विद्यार्थी जीवन हे स्वप्नं, ध्येयं आणि आव्हानांचा संगम असतं. करिअरची शाश्वती, बदलतं शैक्षणिक वातावरण, सततची स्पर्धा आणि त्यासोबत सोशल मीडियामुळे निर्माण होणारा मानसिक दबाव- हे सगळं त्यांच्या मनात मोठा जटील गुंता तयार करतं. हा गुंता आधीच्या पिढीला पूर्णपणे उमगेलच असं नाही. 'मनाचीये गुंती' या सदरामधून अशाच प्रश्नांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला जाईल. मनातील संभ्रमाला दिशा देणं, अंधारातला मार्ग दाखवणं आणि विद्यार्थ्यांच्या प्रवासाला आधार देणं हा या सदराचा मुख्य हेतू आहे.

# आयुष्याला हो म्हणा

व्यसनाच्या वाटेला आपण लागलो आहोत हे समजण्यापूर्वीच अनेकदा तरुण व्यसनाधीन होतात. व्यसनी होण्याची अनेक कारणे आहेत ते सोडण्याचे एकच प्रबळ कारण म्हणजे त्याच्या पंजातून सुटलेले आयुष्य अधिक निरोगी आणि आनंददायी असते. व्यसनाला ठाम नकार देणारी आणि कुटुंब व समाज याचा विचार करणारी कणखर पिढी आज देशाला हवी आहे. हा मंत्र प्रत्येक विद्यार्थ्याने लक्षात ठेवणे फार गरजेचे आहे .



**महेंद्र कानिटकर**
मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र,पुणे

महाराष्ट्र ही संतांची, विचारांची आणि प्रगत तंत्रज्ञानाची भूमी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या राज्यातील उच्च आणि तंत्रशिक्षण घेणारा विद्यार्थी जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवत आहे. महाविद्यालयीन जीवन हे केवळ पदवी मिळवण्याचे साधन नसून, त्याबरोबर तो चारित्र्य घडवण्याचा आणि भविष्याचा पाया रचण्याचा काळ असतो. मात्र, याच काळात एक अत्यंत घातक वळण सामोरे येऊ शकते, जे अनेक हुशार तरुणांचे स्वप्न आणि त्यासोबत आयुष्य उद्ध्वस्त करते. ते दुःस्वप्न म्हणजे 'व्यसनाधीनता'.

मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रामध्ये वीस वर्षांहून अधिक काम करताना आणि माझ्या स्वतःच्या अनुभवातून जाणवलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कोणतेही व्यसन केवळ शरीराला नाही, तर माणसाच्या बुद्धीला, प्रतिभेला आणि त्याच्या संपूर्ण भविष्याला पोखरून टाकत असते. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कुटुंबाला आणि समाजाला मोठ्या अपेक्षा असतात; पण जेव्हा हेच तरुण अंमली पदार्थांच्या जाळ्यात अडकतात, तेव्हा केवळ एका व्यक्ती किंवा कुटुंबाचे नाही, तर समाजाचेही नुकसान होते.

## अंमली पदार्थांचे बदलते स्वरूप आणि भारतीय वास्तव

भारतात आणि विशेषतः महाराष्ट्रात तरुणांमध्ये अंमली पदार्थांचे सेवन ही एक गंभीर समस्या बनली आहे. पूर्वी ही समस्या हे केवळ विशिष्ट समाजघटकांपुरती मर्यादित होती; पण आज ते लोण सुशिक्षित, मध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू विद्यार्थ्यांची वसतिगृहे, महाविद्यालयीन कँटीन्स आणि खाजगी पार्ट्यांपर्यंत पोहोचले आहे.

निकोटिन आणि धूम्रपान हा एक निरुपद्रवी वाटणारा सौम्य शांत पण जीवघेणा विळखा आहे. व्यसनाच्या जगात पहिले पाऊल पडते ते 'धूम्रपाना'द्वारे! अभ्यासाचा

ताण घालवण्यासाठी, परीक्षेच्या रात्री जागण्यासाठी किंवा केवळ मित्रांच्या घोळक्यात 'कूल' दिसण्यासाठी ओठांवर आलेली पहिली सिगारेट कधी कायमची साथीदार बनते, हे समजतही नाही. सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांमधील 'निकोटिन' हे अत्यंत वेगाने व्यसनाधीन करणारे रसायन आहे. ते मेंदूमध्ये तात्पुरते उत्तेजन (Stimulation) निर्माण करते; पण त्याचे परिणाम दीर्घकालीन आणि भयानक असतात. सिगरेटमधील धूर थेट फुफ्फुसात जातो, त्यामुळे फुफ्फुसांवर त्याचे अनेक दुष्परिणाम होतात. त्यातील काही महत्त्वाचे म्हणजे -फुफ्फुसाचा कर्करोग (Lung Cancer) श्वास घेण्यास त्रास होणे, सतत खोकला, दम लागणे किंवा हृदयविकाराचा झटका येणे. या व्यसनामुळे रक्तदाब वाढतो. दात पिवळे पडणे, त्वचा लवकर सुरकुतणे हे त्याचे अन्य दुष्परिणाम आहेत. धुम्रपान इतरांना, म्हणजे ते न करणाऱ्यांना देखील हानिकारक असते. व्यसनाचा आणखी एक प्रकार म्हणजे गुटखा किंवा खाण्याची तंबाखू हे पदार्थ तोंडात ठेवले जातात. त्याचा थेट तोंडावर आणि पचनसंस्थेवर परिणाम होतो. त्याचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे तोंडाचा कर्करोग. याची सुरवात तोंडात लहान जखम/पांढरे डाग येण्यापासून होते. त्यानंतर तोंड उघडण्यास त्रास होऊ लागतो. यामुळे दात आणि हिरड्यांचे नुकसान आणि श्वासाला दुर्गंधी येऊ लागते.

आजकालच्या उच्चशिक्षित तरुणाईमध्ये 'वेपिंग' (Vaping) किंवा 'ई-सिगारेट्स' वापरण्याचा कल वाढत आहे. अनेक विद्यार्थी याला सिगारेटचा सुरक्षित पर्याय मानतात; परंतु हे पूर्णतः चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे. हा एक असा विळखा आहे जो आरोग्यासोबतच खिशालाही कात्री लावतो आणि हळूहळू अधिक घातक अंमली पदार्थांच्या वाटेवर घेऊन जातो. गुटखा खाणे हे निश्चित कर्करोगाला निमंत्रण आहे.

### सामाजिक भ्रम:

आजकाल 'सोशल ड्रिंकिंग' ही एक फॅशन किंवा प्रतिष्ठेचे लक्षण झाले आहे.




"थोडी दारू प्यायल्याने काय नुकसान होते?" असे म्हणत अनेक तरुण मद्यपानाकडे वळतात. शिक्षण घेतांना येणारा अभ्यासाचा ताण (?) घालवण्यासाठी किंवा 'पीअर प्रेशर'मुळे दारूचे समर्थन केले जाते. पण विज्ञान असे सांगते की, अल्कोहोल हे मध्यवर्ती मज्जासंस्थेवर परिणाम करणारे 'डिप्रसंट' आहे. त्यामुळे मेंदूची निर्णयक्षमता मंदावते आणि तार्किक विचार करण्याची शक्ती झपाट्याने कमी होते.

व्यसनातील आणखी एक प्रकार म्हणजे गांजा आणि चरस याचे सेवन. अनेक तरुणांमध्ये असा चुकीचा समज पसरवला आहे की, गांजा हा 'नैसर्गिक' आहे आणि त्याचे दुष्परिणाम होत नाहीत. प्रत्यक्षात, गांजाच्या नियमित सेवनाने 'ॲमोटिव्हेशनल सिंड्रोम' बळावतो आणि काहीतरी करून दाखवण्याची जिद्द संपते. माणूस आळशी होतोच आणि त्याची एकाग्रता पूर्णपणे विस्कळीत होते. आजच्या हाय-प्रोफाइल पार्टी कल्चरमध्ये सिंथेटिक ड्रग्ज म्हणजे MD, LSD, कोकेन मोठ्या प्रमाणात वापरले जातात. 'म्याऊ म्याऊ' (Mephedrone) सारख्या पदार्थांनी गेल्या काही वर्षांत अनेक तरुणांना मृत्यूच्या दारात ढकलले आहे. हे ड्रग्ज मेंदूतील रसायनांचे संतुलन अशा प्रकारे बिघडवतात की, व्यक्तीला कायमचे मानसिक आजार जडतात. परीक्षेत रात्रभर जागण्यासाठी किंवा एकाग्रता वाढवण्यासाठी 'स्मार्ट ड्रग्ज'च्या नावाखाली काही औषधांचे सेवन केले जाते. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय घेतलेल्या या गोळ्या मेंदूला निकामी करू शकतात.

### व्यसनाचा प्रवास

कोणीही पहिल्या दिवशी लगेच 'व्यसनी' होत नाही. हा एक अत्यंत संथ आणि फसवा प्रवास आहे. या प्रवासाचे चार महत्त्वाचे टप्पे आपण समजून घेतले पाहिजेत:

* पहिला टप्पा आहे कुतूहल आणि प्रयोग याचा.  "एकदा ट्राय करून बघूया, काय होतंय?" हे वाक्य व्यसनाच्या जगाचे प्रवेशद्वार आहे. मित्रांच्या आग्रहाखातर किंवा केवळ अनुभवासाठी केलेली पहिली नशा या टप्प्यात येते.

* दुसरा टप्पा म्हणजे याचा सामाजिक वापर: या टप्प्यावर केली जाणारी नशा ही केवळ पार्ट्या किंवा गेटटुगेदर पुरती मर्यादित असते. व्यक्तीला वाटते की, "माझं स्वतःवर नियंत्रण आहे आणि मी हे कधीही हे सोडू शकतो." पण हा सर्वात मोठा भ्रम असतो.

*तिसरा टप्पा आहे या पदार्थांचा अतिवापर आणि त्यावर आलेले अवलंबित्व. आता नशा ही आनंदासाठी नाही, तर 'नॉर्मल' वाटण्यासाठी लागते. परीक्षेत यश मिळाले तरी नशा आणि अपयश आले तरी नशा. मेंदू आता त्या पदार्थावर शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अवलंबून राहू लागतो.

* चौथा टप्पा म्हणजे व्यसन विकार (Substance Use Disorder - SUD): हा एक आजारपणाचा टप्पा आहे. येथे व्यक्तीचे स्वतःच्या इच्छाशक्तीवर नियंत्रण राहत नाही. अंमली पदार्थ न मिळाल्यास शरीराला त्रास होऊ लागतो, ज्याला Withdrawal Symptoms म्हणता येते. चोरी करणे, खोटे बोलणे आणि अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष करणे ही त्यातील महत्त्वाची लक्षणे आहेत. व्यसन आता मेंदूचा 'आजार' बनलेला असतो.

### डिजिटल नशा

तंत्रशिक्षणाच्या युगात आपण गॅजेट्सशिवाय राहू शकत नाही; पण हेच



गॅजेट्स आता 'डिजिटल ड्रग्ज' बनत आहेत. सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि पॉर्नोग्राफी यांमुळे तरुणांमध्ये एक नवीन प्रकारचे व्यसन निर्माण झाले आहे. जेव्हा आपण सोशल मीडियावर 'लाईक' मिळवतो किंवा एखाद्या गेममध्ये जिंकतो, तेव्हा मेंदूत 'डोपामिन' नावाचे रसायन स्त्रवते. हे अगदी कोकेन घेतल्यावर होणाऱ्या आनंदासारखेच असते. त्यामुळे तरुण तासनतास रिल्स स्क्रोल करण्यात किंवा गेम खेळण्यात घालवतात. सततच्या नोटिफिकेशनमुळे एकाग्रतेचा काळ (अटेंशन स्पॅन) कमालीचा कमी झाला आहे. गुंतागुंतीचे कोडिंग, डिझाइनिंग किंवा संशोधनाचे काम करण्यासाठी लागणारी 'डीप वर्क' करण्याची क्षमता नष्ट होत आहे. माणसाला सामाजिक एकाकीपण येत चालले आहे. कारण स्क्रीनच्या जगात वावरताना प्रत्यक्ष संवाद संपत चालला आहे. यातूनच नैराश्य आणि एकटेपणा वाढतोय, जो पुन्हा अंमली पदार्थांच्या सेवनाकडे नेतो.

व्यसनाधीनतेचे अनेक दूरगामी परिणाम आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्यसन हे केवळ वैयक्तिक संकट नसून तो त्यांच्या करिअरवर अतिशय प्रतिकूल परिणाम करणारा एक घटक आहे. एकाग्रता कमी होणे, स्मरणशक्तीचा ऱ्हास आणि वर्गांमध्ये वारंवार अनुपस्थिती यामुळे अखेरीस अनेक विद्यार्थी अर्धवट शिक्षण सोडतात. आज अनेक कॉर्पोरेट कंपन्या आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये 'बॅकग्राउंड चेक' आणि 'ड्रग टेस्ट' केली जाते. व्यसनाधीनतेचा रेकॉर्ड करिअर सुरू होण्यापूर्वीच संपवू शकते. व्यसन हे एक आर्थिक ओझेही आहे. ड्रग्ज आणि अल्कोहोल ही अत्यंत महागडी व्यसने आहेत. पालकांनी शिक्षणासाठी पाठवलेला पैसा व्यसनावर खर्च केल्याने गुन्हेगारी मार्गाला लागलेले अनेक तरुण आज समाजात दिसतात. या वर्गाला यकृताचे विकार, हृदयाच्या समस्या आणि स्किझोफ्रेनिया किंवा बायपोलर डिसऑर्डर सारखे गंभीर मानसिक आजार जडलेले दिसून येतात.

## मुक्तांगणचा दृष्टिकोन

व्यसन हा चारित्र्याचा दोष नाही, तो एक उपचार करण्यायोग्य आजार आहे. मुक्तांगणमध्ये आम्ही 'होलिस्टिक रिकव्हरी'वर भर देतो. detoxification, योग, ग्रुप थेरपी, आर्ट थेरपी, वैयक्तिक समुपदेशनाद्वारे उपचार करतो. रुग्ण मित्रांना अंमली पदार्थांच्या ऐवजी खेळ, व्यायाम अशा सकारात्मक पर्यायी नशेकडे वळण्यास प्रेरित केले जाते. व्यसनाची समस्या न लपवता तिचा स्वीकार करणे हीच उपचारांची पहिली पायरी आहे. यातील पुढचे टप्पे कोणते? तर, खंबीरपणे 'नाही' म्हणायला शिकणे. जो मित्र नशा करण्यासाठी प्रवृत्त करतो, तो मित्र नसून शत्रू आहे. 'नाही' म्हणायला शिकणे हे खरे 'स्मार्ट' असण्याचे लक्षण आहे, हे या काळात बिंबवले जाते. उच्च शिक्षणाचा ताण येऊ शकतो; पण तो घालवण्यासाठी व्यायाम, योग, संगीत किंवा ट्रेकिंग हे नैसर्गिक डोपामिन मिळवण्याचे हे सुरक्षित आणि आनंददायी मार्ग आहेत. कुटुंबात पालकांशी मनमोकळेपणाने बोलणे हा एक महत्त्वाचा उपाय आहे. मित्र बदलू शकतात; पण पालक नेहमी पाठीशी राहतात.

## आयुष्याची नशा करा!

माझ्या तरुण मित्र-मैत्रिणींनो, तुमचे आयुष्य हे एखाद्या कोऱ्या कागदासारखे आहे, त्यावर काय लिहिले जावे? यशाची गाथा की व्यसनाची काजळी, हे आपल्याच हातात आहे. अंमली पदार्थ क्षणिक सुख देतील; पण ते नकळत आपले स्वातंत्र्य, स्वप्न आणि व्यक्तिमत्त्व हिरावून घेतात. या देशाचे भावी इंजिनिअर्स, डॉक्टर्स, आयटी व्यावसयिक, राज्यकर्ते यांची बुद्धी आणि श्रम कुटुंबीयांच्या देशाच्या प्रगतीसाठी हवे आहेत. व्यसनाच्या विळख्यासाठी नाही. कठीण प्रसंगी न डगमगता मदत मागितली तर मुक्तांगण सारख्या संस्था आणि अनेक सजग नागरिक पाठीशी उभे राहू शकतात. त्यासाठी एकच मंत्र लक्षात ठेवावा, आयुष्याला हो म्हणा, नशेला नाही!

**महेंद्र कानिटकर**
समुपदेशक,
मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, पुणे.
फोन 9637324730
मुक्तांगण चौकशी : 99220 28366

# वाचन संस्कृती जपूया, विकसित राष्ट्र घडवूया

दैनंदिन जीवन आणि कार्यालयीन ताणतणावातुन मुक्ती मिळविण्यासाठी वाचन हा सर्वोत्तम उपाय असू शकतो. नियमित वाचन तुमच्या मनावरील ताण, नैराश्य, चिंता कमी करू शकते. कारण जेव्हा आपण आपल्या आवडीचे पुस्तक अथवा वाचन साहित्य वाचत असतो तेव्हा आपले मन आणि मेंदू त्यामध्ये एकाग्र होत जाते, त्यामुळे अनावश्यक आणि नकारात्मक विचार आपोआप दूर होत जातात. त्यामुळे सकारात्मक भावना, आनंद आणि सकारात्मक मानसिकता यामध्ये वाढ होत असते. या सर्वाचा व्यक्तीच्या आरोग्यावर देखील सकारात्मक प्रभाव पडतो.

**डॉ. उदय जाधव**
ग्रंथपाल, कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे
डॉ. अरविंद ब. तेलंग कला,वाणिज्य व विज्ञान
वरिष्ठ महाविद्यालय,
निगडी, पुणे.

सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील नवनवीन संशोधनामुळे आजची जीवनशैली बदलली आहे. 'करलो दुनिया मुट्ठी मे' म्हणत म्हणत आपणच कधी या सोशल मीडियाच्या मगरमिठीत कैद झालो ते कळत नाही. सकाळी(?) झोपेतून उठल्यापासून ते रात्री(?) झोपेपर्यंत इंटरनेट आणि स्मार्ट गॅझेटचा विळखा आपल्याभोवती असतो. दिवसभर रील्स करून आणि त्या इन्स्टाग्राम, फेसबूक, यूट्यूब आणि व्हाटसअप वरती पोस्ट करून आणि स्क्रीन वर भारंभार आदळणाऱ्या रील्स बघून बघून दमल्यावर शेवटी लक्षात काहीच राहत नाही. शिवाय स्मार्टस्क्रीन अतिवापराचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम वेगळेच. ज्यामध्ये चिडचिड, डोळेदुखी, मानदुखी, पाठदुखी, एकाग्रता साधता न येणे, अति आक्रमकता हे साधारण दृश्य दुष्परिणाम आहेत. याउलट वाचनाचे फायदे आहेत. वाचन ही एक सुलभ आणि सोपी क्रिया आहे. मुद्रित (प्रिंट) साहित्य वाचनासाठी वाचन साहित्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही विशेष उपकरणांची आवश्यकता नाही; परंतु बऱ्याच लोकांना म्हणजे जवळपास ८० टक्के लोकांना वाचनाचे फायदे माहीत नसल्याने ते वाचतच नाहीत.

तुमच्या आवडीचे वाचन तुमच्या बुद्धिमत्तावाढीसाठी उपयुक्त आहे. जितके जास्त वाचता तितके जास्त तुम्ही माहिती आत्मसात करता. या आत्मसात केलेल्या माहितीचे चिंतनातून ज्ञानात रूपांतर करता येते. जसे शरीरासाठी व्यायाम महत्त्वाचा आहे, तसंच वाचन हे मेंदुसाठी व्यायामसारखे आहे. वाचनामुळे शब्दसंग्रह वाढण्यास मदत होते, खासकरून लहान मुलांमध्ये. शब्दसंग्रह वाढल्यामुळे विचार व्यक्त करणे सुलभ होते. लिखित त्याचबरोबर मौखिक विचार व्यक्त करण्यात मदत होते. त्यामुळे आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. आणि या सर्वामुळे व्यक्तिमत्त्व विकास होण्यास मदत होते. म्हणजे वाचन तुमचे व्यक्तिमत्त्व सुधारण्यास हमखास मदत करते. पाश्चिमात्य देशात झालेल्या एका संशोधनात असेही आढळून आले की, बालपणात वाचन कौशल्य जितके अधिक तितकी बुद्धिमत्ता सुधारण्याची शक्यता अधिक असते. एका अभ्यासात असेही आढळून आले की, चांगले वाचन कौशल्य असलेल्या मुलांना इतर मुलांच्या तुलनेत आयक्यू चाचण्यामध्ये जास्त गुण मिळाले.

दैनंदिन जीवन आणि कार्यालयीन ताणतणावातुन मुक्ती मिळविण्यासाठी वाचन हा सर्वोत्तम उपाय असू शकतो. नियमित वाचन तुमच्या मनावरील ताण, नैराश्य, चिंता कमी करू शकते. कारण जेव्हा आपण आपल्या आवडीचे पुस्तक अथवा वाचन साहित्य वाचत असतो तेव्हा आपले मन आणि मेंदू त्यामध्ये एकाग्र होत जाते, त्यामुळे अनावश्यक आणि नकारात्मक विचार आपोआप दूर होत जातात. त्यामुळे सकारात्मक भावना, आनंद आणि सकारात्मक मानसिकता यामध्ये वाढ होत असते. या सर्वाचा व्यक्तीच्या आरोग्यावर देखील सकारात्मक प्रभाव पडतो.

झोपण्यापूर्वी वाचन करणे ही एक



उत्तम सवय आहे. वाचन ही एक कमी ऊर्जा असलेली क्रिया आहे, ज्यामुळे तुम्हाला झोपण्यापूर्वी शरीर आणि मन शांत करणेसाठी ती मदत करते. वाचनामुळे झोपेची गुणवत्ता सुधारू शकते, झोपेचा कालावधी वाढतो तसेच निद्रनाश दूर होण्यास मदत होते. झोपण्यापूर्वी इलेक्ट्रोनिक गैजेट बंद करून ठेवणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कारण झोपण्यापूर्वी स्क्रीनसमोर वेळ व्यतीत केल्यास तुम्हाला निळ्या प्रकाशाचा किंवा अपायकारक किरणांचा सामना करावा लागतो. ज्यामुळे झोपेवरती नकारात्मक परिणाम होऊ शकतो. संशोधकांच्या म्हणण्यानुसार निळा प्रकाश सोडणाऱ्या इलेक्ट्रोनिक साधनांवर वाचन केल्यास नैसर्गिक झोपेत व्यत्यय येऊ शकतो. कारण ही अपायकारक किरणे मेलाटोनीन उत्पादनात व्यत्यय आणतात. मेलाटोनीन हे संप्रेरक (हारमोन) झोपेसाठी आवश्यक असते. ह्या किरणांमुळे डोळ्यांची हालचाल जलद होते, जे झोपेसाठी हानिकारक आहे. चांगल्या झोपेमध्ये मेंदूमध्ये अनेक घडामोडी होत असतात, ज्यामुळे आपण सकाळी उठल्यावरती ताजेतवाने होत असतो. कारण गाढ झोपेच्या अवस्थेत (REM टप्प्यात) स्वप्न पाहणे आणि स्मरणशक्तीचे एकत्रीकरण होत असते. मात्र निळ्या किरणांमुळे मेंदूतील अंतर्गत घड्याळ विचलित होते आणि ही प्रक्रिया विस्कळीत होऊन झोप उशिरा लागते. यासाठी स्क्रीन वाचन दिवसाच्या कालावधीत मर्यादित ठेवणे योग्य. मुद्रित पुस्तक किंवा साहित्य झोपण्यापूर्वी वाचणे हे कधीही आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

नियमित वाचन व्यक्तीचा आत्मविश्वास वाढविते, संवाद कौशल्ये आणि सामाजिक कौशल्ये वाढीसाठी देखील ते उपयुक्त आहे. अवांतर वाचन तुम्हाला इतर व्यक्ती काय विचार करतात, त्यांचे अनुभव, लेखन शैली, भाषा शैली इत्यादींसाठी ज्ञान समजून घेण्यास मदत करते. दैनंदिन वर्तमानपत्र, मॅगजीन, संशोधन जर्नल्स तुम्हाला आपल्या भागातील, राज्यातील, देशविदेशातील वर्तमान घडामोडी, वैचारिक माहिती, नवनवीन शोध याबद्दल माहिती देऊन तुम्हाला अद्ययावत राहण्यास मदत करतात. प्रत्येक व्यक्ती आपल्या कामात, आयुष्यात व्यस्त असतो, तरीसुद्धा वेळ काढून आवर्जून वाचन केले पाहिजे, कारण वाचन आपल्याला घडवण्यात आणि विविध अंगानी समृद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. रील्स बघून मिळणारे डोपामाइन शॉटस हे तात्पुरता आनंद निर्माण करतात, तर वाचनातून मिळणारा आनंद हा दीर्घकालीन परिणामकारक असतो. त्यामुळे स्मार्टफोन स्क्रोलिंग करण्यापेक्षा वाचन करणे अधिक फायदेशीर आणि वैचारिक दृष्ट्या सशक्त समाज निर्माण करणेस मदत करू शकते आणि वैचारिक सशक्त समाजच सशक्त आणि विकसित राष्ट्र घडवू शकतो. अनावश्यक खर्च टाळून पुस्तके खरेदी करूया. वाढदिवस, सत्कार, भेट इत्यादि साठी पुस्तकेच भेट देऊया, जी चिरंतन काळ टिकतील आणि वाचन संस्कृती टिकवण्यास तसेच वाढविण्यास मदत करतील. सार्वजनिक ग्रंथालयाचा वापर करूया. चला, तर मग आजपासूनच रोज थोडे तरी वाचन करण्याचा संकल्प करून तो पूर्णत्वास नेऊया आणि राष्ट्र घडविण्यात आपलेही योगदान देऊया.

